अस्सल सोलापुरी

# सुराज्य


सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

## नीट पेपर फुटीप्रकरणातील आरोपींना सीबीआय ताब्यात घेणार

**नवी दिल्ली** : देशभरात गाजत असलेल्या नीट पेपर फुटी प्रकरणी लातुरमध्ये आलेले सीबीआयचे पथक आरोपींचा ताबा घेणार आहे. सोमवार संध्याकाळपर्यंत आवश्यक त्या कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर मंगळवारी आरोपींचा ताबा घेण्यात येणार आहे

नीट प्रकरणात उइख च्या पथकाने मुख्य न्यायदंडाधिकारी लातूर यांच्या न्यायालयात आरोपीचा ताबा मिळणेसाठी आज अर्ज केला होता. सदरचा अर्ज न्यायालयाने मंजूर केला असून, आरोपीचा ताबा आणि तपासातील सर्व कागदपत्रे आणि जप्त मुद्देमाल महाराष्ट्र पोलिसांनी उइख कडे देण्याचा आदेश दिला आहे. त्यानुसार




सोमवारी दिवसभर सर्व कागदपत्राची छाननी झाली आहे. महाराष्ट्र पोलिसांनी केलेल्या तपासातील कागदपत्रे यांची वर्गवारी करण्यात आली आहे. या कागदपत्रांचा ताबा आता सीबीआयकडे देण्यात आला आहे. लातूर पोलिसांनी नीट पेपर फुटी प्रकरणी चार जणांच्या विरोधात गुन्हा दाखल केला होता. या चार जणांपैकी दोन जणांना अटक करण्यात लातूर पोलिसांना यश आलं आहे. त्यात जलील पठाण आणि संजय जाधव यांचा समावेश आहे. फरार आरोपीमध्ये इराण्णा आणि गंगाधर यांचा शोध सुरू आहे. या चार जणांनी मिळून लातूर मधील अनेक विद्यार्थ्यांना परराज्यामध्ये नीट परीक्षा देण्यासाठी तयार केलं होतं. यामध्ये मोठा आर्थिक व्यवहार झाल्याचं बोललं जातंय. आरोपींच्या मोबाईलमध्ये विद्यार्थ्यांचे बारा ॲडमिट कार्ड सापडले आहेत. त्यापैकी आठ ॲडमिट कार्ड ही परराज्यातील आहेत. सात ॲडमिट कार्ड बीड जिल्ह्यातील विद्यार्थ्यांची असून एक ॲडमिट कार्ड लातूर जिल्ह्यातील विद्यार्थ्यांचं आहे.

www.surajyadigital.com । मंगळवार, दि. २ जुलै २०२४ । वर्ष : २२ वे अंक : २७३ वा किंमत : ५ रुपये पाने १२

# डोक्यात दगड घालून तरूणाचा खून; नशेत मित्रानेच केला मित्राचा घात

## ● आसरा चौकाजवळील कल्याण नगरमध्ये खळबळ; अवघ्या नऊ तासात लागला छडा

### ● नवीन कायदे संहितेनुसार सोलापुरात पहिलाच खुनाचा गुन्हा दाखल!

सोलापूर/प्रतिनिधी

**आसरा चौक- जुळे सोलापूर रस्त्यावरील कल्याण नगर येथे डोक्यात दगड घालून एका तरूणाचा खून करण्यात आला. ही घटना सोमवारी सकाळी उघडकीस आली. विनायक कामन्ना हक्के (वय २६, रा. जामगाव, ता. मोहोळ, सध्या रा.कल्याण नगर भाग -२) असे खून झालेल्या तरूणाचे नाव आहे. अवघ्या नऊ तासात या प्रकरणाचा छडा लागला असून याप्रकरणी नागेश आण्णाराव चिक्काळे (वय ३५, रा. कल्याण नगर भाग-२) याला पोलिसांनी अटक केली आहे. मयत विनायक व नागेश हे दोघे एकमेकांचे मित्र होते. रविवारी दोघांनी एकत्र बसून दारूची पार्टी केली. विनायकने अजून दारू पाज असे म्हटल्यानंतर नशेतच नागेशने विनायकच्या डोक्यात मोठा दगड घातला. त्यातच त्याचा जीव गेला. सोमवारी हा प्रकार घडकीस आल्यानंतर कल्याणनगर भागात एकच खळबळ उडाली.**



विनायक हक्के (मयत)

सकाळी सकाळी घटनास्थळी बघ्यांची गर्दी झाली होती. खबर मिळाल्यानंतर विजापूर नाका पोलीस ठाण्याचे पथक घटना स्थळी दाखल झाले. सारी माहिती घेवून त्यांनी तपासाची चक्रे फिरवली. नागेश हा मिळेल त्या कामावर जात असे. नेहमीप्रमाणे तो सोमवारी कामावर गेला होता. पोलिसांनी कसून तपास केल्यानंतर कामाच्या ठिकाणावरूनच त्याला ताब्यात घेतले. रविवारी मयत विनायक व संशयित आरोपी नागेश चिक्काळे दोघेजण दिवसभर दारू पित होते. रात्री दोघेजण कल्याण नगरजवळील शारदा सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या मोकळ्या जागेत दारू प्यायला बसले. त्यावेळी अजून दारू पाज म्हणून मयत विनायकन हा त्याला शिवीगाळ करीत होता. त्या रागातून हे कृत्य केल्याची कबुली नागेश याने दिल्याचे पोलिसांनी सांगितले. विनायक हा दोन दिवसापूर्वी जामगावहून आजीकडे आला होता. त्याचा सारखा सोलापुरात मुक्काम असायचा. दारूच्या नशेत झालेल्या भांडणातून मित्रानेच आपल्या जीवलग मित्राचा खून केला. विजापूर नाका पोलीस व शहर गुन्हे शाखेच्या पथकाने अवघ्या नऊ तासांच संशयिताला गजाआड केले. 'बीएनएस' नुसार नवीन न्याय संहितेनुसार दाखल होणारा खुनाचा हा सोलापुरातील पहिला गुन्हा ठरला आहे. १ जुलै रोजी सोमवारी सकाळी साडेनऊच्या सुमारास विजापूर नाका पोलिसांना आसरा चौक परिसरातील कल्याण नगर भागातील बँक ऑफ इंडियाच्या मैदानात तसेच शारदा सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या मोकळ्या जागेत एका तरूणाचा खून झाल्याची वार्ता आमच्या विजापूर नाका पोलिसांना मिळाली सहाय्यक पोलीस आयुक्त परमार, विजापूर नाका पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक दादासाहेब गायकवाड, गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक सुनील दोरगे यांनीही आपल्या पथकांना आरोपीच्या शोधासंदर्भात सूचना केल्या होत्या. व घटनास्थळी भेटी देऊन पाहणी केली होती.



गुन्हेशाखा व विजापूर नाका, स्थानिक गुन्हे शाखा असे एकूण तीन पथक तयार करण्यात आले होते. या पथकांनी अवघ्या नऊ तासाताच खुनाचा छडा लावण्यात यश आले आहे. मी प्रथम सर्व टीमचे कौतुक करतो. त्यांनी अतिशय सुंदरपणे कामगिरी पार पाडली आहे.

– **एम.राज कुमार**, पोलिस आयुक्त

#### एकत्र फिरता पाहिले होते

विनायक व नागेश या दोघांना रविवारी फिरतांना आजूबाजूच्या लोकांनी पाहिले होते. दारू पिण्यासाठी दोघेही एकत्रीत फिरत होते. त्यांनी ज्या दुकानातून दारू व ग्लास विकत घेतले, त्या दुकानदाराने त्या दोघांना एकत्र पाहिले होते. मित्राचा खून करून आरोपी नागेश तिथून पसार झाला. कुणालाही संयश येवू नये म्हणून तो नेहमीप्रमाणे कामावर गेला होता, पोलिसांनी त्याच्या मुसक्या आवळल्या. आरोपीला आज मंगळवारी न्यायालयात हजर केले जाणार आहे.

#### 'बीएनएस'नुसार पहिलाच गुन्हा

भारतीय दंड संहितेनुसार (आयपीसी) यापूर्वी खुनाचा गुन्हा कलम ३०२ अंतर्गत दाखल केला जात होता. पण, १ जुलैपासून (सोमवार) आता खुनाचा गुन्हा भारतीय न्याय संहितेनुसार (बीएनएस) कलम १०३(१) अंतर्गत दाखल करण्यात आला आहे. सोलापूर शहर पोलिसांनी सोमवारी पहिल्याच दिवशी या नवीन बदलानुसार विजापूर नाका पोलिसांत गुन्हा दाखल केला आहे.

## मुंबई पदवीधरमध्ये ठाकरे गटाचा डंका

### ● अनिल परब यांचा विजय; निरंजन डावखरे हॅट्ट्रीकच्या मार्गावर

मुंबई/प्रतिनिधी

मुंबई पदवीधर मतदारसंघातून शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे अनिल परब यांचा २६ हजार २६ मतांनी विजय झाला. याठिकाणी परब आणि भाजपचे किरण शेलार यांच्यात लढत झाली होती.

मतदारांनी भाजपला नाकारले असून उद्धव ठाकरेंवर पुन्हा विश्वास व्यक्त केल्याचे प्रतिक्रिया वरूण सरदेसाई यांनी म्हटले आहे. विधान परिषदेच्या मुंबई पदवीधर, कोकण पदवीधर, मुंबई शिक्षक आणि नाशिक शिक्षक या चार मतदारसंघांसाठी २६ जून रोजी मतदान पार पडले होते. परबांच्या विजयामुळे शिवसेना ठाकरे गटाला मुंबई पदवीधरचा बालेकिल्ला कायम राखण्यात यश मिळाले आहे. तर दुसरीकडे कोकण पदवीधरमध्ये भाजपचे निरंजन डावखरे यांचा विजय जवळपास निश्चित आहे.




विजयी झाल्यानंतर अनिल परब यांना उध्दव ठाकरेंनी शुभेच्छा दिल्या.

त्यांच्या विरोधात काँग्रेसचे रमेश किर हे उभे होते.

परब हे शिवसेनेचे विधानपरिषदेत प्रतिनिधित्व करतात. महाविकास आघाडी सरकारमध्ये परिवहन मंत्री म्हणून त्यांनी यशस्वीपणे जबाबदारी सांभाळली होती. उद्धव ठाकरे यांच्या मर्जीतील नेता म्हणून त्यांची ओळख आहे. ते रत्नागिरी जिल्ह्याचे पालकमंत्रीही होते. परब हे २०१२ आणि २०१८ मध्ये विधानपरिषदेवर निवडून आले होते. त्यांना पुन्हा एकदा शिवसेना ठाकरे गटाकडून विधान परिषदेसाठी उमेदवारी देण्यात आली होती.

दरम्यान, मुंबई शिक्षक मतदारसंघातून उद्धव ठाकरे गटाचे ज.मो.अभ्यंकर यांनीही निर्णायक आघाडी घेतली असून कोकण पदवीधर मतदारसंघातून भाजपचे निरंजन डावखरे हे हॅट्ट्रकीच्या मार्गावर आहेत.

## भाळवणीत १ कोटी २८ लाखांची फसवणूक

### ● युनियन बँकेच्या कर्मचाऱ्यावर गुन्हा

**पंढरपूर** : बँकेतील खातेदारांनाठेव योजनेत रक्कम जमा करतो. इतर बॅकांतील खात्यावर रक्कम ट्रान्सफर करून देतो.असे सांगून बँकेत १ कोटी २८ लाख २८ हजार रुपयाची फसवणूक केल्याची घटना भाळवणी (ता.पंढरपूर) येथील युनियन बँकेत घडल्याचे नुकतेच उघडकीस आले आहे.

या प्रकरणात पंढरपूर ग्रामीणच्या पोलिसांनी बॅकेचा कर्मचारी प्रसाद विनायक महाजन (वय २५ रा.भाळवणी ता.पंढरपूर) याच्याविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे. प्रसाद महाजन हा त्याच बॅकेत हंगामी कर्मचारी आहे. त्याने मे २३ ते जून २०२४ या कालावधीत खातेदार यांचे पैसे ट्रान्सफर करण्यासाठी तसेच ठेव योजनेत पैसे भरतो म्हणून रक्कम घेऊन त्यांना बनावट पावती देत होता. कोणताही अर्ज नसताना खातेदारांची रक्कम इतर बँकत ट्रान्सफर करीत होता .तो पैशाचा अपहार करतो अशी तक्रार दाखल झाल्यानंतर बँकेचे अधिकारी युवराज घनश्याम मुंडे (रा. कर्जत जि.अहमदनगर) यांनी बॅकेत घेऊन चौकशी केली . तेंव्हा त्याने १ कोटी २८ लाख २८ हजाराचा अपहार करून बॅकेला फसविल्याचे निष्पन्न झाले . त्याप्रमाणे त्यांनी पंढरपूर ग्रामीण पोलिसात फिर्याद दाखल केली. पुढील तपास पोलीस निरीक्षक हुंबे करीत आहेत.

## शेअर मार्केटमध्ये २१ लाखांची फसवणूक

**सोलापूर** : शेअर मार्केटमध्ये पैसे गुंतवणुक करून चांगल्या मोबदल्यात दाम दुप्ट परतावा मिळवून देण्याचे आमिष दाखवून एका गुंतवणूकदाराची जवळपास २१ लाख रुपयांची करण्यात आलीय. ही घटना ०३ ऑगस्ट २०२२ ते १२ ऑगस्ट २०२३ दरम्यान घडलीय.

याप्रकरणी गणेश आनंद काळे ऊर्फ टकले, (रा. निलम नगर, सोलापूर) या ठकसेनाविरुद्ध एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आलाय. याबाबत मिळालेली अधिक माहिती अशी की, सोलापुरातील दाजी पेठ परिसरात राहणारे दिलीप राजेंद्र रंगरेज (वय ४९ वर्ष) यांना शेअर मार्केटमध्ये पैसे गुंतवणूक करून दुप्ट परतावा मिळवून देण्याच्या आमिषाने विश्वास संपादन करून गणेश काळे उर्फ टकले याने २०, ९६, ५०० रूपयांची गुंतवणूक करण्यास सांगितले. दिलीप रंगरेज यांची अधिक परतावा मिळण्याची आशा दाखवून जवळपास २१ लाख रुपयांची आर्थिक फसवणूक केली. या प्रकारची आर्थिक फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यावर दिलीप रंगरेज यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात पूर्व परिचित गणेश काळे उर्फ टकले याच्याविरुद्ध रविवारी, रात्री फिर्याद दाखल केली.

त्यानुसार आरोपी काळे याच्याविरुद्ध आर्थिक फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आलाय. सहाय्यक पोलीस निरीक्षक चंदनशिवे या गुन्ह्याचा अधिक तपास करीत आहेत.

## लोखंडासह टेम्पो चोरणाऱ्यास अटक

**मंद्रूप** : येथील युवराज पेट्रोल पंप परिसरातून चोरट्याने स्क्रॅप लोखंडासह ५० लाख रुपये किमतीचा टेम्पो चोरून पोबारा केला होता.

या प्रकरणात मंद्रूपच्या पोलिसांनी मंजुनाथ व्यंकटस्वामी पुल्लूर (वय २५ रा.आलेगाव ता.दक्षिण सोलापूर) याला अटक करून चोरीस गेलेला माल जप्त केला आहे. यासंदर्भात पोपट ज्ञानेश्वर माळी (रा. आलेगाव) यांनी मंद्रूप पोलिसात फिर्याद दाखल केली. ३० लाख रुपये किमतचा १० टन स्क्रॅप भरलेला एमएच१३डीक्यू-३८५२ या नंबरचा आयशर टेम्पो त्यांनी मंद्रूप येथील युवराज पेट्रोल पंपाजवळ लावला होता .तो टेम्पो चोरट्याने शनिवारी चोरून नेला होता. पोलिसांनी तपास करून मंजुनाथ पुल्लूर याला अटक करून गुन्हा दाखल केला. तपास फौजदार काशीद करीत आहेत.

## तरुणीची गळफास घेऊन आत्महत्या

**सोलापूर** : वसुंधरा अपार्टमेंट येथे राहणाऱ्या सोनिया राकेश सोनी (वय २१ रा.जोडवाडी पेठ) या तरुणीने राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना सोमवारी दुपारच्या सुमारास घडली. महिला फौजदार राधा जेवूघाले तपास करीत आहेत.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



मी तिकडे जात नसतो पण पर्यटक मला बोलावतात!

कल्याण
467-77-458
मुंबई
148-32-200

## पंकजाचा विजनवास संपला, सदाभाऊंचा 'बॅंड' वाजला


सोलापूर/विशेष प्रतिनिधी

**राज्यात आगामी महिन्यात होणाऱ्या विधानपरिषदेच्या ११ जागांसाठी भाजपकडून पाच उमेदवारांच्या नावांची घोषणा सोमवारी करण्यात आली. त्यामध्ये पंकजा मुंडेंसह रयत शेतकरी संघटनेचे नेते सदाभाऊ खोत आणि परिणय फुकेंच्या नावाचा समावेश आहे. बीडच्या भाजप नेत्या पंकजा मुंडे ह्या लोकसभा निवडणुकीत पराभूत झाल्यानंतर भाजपमध्ये बऱ्याच घडामोडी झाल्या.पंकजा ह्या मंत्रीमंडळात असल्या पाहिजेत, अशी मागणी ओबीसी कार्यकर्त्यांकडून होत होती. त्यामुळे त्यांचे पुनर्वसन होणार काय याकडे ओबीसी नेत्यांचे लक्ष लागून होते. अखेर उमेदवारी मिळाल्याने पंकजा ह्या राजकीय विजनवासातून आता बाहेर पडतील.**





विधानपरिषदेच्या ११ जागांसाठी येत्या १२ जुलै रोजी मतदान होणार आहे. त्याच दिवशी निकालही जाहीर होणार आहे. महाराष्ट्राच्या विधानपरिषदेच्या ११ जागा २७ जुलै रोजी रिक्त होत आहेत. या जागा विधानसभा सदस्यांमधून भरल्या जाणार असून सध्याचं संख्याबळ पाहता भाजपच्या, एकनाथ शिंदेंच्या शिवसेनचे २, अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे २ आणि महाविकास आघाडीचे २ उमेदवार विजयी होऊ शकतात. लोकसभेच्या निवडणुकित बसलेल्या धक्क्यानंतर आता भाजपकडून सावधरित्या पावले उचलली जात आहेत. त्याचाच भाग म्हणून विधानपरिषदेच्या यादीमध्ये जातीय समतोल राखल्याची चर्चा आहे. मित्रपक्षांना संधी म्हणून रयत क्रांती मोर्चाचे सदाभाऊ खोत यांनाही भाजपकडून संधी दिली गेली आहे.




बीडमधून पराभवाचा धक्का बसल्यानंतर पंकजा यांना राज्यसभेवर पाठवा, अशी त्यांच्या समर्थकांकडून मागणी केली जात होती. आगामी विधानसभा निवडणूक डोळ्यासमोर ठेऊन पंकजा यांना विधानसपरिषदेवर संधी देण्याचे भाजपने ठरवलेले दिसते. त्यामुळेच त्यांचे नाव यादीत सर्वप्रथम आहे. भाजपकडून विधानपरिषद निवडणुकीसाठी दिल्लीत केंद्रीय नेतृत्वाकडे ११ नावांची यादी पाठवण्यात आली होती. आगामी विधानसभा निवडणूक आणि राजकीय समीकरणे लक्ष घेऊन भाजप पक्षश्रेष्ठींनी यापैकी पाच नावांवर शिक्कामोर्तब केले. या निर्णयामुळे पंकजा अनेक वर्षांनी पुन्हा एकदा सभागृहात दिसणार आहेत.

#### तब्बल पाच वर्षे विजनवासात

सन २०१४ मध्ये देवेंद्र फडणवीस हे मुख्यमंत्री असताना पंकजा ह्या ग्रामविकास मंत्री होत्या.त्यावेळी त्यांनी काही वादग्रस्त विधाने केली होती.ती फडणवीस यांच्या जिव्हारी लागली होती.त्यानंतर फडणवीस यांनी त्यांना दुर्लक्षितच ठेवले. २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत पंकजा यांचा पराभव झाला.त्यांचे बंधू धनंजय मुंडे हे निवडून आले. फडणवीस समर्थकांनीच आपल्याला पाडले, असा समज झाल्यानंतर फडणवीस आणि पंकजा यांच्यात निर्माण झालेली कटुता आजही कायम आहे.पण लोकसभा निवडणुकीनंतर भाजप श्रेष्ठींनी स्थानिक पदाधिकाऱ्यांची कानउघाडणी केली.पक्षातील निर्णय एकट्या कुणी घेवून नयेत तर कोअर कमिटीला विश्वासात घेवूनच घ्यावेत,अशी सूचना दिल्लीश्वरांनी केली.श्रेष्ठींचा हा रोख सरळ सरळ फडणवीस यांच्यावरच होता. त्यांना अखेर नमते घ्यावे लागले आणि पंकजा यांना विजनवासातून बाहेर पडण्याचा मार्ग मोकळा झाला.

#### सदाभाऊंचा बॅंड वाजला...

सदाभाऊ खोत यांचा बँड अखेर वाजला.त्यांना विधान परिषदेवर दुसऱ्यांदा संधी मिळाली.२०१६मध्ये त्यांना हीच संधी दिली होती.फडणवीस यांच्या सरकारमध्ये त्यांना कृषी राज्यमंत्रीपद दिले गेले होते.२०१९च्या निवडणुकीत त्यांना उमेदवारी नाकारली गेली.तेही नाराज झाले होते. सांगलीच्या मेळाव्यात त्याविषयी त्यांनी खंत व्यक्त केली होती. महायुतीत आम्हाला बँडवाले समजत आहेत.निवडणुका आल्या की, बोलावतात,त्यानंतर फेकून देतात. आम्ही काय बँडवाले आहोत का,असा सवाल उपस्थित केला होता. शेतकऱ्यांमध्ये सदाभाऊंचे स्थान मोठे आहे.शेतकऱ्यांची सहानुभूती मिळवण्यासाठी भाजपने त्यांनी उमेदवादी दिलेली असावी.

## संक्षिप्त वृत्त

### भाजपच्या ६३ खासदारांना जनतेने कायमस्वरुपी बसवले : मोईत्रा

**नवी दिल्ली :** सोमवारी लोकसभेत राहुल गांधी यांनी अनेक मुद्द्यांवर केंद्र सरकारला धारेवर धरले. यासोबतच तृणमूल काँग्रेसच्या (टीएमसी) खासदार महुआ मोइत्रा यांनीही केंद्र सरकारला कोंडीत पकडण्याचा प्रयत्न केला. मी शेवटच्या वेळी लोकसभेत बोलण्यासाठी उभारले होते, तेव्हा माझा आवाज दाबण्यात आला. माझा आवाज दाबल्यामुळे सत्ताधारी भारतीय जनता पक्षाला मोठी किंमत मोजावी लागली.



मला खाली बसवण्याच्या नादात भाजपच्या ६३ खासदारांना जनतेने कायमस्वरुपी खाली बसवले, असे तृणमुल काँग्रेसच्या खासदार महुआ मोईत्रा म्हणाल्या. पुढे महुआ मोईत्रा म्हणाल्या, मी जून २०१९ मध्ये लोकसभेत एक भाषण केले होते. त्यावेळी मी फॅसिझमच्या ७ संकेतांवर भाष्य केलं होतं. सेंगोल हा अधिसत्तेचे प्रमाण असतो. भाजपकडे ३०३ सदस्यांचे क्रूर बहुमत होते, ते आता राहिलेले नाही. आदरणीय राष्ट्रपतींनी भाषण केलं. भारतीय लोकांनी स्थिर सरकार निवडले. पण स्थिर सरकार नाही. भाजप अनेक पक्षांचा आधार घेऊन सत्तेत आलं आहे. भाजप २७२ च्या मॅजिक फिगरपासून ३३ जागांनी दूर आहे, असेही महुआ मोईत्रा यांनी सांगितले.

### दीक्षाभूमी परिसरातील पार्किंगच्या विरोधात नागरीक आक्रमक

**नागपूर :** दीक्षाभूमीवरील सौंदर्गीकरण आणि नवीनीकरणाच्या प्रकल्पातील अंडरग्राऊंड पार्किंग मुद्दा आज चांगलाच तापत आहे. दीक्षाभूमी परिसरात नागरिकांनी अंडरग्राऊंड पार्किंगला कडाडून विरोध दर्शवत परिसरात आक्रमक आंदोलन सुरू केले आहे. दीक्षाभूमी परिसरात मोठ्या संख्येने जमलेल्या संतप्त जमावाने होत असलेल्या विकासकामाच्या साहित्याची तोडफोड केली आहे. तर इतर विकासकामाला आमचा विरोध नसून केवळ चुकीच्या पद्धतीने होत असलेल्या अंडरग्राऊंड पार्किंगला आमचा विरोध असल्याचे मत या आंदोलकांनी बोलतांना व्यक्त केली आहे. तर या प्रकरणाचे पडसाद आज पावसाळी अधिवेशनात देखील उमटतान दिसत आहे. परिणामी, राज्यभरातून होत असलेल्या या विकासकामाला राज्यसरकारने स्थगिती दिली आहे. याबाबत अधिकृत घोषणा राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज सभागृहात केली आहे. मात्र आम्हाला जोपर्यंत याबाबत लिखित स्वरूपात आश्वासन मिळणार नाही, तोपर्यंत आम्ही आपले आंदोलन सुरूच ठेवणार असल्याचा इशारा आंदोलकांनी दिला आहे. त्यामुळे आता पोलीस प्रशाशन या आंदोकलकांना कशा पद्धतीने समजूत काढेल, हे पाहणे महत्वाचे आहे.

### नवे फौजदारी कायदे लागू, अभिषेक मनु सिंघवींची टीका

**नवी दिल्ली :** देशभरात नवे फौजदारी कायदे लागू होत आहेत. भारतीय दंड संहिता मध्ये ५११ कलमे होती. मात्र, आता भारतीय न्याय संहितेत ३५८ कलमे आहेत. गुन्हेगारी कायद्यात बदलांसह यातील कलमांचा क्रमही बदलण्यात आला आहे.यावरून काँग्रेस नेते आणि ज्येष्ठ वकील अभिषेक मनु सिंघवी तीव्र नाराजी व्यक्त करत टीका केली आहे. या तीन नवीन कायद्यांबाबत ज्या दिवशी राज्यसभेत चर्चा सुरू होती, त्या दिवशी प्रमुख वक्ता होतो. मात्र, तेव्हा अनेक खासदारांच्या निलंबनामुळे माझे भाषण रद्द करण्यात आले. या तीन कायद्यांचा अभ्यास केला, काही गोष्टींचे संशोधन केले. तेव्हा मला असे आढळून आले की, हे दुसरे काहीही नाही. यात नवीन काही नाही. केवळ आपली छाप पाडण्याचा केलेला व्यर्थ प्रयत्न आहे. दुर्दैवाने, कॉस्मेटिक बदल करण्यात आले आहे. काही कलमे काढून टाकली आहेत. काही कलमांच्या क्रमात बदल केलेला आहे. ९० टक्के त्याच सगळ्या गोष्टी आहेत. काही शब्द इकडे तिकडे बदलले आणि या सरकारने नवीन कायद्यांचा संच म्हणून पुन्हा लागू केले आहे, अशी टीका सिंघवी यांनी केली.



### धर्मवीर २ ची रिलीज डेट जाहीर! मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत घोषणा

**मुंबई:** २०२२ साली आलेल्या धर्मवीर सिनेमाने सुपरहिट यश मिळवलं. आनंद दिघेंच्या आयुष्यावर आधारीत या सिनेमाने प्रेक्षकांचं मन जिंकलं. प्रसाद ओकच्या अभिनयाचं चांगलंच कौतुक करण्यात आलं. प्रवीण तरडेंनी सिनेमाचं दिग्दर्शन केलं होतं. काही महिन्यांपूर्वी 'धर्मवीर २'ची घोषणाा करण्यात आली. परंतु सिनेमाच्या रिलीज डेटबद्दल खुलासा झाला नव्हता. अखेर काल तोरणा बंगल्यावर मुख्यमंत्री शिंदे आणि कलाकारांच्या उपस्थितीत 'धर्मवीर २' चा रिलीज डेट जाहीर करण्यात आलीय. 'धर्मवीर २' हा सिनेमा ९ ऑगस्ट रोजी क्रांती दिनाचे औचित्य साधून प्रदर्शित होणार आहे. विशेष म्हणजे एकाच दिवशी मराठी आणि हिंदी या दोन भाषांमध्ये संपूर्ण जगभरात हा सिनेमा प्रदर्शित केला जाणार आहे. या सिनेमाचे पोस्टर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, सुप्रसिद्ध अभिनेते बॉबी देओल, सुप्रसिद्ध दिग्दर्शक-अभिनेते सचिन पिळगांवकर, महेश कोठारे, महेश मांजरेकर आणि सुप्रसिद्ध ज्येष्ठ अभिनेते अशोक सराफ यांच्या उपस्थित संपन्न झाले. 'धर्मवीर २' सिनेमाच्या पोस्टरवर करारी नजर असलेले आनंद दिघे झोपाळ्यावर बसलेले दिसतात. 'हिंदुत्त्वाशी गद्दारी करणाऱ्यांना क्षमा नाही' अशी ओळही नमूद करण्यात आली आहे.'धर्मवीर २' या सिनेमाची निर्मिती झी स्टुडिओज आणि संस्थेचे मंगेश देसाई, उमेश कुमार बन्सल यांनी केली आहे.

# स्वत:ला हिंदू म्हणवणारे हिंसा आणि नफरत करतात

## राहुल गांधी यांची टीका... सभागृहात सत्ताधाऱ्यांचा गोंधळ...

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था**

**लोकसभेत राष्ट्रपतींच्या अभिभाषणावर चर्चा सुरु आहे. विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी लोकसभेत या चर्चेत बोलताना केलेल्या वक्तव्यानंतर जोरदार गदारोळ झाला. राहुल गांधी यांनी लोकसभेत बोलताना म्हटलं की, नरेंद्र मोदी यांनी आपल्या भाषणात एका दिवशी म्हटलं की हिंदुस्ताननं कधी कुणावर आक्रमण केलं नाही. याचं कारण आहे हिंदुस्तान अहिंसेचा देश आहे. आपल्या महापुरुषांनी डरो मत, डराओ मत असं म्हटलं. भगवान शंकर म्हणतात डरो मत, डराओ मत आणि त्रिशुल जमीन रोवतात. दुसरीकडे जे लोक स्वत:ला हिंदू म्हणतात ते २४ तास हिंसा-हिंसा-हिंसा, नफरत-नफरत-नफरत, तुम्ही हिंदू असूच शकत नाही, हिंदू धर्मानं स्पष्टपणे म्हटलंय सत्याची साथ द्या. यानंतर भाजप नेते भाजप आक्रमक झाले. राहुल गांधी यांच्या वक्तव्यावर पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शाह यांनी आक्षेप घेतला.**

राहुल गांधी यांनी केलेल्या वक्तव्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी उभे राहिले आणि या प्रकरणाला गंभीर प्रकरण असल्याचं म्हटलं. संपूर्ण हिंदू समाजाला हिंसक म्हणनं गंभीर असल्याचं त्यांनी म्हटलं. नरेंद्र मोदी यांनी केलेल्या वक्तव्यावर राहुल गांधी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि



भाजप म्हणजे संपूर्ण हिंदू समाज नाही, असं म्हटलं. यानंतर अमित शाह बोलायला उभे राहिले, त्यांनी म्हटलं की विरोधी पक्ष नेत्यांनी यावर माफी मागितली पाहिजे. कोट्यवधी लोक स्वत:ला अभिमानानं हिंदू म्हणतात, असं अमित शाह म्हणाले. राहुल गांधी यांनी अभय मुद्रा या विषयावर अभय मुद्रा मुद्यावर इस्लमाच्या विद्वानांचं मत घ्यावं, असं अमित शाह म्हणाले.

राहुल गांधी पुढं बोलताना भारत जोडो यात्रेतील अनुभव सभागृहात माडले. महागाईनं महिलांच्या मनात भीती निर्माण केल्याचं म्हटलं. राहुल गांधींनी पुढे अग्निवीर आणि मणिपूरच्या मुद्यावरुन मोदी सरकारवर हल्लाबोल केला. नोटबंदी आणि जीएसटीच्या मुद्यावरुन देखील हल्लाबोल केला. गुजरातमध्ये भाजपला इंडिया आघाडी पराभूत करणार आहे, लिहून घ्या असं म्हणत राहुल गांधी यांनी भाजपला चॅलेंज दिलं.

**● गुजरातमध्ये पराभूत करण्याचे दिले ओपन चॅलेंज**
आज राष्ट्रपतीच्या अभिभाषणावरील चर्चेदरम्यान राहुल गांधी यांनी तुफान भाषण केले. त्यांनी आपल्या भाषणात सत्ताधाऱ्यांवर सडकून टीका केली. अग्नीवीर योजना, शेतकरी आंदोलन, जीएसटी, नोटबंदी अशा वेगवेगळ्या मुद्द्यांवर राहुल गांधी यांनी सत्ताधारी भाजपाला घेरले. विशेष म्हणजे त्यांनी आपल्या भाषणात भाजपला ओपन चॅलेंज दिले. आम्ही गुजरातच्या विधानसभा निवडणुकीत तुम्हाला पराभूत करणार, असे राहुल गांधी म्हणाले. राहुल गांधी लोकसभेत अग्नीवीर, जीएसटी अशा मुद्द्यांवर बोलत होते. राहुल गांधी गुजरातचा संदर्भ देताना सत्ताधारी बाकावरून त्यांना टोकले जात होते. त्यानंतर मी गुजरातला जात असतो. आम्ही तुम्हाला यावेळी गुजरातमध्ये हरवणार आहोत. तुम्ही हे माझ्याकडून लिहून घ्या. आम्ही इंडिया आघाडी तुम्हाला यावेळी गुजरातच्या निवडणुकीत पराभूत करून दाखवणार आहोत, असे राहुल गांधी म्हणाले.

**● लोकसभेत देवतांचे फोटो दाखवत टीका**
राहुल गांधींनी संसदेत भगवान महादेवाचं चित्र दाखवलं. त्रिशूळ हे हिंसेचं नसून अहिंसेचं प्रतीक आहे असं राहुल गांधींनी सांगितलं.. राहुल गांधींनी गुरुनानक यांचंही चित्र दाखवलं.. ज्याला भाजपच्या खासदारांनी आक्षेप घेतला..भगवान महादेव आणि गुरुनानक हे ''डरो मत असं सांगतात.. पण स्वत:ला हिंदू म्हणवणारे देशात हिंसा पसरवतात असा टोला राहुल गांधींनी भाजपला लगावला. राहुल गांधी यांनी त्यांच्या भाषणात पुढे भगवान रामाच्या जन्मभूमीतून भाजपला मेसेज दिला आहे, असं म्हटलं. जे जे छोटे छोटे दुकानदार आहेत, छोटी छोटी बिल्डींग होत्या सर्व पाडल्या गेल्या. अयोध्येत राम मंदिराच्या उद्घाटनावेळी अंबानी, अदानी होते पण तिथलं कोण नव्हतं, असं राहुल गांधी म्हणाले.

**● अग्निवीर योजनेवरुनही सत्ताधाऱ्यांना घेरले**
सैन्यातल्या अग्निवीर योजनेवरुनही राहुल गांधींनी सत्ताधाऱ्यांना घेरलं. अग्निवीरांना शहिदांचा दर्जा का देत नाही असा सवाल राहुल गांधींनी विचारला. शहीद झालेल्या अग्निवीरांच्या कुटुंबांना मोबदलाही दिला जात नसल्याचं राहुल गांधी म्हणाले आहेत. राहुल गांधींच्या आरोपांवर केंद्रीय संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी उत्तर दिलं. राहुल गांधी खोटं बोलतायत असं राजनाथ म्हणाले..

## प्रज्ञा सातव यांना काँग्रेसकडून विधानपरिषदेची उमेदवारी जाहीर

**मुंबई :** काँग्रेसकडून पुन्हा एकदा प्रज्ञा सातव यांना विधानपरिषदेची उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. प्रज्ञा सातव यांच्या नावाचा प्रस्ताव काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी मंजूर केला आहे. प्रज्ञा सातव या काँग्रेसचे दिवंगत माजी खासदार राजीव सातव यांच्या पत्नी आहेत.

हिंगोली लोकसभेचे ठाकरे गटाचे खासदार नागेश पाटील आष्टीकर यांनी प्रज्ञा सातव यांच्या उमेदवारीला विरोध केला होता. लोकसभा निवडणुकीत प्रज्ञा सातव यांनी महाविकास आघाडीचा धर्म पाळला नाही. त्यामुळे त्यांना उमेदवारी न देता त्यांच्यावर कारवाई करण्यात



यावी, अशी मागणी नागेश पाटील आष्टीकर यांनी केली होती. नागेश पाटील आष्टीकर यांना उद्धव ठाकरेंनी हिंगोली लोकसभा मतदारसंघातून उमेदवारी दिली होती. त्यांनी शिंदेंच्या बाबुराव कदम यांचा दारुण पराभव केला होता. दरम्यान, प्रज्ञा सातव यांनी लोकसभेत आघाडी धर्म पाळला नाही, असा आरोप आष्टीकर यांनी केला आहे.

## बदनामी प्रकरणात मेधा पाटकरांना ५ महिने कारावास आणि १० लाखांचा दंड

**मुंबई :** नर्मदा बचाव आंदोलनाच्या नेत्या आणि ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या मेधा पाटकर दिल्लीच्या न्यायालयाने पाच महिने साधा कारावास आणि १० लाख रुपयांचा दंड ठोठावला आहे. दिल्लीचे लेफ्टनंट गव्हर्नर विनय कुमार सक्सेना यांनी दाखल केलेल्या फौजदारी मानहानीच्या खटल्यात मेधा पाटकरांना ही शिक्षा सुनावण्यात आली आहे. २००३ सालच्या प्रकरणात ही शिक्षा सुनावण्यात आली आहे.



मेधा पाटकर यांना १० लाख रुपयांचा दंडही ठोठावला असून दंडाची रक्कम व्हीके सक्सेना यांना देण्याचे निर्देश दिले आहेत. दिल्ली न्यायालयाच्या निर्णयाविरोधात पाटकर ऑगस्ट पर्यंत अपील करू शकतात.

**● काय प्रकरण आहे?**
मेधा पाटकर आणि दिल्लीचे सध्याचे नायब राज्यपाल व्हीके सक्सेना यांच्यातील संघर्ष हा २५ वर्षांपासूनचा आहे. २००३ साली सामाजिक कार्यकर्त्या मेधा पाटकर नर्मदा बचाव आंदोलनात सक्रिय होत्या. तर त्यावेळी व्ही के सक्सेना नॅशनल कौन्सिल फॉर सिव्हिल लिबर्टीजच्या माध्यमातून सक्रिय होते. त्यावेळी त्यांनी मेधा पाटकर यांच्या आंदोलनाला व्हीके सक्सेना यांनी कडाडून विरोध केला होता. मेधा पाटकर यांनी व्हीके सक्सेना यांच्या विरोधात आणि नर्मदा बचाव आंदोलनाच्या विरोधात जाहिराती प्रसिद्ध केल्याबद्दल मानहानीचा खटला दाखल केला होता. तर दुसरीकडे व्हीके सक्सेना यांनी आपल्याबद्दल अवमानकारक वक्तव्य केल्याबद्दल मेधा पाटकर यांच्यावर मानहानीचे दोन खटले दाखल केले होते.

## माझ्यावर बोट केले तर मला बोट तोडण्याचा अधिकार

### अंबादास दानवे सभागृहात आक्रमक

**मुंबई :** माझा तोल सुटलेला नाही. माझ्यावर बोट केलं तर मला बोट तोडण्याचा अधिकार आहे. मी विरोध पक्षनेता नंतर आहे, आधी शिवसैनिक आहे, असे विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे म्हणाले.



विधानपरिषदेत अंबादास दानवे आक्रमक झालेले पाहायला मिळाले. अंबादास दानवे यांच्याकडून आज विधानपरिषदेत भाजप आमदार प्रसाद लाड यांना शिवीगाळ देखील करण्यात आली. अंबादास दानवे म्हणाले, बाटगा प्रसाद लाड मला हिंदूत्व शिकवणार आहे का? पक्षात धंद्यासाठी हा माणूस काम करतो. माझ्यावर बोट दाखवून बोलतो. सभापतींना बोल मला बोट का दाखवतो? तो कसा मला राजीनामा मागू शकतो? माझे पक्षप्रमुख निर्णय घेतील, असे दानवे म्हणाले.

## मध्य प्रदेशात एकाच कुटुंबातील सर्व सदस्यांचा गळफास

### बुराडी सामूहिक आत्महत्या प्रकरणाची पुनरावृत्ती, तारीखही तीच

**मध्य प्रदेश :** दिल्लीतल्या बुराडी येथे सहा वर्षांपूर्वी एका कुटुंबातील ११ सदस्यांच्या सामूहिक मृत्यूची घटना घडली होती. या घटनेने दिल्लीसह संपूर्ण देश हादरला होता. आता तशीच एक घटना मध्य प्रदेशमध्ये घडली आहे. मध्य प्रदेशच्या अलीराजपूर येथील एकाच कुटुंबातील पाच सदस्यांच्या मृत्यूचं प्रकरण समोर आलं आहे. या घरातील पाच सदस्यांचे मृतदेह छताला लटकल्याचं पाहून अलीराजपूर हादरलं आहे. पती-पत्नी आणि त्यांच्या तिन्ही मुलांचे मृतदेह घरात आढळले आहेत.



या घटनेची माहिती मिळताच जिल्हा पोलीस अधीक्षक राजेश व्यास घटनास्थळी दाखल झाले. व्यास म्हणाले, ही सामूहिक आत्महत्या आहे की हत्या हे एफएसएल आणि शवविच्छेदन अहवालानंतर आपल्याला समजेल. व्यास यांच्या पाठोपाठ फॉरेन्सिक पथकही घटनास्थळी दाखल झालं असून ते पुरावे गोळा करण्याचं काम करत आहेत. सहा वर्षांपूर्वी आजच्या दिवशी (१ जुलै २०१८) बुराडी येथे एका कुटुंबातील ११ सदस्यांनी सामूहिक आत्महत्या केली होती. अलीराजपूरमधील प्रकरण त्याच घटनेची पुनरावृत्ती असल्याचं बोललं जात आहे.

अलीराजपूर जिल्ह्यातील सोंडवा पोलीस ठाण्यांतर्गत रावडी गावात ही घटना घडली आहे. मृतांमध्ये कुटुंबप्रमुख राकेश, त्यांची पत्नी ललिता, मुलगी लक्ष्मी आणि दोन मुलं अक्षय व प्रकाश यांचा समावेश आहे. या कुटुंबाच्या नातेवाईकांनी ही सामूहिक आत्महत्या नसून हत्याकांड असल्याचा संशय व्यक्त केला आहे.

## एकाच व्यक्तीचे वेगवेगळे मृत्यू दाखले बनवून विमा कंपन्यांना ७० लाखांचा गंडा

**मुंबई :** एकाच व्यक्तीचे दोन वेगवेगळे मृत्यू दाखले तयार करून विमा कंपनीची फसवणूक करत मिरा भाईंदरमध्ये ७० लाखांचा गंडा घातल्याचं समोर आलं आहे. या प्रकरणी भाईंदर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यात अद्याप एकालाही अटक करण्यात आली नसून चार जणांचा शोधा सुरु आहे. आरोपींमध्ये एक डॉक्टराचाही समावेश आहे.

भाईंदर पश्चिमेला रहाणाऱ्या एका कुटुंबाने डॉक्टरच्या मदतीने विविध इन्शुरन्स कंपन्यांची बनावट कागदपत्रे बनवून ६९ लाख ६० हजाराची फसवणुक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी चार जणांवर भाईंदर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




**सहा कंपन्यांची ७० लाखांची फसवणूक**
आरोपींनी अशा प्रकारे सहा कंपन्यांचे इन्शुरन्स काढले होते. त्यातील ४ इन्शुरन्स कंपनीचा क्लेमदेखील मिळवला. इन्शुरन्स क्लेम मिळाल्यानंतर ते घर सोडून दुसरीकडे रहायला जायचे. तेथे रहायला गेल्यानंतर त्या पत्त्यावर पुन्हा त्याच व्यक्तीचा टर्म इन्शुरन्स काढायचे. आणि त्यानंतर मयत दाखवून त्याचे बनावट कागदपत्रे बनवून इन्शुरन्स कंपनीला सादर करायचे.

# विधानपरिषदेच्या ११ जागांसाठी भाजपकडून पाच नावे जाहीर

## पंकजा मुंडे, सदाभाऊ खोत, गोरखेंना संधी,



**मुंबई :** राज्यात होणाऱ्या विधानपरिषदेच्या ११ जागांसाठी भाजपकडून पाच नावांची घोषणा करण्यात आली आहे. त्यामध्ये पंकजा मुंडेंसह सदाभाऊ खोत आणि परिणय फुकेंच्या नावाचा समावेश आहे. विधानपरिषदेच्या ११ जागांसाठी १२ जुलै रोजी मतदान होणार आहे. त्याच दिवशी निकाल जाहीर होणार आहे.

लोकसभेच्या निवडणुकीत बसलेल्या धक्क्यानंतर आता भाजपकडून सावधरित्या पावलं उचलली जात आहेत. त्याचाच भाग म्हणून विधानपरिषदेच्या यादीमध्ये जातीय समतोल राखल्याची चर्चा आहे. मित्रपक्षांना संधी म्हणून रयत क्रांती मोर्चाचे सदाभाऊ खोत यांनाही भाजपकडून संधी दिली गेली आहे. बीड लोकसभा निवडणुकीत पंकजा मुंडे यांचा पराभव झाला होता. त्यामुळे पंकजा मुंडे यांचा समर्थक असलेला वंजारी समाज दुखावला गेला होता. गेल्या काही दिवसांत राज्यात मराठा आणि ओबीसी आरक्षणाच्या मुद्द्यावरुन वातावरण तापले आहे. लोकसभा निवडणुकीत मराठा समाजाच्या नाराजीचा भाजपसह महायुतीला मोठा फटका बसला होता.

**● भाजपकडून विधानपरिषदेसाठी कुणाला संधी?**
पंकजा मुंडे, योगेश टिळेकर, परिणय फुके, अमित गोरखे, सदाभाऊ खोत

**● भाजपचे पाच तर आघाडीचे दोन उमेदवार विजयी होणार**
महाराष्ट्राच्या विधानपरिषदेच्या ११ जागा २७ जुलै रोजी रिक्त होत आहेत. या जागा विधानसभा सदस्यांमधून भरल्या जाणार असून सध्याचं संख्याबळ पाहता भाजपच्या ५, एकनाथ शिंदेंच्या शिवसेनचे २, अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे २ आणि महाविकास आघाडीचे २ उमेदवार विजयी होऊ शकतात.

**● पंकजा मुंडे यांना संधी :** बीडमधून पराभवाचा धक्का बसल्यानंतर पंकजा मुंडे यांना राज्यसभेवर पाठवा अशी त्यांच्या समर्थकांकडून मागणी केली जात होती. आगामी विधानसभा निवडणूक डोळ्यासमोर ठेऊन पंकजा मुंडे यांना विधानसपरिषदेवर संधी देण्याचं भाजपने ठरवलं आहे. त्यामुळेच त्यांचे नाव पहिल्या यादीत जाहीर करण्यात आलं आहे. भाजपकडून विधानपरिषद निवडणुकीसाठी दिल्लीत केंद्रीय नेतृत्त्वाकडे ११ नावांची यादी पाठवण्यात आली होती. आगामी विधानसभा निवडणूक आणि राजकीय समीकरणे लक्ष घेऊन भाजप पक्षश्रेष्ठींनी यापैकी पाच नावांवर शिक्कामोर्तब केले. या निर्णयामुळे पंकजा मुंडे अनेक वर्षांनी पुन्हा एकदा सभागृहात दिसणार आहेत.

**● दान नको, तो आमचा हक्क : लक्ष्मण हाके**
ओबीसी आरक्षणासाठी आंदोलन पुकारणाऱ्या लक्ष्मण हाके यांनीही पंकजा मुंडे यांना विधानपरिषदेवर संधी मिळायला हवी, असे वक्तव्य केले होते. पंकजा मुंडे या कायद्याच्या सभागृहात असल्या पाहिजेत. मात्र त्यासाठी आम्हाला कोणीही दान म्हणून ते करू नका, भूतदया दाखवू नका, तो आमचा हक्क आहे.




## केजरीवाल पुन्हा उच्च न्यायालयात

**नवी दिल्ली :** दिल्ली उत्पादन शुल्क धोरणातील कथित घोटाळ्याशी संबंधित भ्रष्टाचाराच्या प्रकरणात सीबीआयने दिल्लीचे मुख्यमंत्री आणि आम आदमी पक्षाचे राष्ट्रीय संयोजक अरविंद केजरीवाल यांना अटक केली आहे. याप्रकरणी आता अरविंद केजरीवाल यांनी दिल्ली उच्च न्यायालयात धाव घेतली आहे. अरविंद केजरीवाल यांनी सीबीआयच्या अटकेला आणि रिमांडला आव्हान दिले आहे. सध्या अरविंद केजरीवाल हे न्यायालयीन कोठडीत आहेत. अरविंद केजरीवाल यांची तीन दिवसांची कोठडी शनिवारी संपली. यानंतर दिल्ली न्यायालयाने त्यांना १२ जुलैपर्यंत न्यायालयीन कोठडी सुनावली.

अस्सल सोलापुरी

# सुराज्य सोलापूर


## ...अन्यथा संभाजी भिडेंच्या मिशा कापू



### शरद पवार गटाच्या महिला नेत्याचा इशारा

सोलापूर : शिवप्रतिष्ठानचे संस्थापक संभाजी भिडे यांनी पुण्यातील एका कार्यक्रमात महिलांबाबत केलेल्या वक्तव्यावरुन वाद सुरू आहे. या वादावर राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या महिला प्रदेश उपाध्यक्षांनी प्रतिक्रिया देताना भिडे यांच्या मिशा कापू असा इशारा सोमवारी दिला. या प्रतिक्रियेवरुन नवा वाद होण्याची शक्यता आहे. पवार गटाच्या महिला उपाध्यक्षा विद्या लोलगे यांनी सोमवारी एका सामाजिक कार्यक्रमाची माहिती देण्यासाठी पत्रकार परिषद घेतली. या पत्रकार परिषदेत पत्रकारांनी लोलगे यांना संभाजी भिडे यांनी महिलांबाबत केलेल्या वक्तव्यावर प्रतिक्रिया विचारली. वटसावित्रीच्या पूजेला नट्यांनी जाउ नये. ड्रेस घातलेल्या महिलांनी जाउ नये. साडी घातलेल्या महिलांनीच जावे, असे भिडे म्हणाले होते. यावर विद्या लोलगे म्हणाल्या, संभाजी भिडे यांच्याकडून महिलांबाबत वारंवार वादग्रस्त वक्तव्ये केली जातात. त्यांना महिलांबद्दल बोलायचा अधिकार काय आहे. आम्ही यापुढील काळात त्यांची वक्तव्ये खपवून घेणार नाही. आम्ही महिला मिळून त्यांच्या मिशा कापून टाकू.



# दूध संघांनी लिटरला ३० रुपये दर देणे बंधनकारक

सोलापूर/प्रतिनिधी

**काही महिन्यांपासून दुधाला चाळीस रुपये प्रतिलिटर दर मिळावा म्हणून दूध उत्पादक शेतकरी राज्यभर रस्त्यावर उतरत होते. .या संदर्भात मंत्रालयात दुग्धविकास मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली सोमवारी झालेल्या बैठकीत काही महत्वपूर्ण निर्णय घेण्यात आले. राज्यातील प्रत्येक दूध संघाने प्रति लिटर ३० रुपये दर देणे बंधनकारक असल्याची सूचना त्यांनी केली तसेच पाच रुपये प्रति लिटर शासन अनुदान देणार असल्याचे त्यांनी सांगितले.**

त्याचप्रमाणे राज्यातील जे दूध संघ दूध पावडर बनवतात त्यांना प्रत्येक एक किलो दूध पावडरला शासन तीन रुपये अनुदान देणार असल्याचेही विखे यांनी सांगितले तसेच मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांच्याशी चर्चा करून तातडीने निर्णय कळवला जाईल अशी ग्वाही विखे पाटील यांनी दिली.



### जनावरे पडताळणीस मुदतवाढ...



राज्य शासनाने दुधाला पाच रुपये प्रति लिटर अनुदान देण्याचे ३ मार्च २४ रोजी जाहीर केले होते परंतु त्यामध्ये राज्यातील प्रत्यक दूध उत्पादकांच्या जनावरांची पडताळणी करून त्याची संपूर्ण माहिती शासनाला २४ मार्चपर्यंत ऑनलाईन कळवण्याची अट घातली होती परंतु ही माहिती भरण्याचे पोर्टलच बंद पडले होते. एवढ्या अल्पमुदतीत जनावरांची पडताळणी करणे शक्य नव्हते, त्यातच लोकसभेच्या निवडणुका जाहीर झाल्या. त्यामुळे आमदार बबनदादा शिंदे यांनी ही मुदत वाढवून मिळावी व बंद पडलेले पोर्टल तातडीने चालू व्हावे, अशी मागणी पत्राद्वारे शासनाकडे केली होती, त्याही विषयावर या बैठकीत चर्चा झाली. यापुढे जनावरांच्या पडताळणीची मुदत वाढवण्यात येईल बंद असलेले पोर्टल देखील तातडीने सुरू करण्यात येईल, अशी ग्वाही विखे यांनी दिल्याचेही आ. बबनराव शिंदे यांनी सांगितले.




बैठकीत झालेल्या निर्णयांची माहिती माढ्याचे आमदार बबनराव शिंदे यांनी दिली. या बैठकीस माजी आमदार बबनदादा शिंदे यांच्यासह माजी विधानसभा अध्यक्ष हरिभाऊ बागडे, आमदार विनय कोरे, आमदार मोनिका राजुरे, आमदार संजयमामा शिंदे, माजी आमदार सदाभाऊ खोत, आयुक्त प्रसाद मोहोळे, राज्यातील विविध दूध संघाचे प्रतिनिधी, अधिकारी उपस्थित होते.

## लाडकी बहीण योजनेच्या नोंदणीसाठी सोलापुरातील सेतू केंद्रावर महिलांची गर्दी



सोलापूरः विविध योजनांची कागदपत्रे काढण्यासाठी महिलांची सेतू कार्यालयात झालेली गर्दी.

सोलापूर/प्रतिनिधी

राज्य सरकारने माझी लाडकी बहीण योजना जाहीर करताच योजनेसाठी आवश्यक कागदपत्रे काढण्यासाठी सोलापूरच्या सेतू कार्यालयात सोमवारी महिलांची गर्दी दिसून आली.

शासनाच्या या योजनेचा लाभ घेण्यासाठी उत्पन्न, रहवाशी दाखला गरजेचा आहे. हे दाखले काढण्यासाठी महिलांची सेतूमध्ये मोठी गर्दी केली आहे. यामुळे सोमवारी सेतू कार्यालयसह परिसर महिलांनी भरून गेल्याचे चित्र पहावयास मिळाले. राज्याच्या अर्थसंकल्पात महिलांसाठी लाडकी बहीण योजना जाहीर करण्यात आली आहे. यात २१ ते ६० वर्षांपर्यंतच्या महिन्याला महिन्याला १५०० रूपये मिळणार आहेत. याशिवाय मुलींच्या सक्षमीकरणासाठी लेक लाडकी योजना नव्या स्वरूपात मांडण्यात आली आहे. मुलींच्या जन्मानंतर ५००० रुपये देण्यात येणार आहेत. मुलगी सज्ञान झाल्यानंतर मुलीला रोख ७५ रुपये देण्यात येतील. या दोन्ही योजनांसाठी कागदपत्रांची आवश्यकता असल्याचे सरकारने जाहीर केले आहे. ते कागदपत्रे काढण्यासाठी सोलापूरच्या सेतू कार्यालयात सोमवारी मोठी गर्दी केल्याचे दिसून आले. यापुढेही ही गर्दी वाढत जाणार आहे. त्यामुळे आता जिल्हाधिकाऱ्यांनी सेतू कार्यालयात सर्वसामान्य महिलांची अडचण लक्षात घेऊन टेबल वाढवावेत अशी मागणी होत आहे.

## लाचखोर मंडल अधिकाऱ्याकडे सापडली बेहिशोबी मालमत्ता

### सोलापुरात पती-पत्नीवर गुन्हा दाखल

सोलापूर/प्रतिनिधी




सन २०१८ मध्ये लाच लुचपत प्रतिबंधक विभागाच्या सापळा कारवाईत अटक करण्यात आलेल्या मंडल अधिकारी संजय बाबुराव फिरमे (वय ५४) याच्या संपत्तीची चौकशी केली असता त्याच्याकडे भ्रष्ट व गैरमार्गाने कायदेशीर आणि ज्ञात उत्पन्नापेक्षा अधिक किमतीची अशी १ कोटी ७६ लाख ३ हजार ७६७ रूपये किंमतीची बेहिशोबी मालमत्ता मिळाली आहे. याप्रकरणी त्याच्यासह त्यांच्या पत्नी विरुद्ध सदर बजार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

संजय बाबुराव फिरमे (मंडळ अधिकारी, माळशिरस) याने संपादित केलेल्या मालमत्तेबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून उघड चौकशी करण्यात आली होती. फिरमे याने संपादित केलेली मालमत्ता कायदेशीर स्त्रोताद्वारे संपादित केल्याबाबत त्यांना वेळोवेळी संधी देवून माहिती घेण्यात आली होती. परंतु त्याने याबाबत पुरावे सादर केले नाहीत. त्याने लोकसेवक पद धारण केलेल्या कालावधीत प्राप्त असलेल्या कायदेशीर उत्पन्नापेक्षा जास्त किंमतीची मालमत्ता पत्नी संध्या संजय फिरमे यांच्या नावे संपादित केल्याचे चौकशी अंती निष्पन्न झाले आहे. त्याने संपादित केलेली बेहिशोबी मालमत्ता ही त्यांच्या कायदेशीर उत्पन्नाच्या तुलनेत २२.२९ टक्के जास्त असल्याचे चौकशी अंती निष्पन्न झाले आहे. दोघांविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## महिलेचा खून करून मृतदेह साडीने बांधून उसाच्या शेतात टाकला

सोलापूर/प्रतिनिधी

**बार्शी तालुक्यातील पाथरी येथे एका अनोळखी महिलेचा मृतदेह सोमवारी आढळून आला आहे. अज्ञात व्यक्तीने महिलेचा खून करून पुरावा नष्ट करण्यासाठी तिचा मृतदेह साडीने बांधून उसाच्या शेतात सरीमध्ये टाकून दिल्याची घटना १ जुलै रोजी सकाळी उघडकीस आली आहे. खून झालेल्या अनोळखी महिलेचे वय २८ ते ३५ दरम्यान आहे.**

या अनोळखी महिलेच्या सडलेल्या मृतदेहाच्या संदर्भात बार्शी तालुका पोलिसांनी अज्ञात व्यक्तिविरुद्ध खून व खुनाचा पुरावा नष्ट करण्यासंदर्भात गुन्हा दाखल केला आहे. याबाबत शंकर उत्तम गायकवाड (रा. बार्शी) यांनी बार्शी तालुका पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पाथरी गावातील प्रमोद गायकवाड हे बार्शी-येरमाळा रस्त्यालगत असलेल्या ऊस पिकास खत टाकत असताना दुर्गंधी येऊ लागल्याने त्यांनी त्याठिकाणी जाऊन पाहिले. त्यावेळी हिरव्या रंगाच्या साडीमध्ये हातपाय बांधून व शरीर बांधलेले, फक्त कवटी असलेले व त्याखालील शरीर सडलेल्या महिलेचे अनोळखी प्रेत दिसून आले. प्रेत पूर्णतः सडल्यामुळे त्याची दुर्गंधी सुटलेली होती. प्रेताजवळ महिलेचे मंगळसूत्र व हातातील बांगड्या पडलेल्या होत्या. तसेच त्या शरीराचा काही भाग हिंस्र प्राण्यांनी खाल्ल्याचे दिसून आले. उसाच्या शेतामध्ये कोणीतरी अज्ञात व्यक्तीने अज्ञात कारणावरून महिलेस ठार मारून पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने उसाचे शेतात टाकल्याचे दिसून आले आहे.

घटनेची माहिती मिळताच सहायक पोलिस निरीक्षक विश्वजित जगदाळे, उपनिरीक्षक चंद्रकांत गुळवे, पोलिस हेड कॉन्स्टेबल अरुण डिकुळे, धनाजी केकान, अभय उंदरे, प्रदीप केसरे, दादा भांगे, शिवशंकर खराडे यांनी घटनास्थळी धाव घेतली. घटनास्थळाची पाहणी करून पंचनामा करून हे प्रेत कुजलेले असल्याने डॉ. अशोक ढगे यांनी जागेवरच शवविच्छेदन केले. पुढील तपास सहायक पोलिस निरीक्षक विश्वजित जगदाळे हे करीत आहे.



## जि.प.पतसंस्था क्रमांक १ ची २८ रोजी निवडणूक

सोलापूर : जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांची सहकारी पतसंस्था नंबर एकच्या संचालक मंडळ निवडणुकीचा उर्वरित टप्पा राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण पुण्याचे सचिव अशोक गाडे यांनी जाहीर केला आहे. गरज भासल्यास २८ जुलै रोजी मतदान व त्यानंतर लगेच मतम ोजणी होणार आहे.

जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांची सहकारी पतसंस्था नंबर एकच्या संचालक मंडळाची निवडणूक सन २०२३- २४ ते २०२८- २९ या पंचवार्षिक निवडणुकीसाठी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून ए. ए. गावडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. पतसंस्थेच्या १७ जागेसाठी नामनिर्देशन दाखल करण्याची प्रक्रिया यापूर्वीच पार पडली आहे. यामध्ये सर्वसाधारण १२, महिला प्रतिनिधी २, अनुसूचित जाती व जमातीसाठी एक, इतर मागास साठी एक आणि वि. जमाती व भटक्या जमाती, वि मा प्रवर्गासाठी एक अशा जागांचा समावेश आहे. सहकारी पतसंस्था नंबर एकचा निवडणूक कार्यक्रम जाहीर केल्यामुळे सभासदांमध्ये धावपळ सुरू आहे.

### अशी आहे निवडणूक प्रक्रिया

या जागांसाठी दाखल केलेले नामनिर्देशन मागे घेण्याची मुदत २ जुलै ते १६ जुलै रोजी दुपारी तीन वाजेपर्यंत राहील. अंतिम यादी व निशाणी वाटप करण्याचे काम १८ जुलै रोजी होणार आहे आणि त्यानंतर २८ जुलै रोजी सकाळी आठ ते दुपारी चार वाजेपर्यंत म तदान प्रक्रिया पार पाडली जाईल. त्यानंतर लगेच मतमोजणी करून निकाल जाहीर करण्यात येणार आहे. ही निवडणूक कोठे घ्यायची हे ठिकाण नंतर जाहीर करण्यात येणार आहे.

## विवाहितेच्या छळ प्रकरणी चार जणांविरुद्ध गुन्हा

सोलापूर : घर खर्चासाठी व मुलांच्या शिक्षणासाठी माहेरून आई-वडिलांकडून पैसे घेऊन ये तसेच शारीरिक व मानसिक त्रास देऊन जाचहाट करून विवाहितेला मारहाण केल्याप्रकरणी चार जणाविरुद्ध सलगर वस्ती पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. पती अनिल जाधव सासू अंबुबाई जाधव, ननंद स्वाती मोकळे नणंद रूपाली गायकवाड (सर्व राहणार ते फ्री कॉलनी नंबर ६ विठ्ठल मंदिर समोर) अशी गुन्हा दाखल झालेल्यांची नावे आहेत. याप्रकरणी कुसुम अनिल जाधव (वय २४, रा. से. फ्री. कॉलनी नंबर सहा विठ्ठल मंदिर) यांनी फिर्याद दिली.

# कैद्यांबद्दलचा आधुनिक दृष्टिकोन अन् नवीन धोरण काय आहे?

सोलापूर/प्रतिनिधी

**विविध तज्ज्ञांची मतं घेण्याबरोबरच कैद्यांबद्दलचे अधिकार आणि कायदे या पार्श्वभूमीवर, कैद्यांबद्दलचा आधुनिक दृष्टिकोन आणि नवीन धोरणं ही तुरुंगात राबवली जात आहेत या संदर्भात दैनिक 'सुराज्य' नं घेतलेला हा धांडोळा...**

आधुनिक दृष्टिकोन : आधुनिक कारागृह-नीतीत सुडाची व दहशत बसविण्याची भूमिका त्याज्य ठरली आहे. कारागृहात आलेला कैदी हा बाहेर पडताना योग्य रीतीने सामाजीकृत होऊन, समाजाशी समरस होऊन जबाबदारीने व समाजमान्य मार्गाने स्वतःचे सामाजिक स्थान मिळविण्यास पात्र ठरावा आणि त्याकरिता कारागृहात असताना त्यावर योग्य ते संस्कार करावेत, असे आता मानले जाते. गुन्हेगार मानसिक रोगी आहे, विशिष्ट सामाजिक परिस्थितीत रोग बळावला आहे, रोगाचे निर्मूलन करण्यासाठी कारागृह नावाच्या सुधारणा केंद्राची आवश्यकता आहे, असे आज समजले जाते.

समान रोग असलेल्या इतरांसमवेत राहून काम करीत करीत शिक्षा भोगल्याने कैद्यांची विकृती नाहीशी होईल व परस्परसहकार्याची जाणीव निर्माण होईल, हा आधुनिक दृष्टिकोन कारागृहासंबंधी स्वीकृत झाला आहे. सराईत गुन्हेगारांच्या वसाहती केल्या,

माहितीचा खजिना सुराज्य InforMative

तर तुरुंगावरचा बोजा कमी होईल, असे काही तज्ज्ञांचे म्हणणे आहे. सराईत गुन्हेगारांचा संसर्ग नवोदित गुन्हेगारांना होणार नाही, हा हेतूही त्यामुळे साध्य होईल. कारागृहांना सुधारणा केंद्र असे या अर्थाने म्हटले जाते. तुरुंगात येऊन कैद्याला आपल्या घराशी संपर्क साधता येतो.

या नीतीस अनुसरुन कैद्यांविषयीची खालील धोरणे मुख्यत्वे स्वीकारलेली आहेत.

कैद्याचे जवळचे नातेवाईक आजारी असतील, किंवा घरी एखादा महत्त्वाचा कार्यक्रम असेल तर कैदी संचित रजेसाठी अर्ज करू शकतो. शिक्षेचा विशिष्ट कालावधी पूर्ण केल्यावर, कैद्याचे तुरुंगातले वर्तन पाहून आणि स्थानिक पोलिसांचा अहवाल मागवूनच ही रजा दिली जाते. कारागृहाचा अधिकारी १४ दिवसांची संचित रजा देऊ शकतो, तर संबंधित विभागीय आयुक्त ३० दिवसांपर्यंत संचित रजा देऊ शकतात. यात वाढही होऊ शकते.

कैद्यांच्या सुट्टीबद्दलचं एक उदाहरण : संजय दत्तला मे २०१३मध्ये कैदेची शिक्षा झाली. मे २०१५ पर्यंत त्याला पाच महिने रजा (पॅरोल व फर्लो) मिळाली होती. त्यानंतर पुन्हा मुलीच्या नाकाच्या शस्त्रक्रियेचे कारण दाखवून त्याला ऑगस्ट २०१५ मध्ये पुण्याच्या विभागीय आयुक्तांनी ३० दिवसांची संचित रजा मंजूर केली.




### कैद्यांना घरी जाण्यासाठी सुट्टी कधी मिळते?

विविध गुन्ह्यांमध्ये शिक्षा झालेल्या कैद्यांना पॅरोल (संचित रजा) आणि फर्लो (अभिवचन रजा) नावाच्या सुट्ट्यांवर तुरुंगाबाहेर जायला मिळते. यातील फर्लो रजा मिळणे हा प्रत्येक कैद्याचा अधिकार असतो. थोड्याथोड्या दिवसांनी कैद्याला आपल्या कुटुंबात रहावयास मिळावे आणि त्याचे सामाजिक संबंध स्थापित रहावे म्हणून ही रजा असते. फर्लो मिळण्यासाठी कैद्याला कोणतेही कारण द्यावे लागत नाही. फर्लोचा कालावधी ही शिक्षेतले सूट समजली जाते.

### कैद्यांबद्दलची काही महत्त्वाची धोरणं

- शिक्षेच्या मुदतीत सूट देऊन कैदी बाहेरच्या समाजात नीट वागतो की नाही, यावर नजर ठेवणे. मधून मधून त्याला घरी अगर कारागृहाबाहेर एखाद्या व्यवसायाकरिता जाण्यास मोकळीक देऊन त्याच्या वागणुकीची परीक्षा घेणे.
- सर्व गुन्हेगारांना सर्व प्रकारे समान न लेखता प्रत्येक कैद्याचा पूर्वेतिहास आणि व्यक्तिमत्व लक्षात घेऊन त्या दृष्टीने वेगवेगळे उपाय योजणे.
- कैद्यांना सर्वस्वी समाजापासून अलग न ठेवता वारंवार पत्रव्यवहार, गाठीभेटी, चर्चासत्र, प्रशिक्षण, करमणुकीचे कार्यक्रम यांद्वारा त्यांच्या कुटुंबियांशी व इतर नागरिकांशी त्यांचे संबंध वाढविणे
- कारागृहातील कैद्यांचा एक स्वतंत्र समूह कल्पून अंतर्गत व्यवस्थेची सर्व सूत्रे त्यांच्या हवाली करुन आपल्या हिताकरिता वेगवेगळे कार्यक्रम आखून अंमलात आणण्याची संपूर्ण जबाबदारी त्यांच्यावरच सोपविणे. या सर्व धोरणांच्या यशस्वितेकरिता कारागृहासंबंधीचा अधिकारीवर्ग हा व्यवस्थापन, औषधोपचार, मानसशास्त्र, समाजशास्त्र इ. विषयांत प्रशिक्षित असावा, हेही आता मान्य झाले आहे.





# जीएसटीची ७ वर्षे

देशात लागू केलेल्या वस्तू व सेवा कर अर्थात जीएसटी व्यवस्थेला सोमवारी सात वर्षे पूर्ण केली. 'एक राष्ट्र, एक कर, एक सामायिक बाजारपेठ' असे एकत्वाचे ब्रीद अंगिकारून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सरकारने दुसऱ्या टर्ममध्ये आणलेली ही व्यवस्था प्रत्यक्षात केंद्र-राज्यातील वाढत्या संघर्षाचे आजही कारण ठरत आहे. यात राजकारण असू शकते पण त्यावर उपाय करण्याची तसदी मोदी सरकारकडून घेतली जात नाही, हेही वास्तव मान्य केलेच पाहिजे. जीएसटीमधून उत्पन्न वाढत चालले आहे. त्यात अजून पारदर्शकता आणि कठोरपणा आणल्यास अजून उत्पन्न वाढेल. सरलेल्या एप्रिलमध्ये जीएसटीचे संकलन हे विक्रमी २.१० लाख कोटी रुपये नोंदवले गेले. कर गोळा होण्याचे प्रमाण सध्या दरमहा सरासरी पावणेदोन लाख कोटी रुपयांवर जाणे हे करप्रणालीचे सर्वात मोठे यश मानले जाते. २०२३-२४ आर्थिक वर्षाच्या जानेवारी ते मार्च तिमाहीत देशाच्या सकल राष्ट्रीय उत्पादनाच्या (जीडीपी) तुलनेत जीएसटी महसुलाचा वाटा ६.२ टक्के असा तगडा राहिला. उल्लेखनीय म्हणजे वर्षागणिक जीएसटी संकलनातील वाढ ही १४ ते १५ टक्के अशी दमदार म्हणजे जीडीपी वाढीच्या तुलनेत जवळपास दुप्पट आहे. इतकेच नाही तर करसंकलन वाढीचा हा दर केंद्राप्रमाणे राज्यांमध्येही सारखाच आहे. मग राज्य औद्योगिकदृष्ट्या प्रगत वा भौगोलिकदृष्ट्या विशाल असो, सर्वाधिक नागरीकरण झालेले असो अथवा शेतीत प्रगतीपथावर असो, कोणताही भेदभाव न करता जीएसटी वाढीचा दर सर्वत्र किंचित फरकाने एकसारखाच राहिल्याचे 'क्रिसिल'चा अहवाल सांगतो. याचा अर्थ जीएसटीने अप्रत्यक्ष करांच्या संकलनांत लक्षणीय कार्यक्षमता आणली. संपन्न आणि आजारी राज्य असा कोणताही भेद न करता हे घडून आले. संपूर्ण देशभरात सर्व वस्तू आणि सेवांवर एकसमान दराने कर आकारणी होईल, हे जीएसटी व्यवस्थेचे आदर्श उद्दिष्ट सांगितले गेले.




प्रत्यक्षात ते कधी मूर्तरूप घेईल, याची कल्पनाही करवत नाही इतके ते आता असाध्य भासू लागले आहे. करांच्या पाच टप्प्यांच्या व्यवस्थेने निरर्थक विसंगतींनाही जन्म दिला आहे. जसे सोने आणि मौल्यवान दागिन्यांवरील जीएसटी दर अवघा ३ टक्के आहे, तर जीवनाश्यक कृषी उत्पादने ती प्री-पॅक आणि प्री-लेबल तऱ्हेने विकली जातात म्हणून जीएसटीचा दर त्यापेक्षा अधिक म्हणजे ५ टक्के आहे. पेट्रोल, डिझेल, नैसर्गिक वायू, वीज, लॉटरी, मद्य वगैरे अद्याप जीएसटी कक्षेबाहेर आहेत. अनाकलणीय बाब म्हणजे अगदी अंत्यविधी आणि त्याच्याशी संलग्न सेवांवर जीएसटी नव्हे, तर त्या-त्या राज्य अथवा स्थानिक प्रशासनाकडून कर गोळा केला जातो. जीएसटीच्या टिकाकारांकडून पुढे केला जाणारा सर्वात मोलाचा प्रश्न म्हणजे या करप्रणालीची कामगिरी काय आणि ती देशातील राज्यांसाठी निष्पक्ष व समन्यायी ठरली काय? महसुली कामगिरीवरील चित्र गुलाबी असले तरी ते राज्यांची उपासमार करून सुरू आहे, असे याचे विसंगत उत्तर असल्याचे आर्थिक क्षेत्रातील जाणकार सांगतात. केंद्र आणि राज्य दोघांनाही (सर्वसमावेशक जीएसटी परिषदेद्वारे) जीएसटीवर कायदे करण्याचा, दुरुस्तीचा अधिकार आहे. मात्र, जीएसटी आकारणी आणि संकलनाच्या बाबतीत केंद्र आणि राज्यांच्या जबाबदाऱ्या, अधिकार क्षेत्र वेगवेगळे आहेत. तथापि केंद्र-राज्यात संघर्षाची ठिणगी म्हणजे जीएसटी लागू करताना केंद्र किंवा राज्ये एकमेकांच्या क्षेत्रांवर अतिक्रमण करण्याचा धोका असतो, किंबहुना तसे अतिक्रमण होत असल्याची राज्यांची तक्रार आहे. यात सर्वात कळीचा मुद्दा हा की, केंद्र आणि राज्यांना जीएसटी महसूल वाटून घ्यावा लागतो आणि या महसूल वाटणीवरूनच संघर्ष वाढू लागला आहे. केंद्र-राज्यात सामोपचाराच्या अभावाचा जनसामान्य ग्राहकांना होणारा अपाय हा की, जीएसटी म्हणजे केंद्र सरकार (सीजीएसटी) आणि राज्ये (एसजीएसटी) या दोघांद्वारे त्यांच्याकडून वसूल केला जाणारा दुहेरी विक्री कर ठरू लागला आहे, असेही जाणकार म्हणतात. जीएसटी आल्यामुळे, अनेक राज्यांसाठी महसुली उत्पन्नाचे स्रोत असणाऱ्या, जकात, प्रवेश कर, ऐषाराम कर आणि मूल्यवर्धित कर (व्हॅट) वगैरेवर पाणी सोडावे लागले. या महसुली नुकसानीसाठी केंद्र सरकारकडून राज्यांना पहिली पाच वर्षे भरपाईची हमी दिली गेली. पण हमी दिलेल्या भरपाईची पूर्तता केंद्राने खूप दिरंगाईने केली, अशी कैक राज्यांची तक्रार आहे. अजून यात बऱ्याच सुधारणा कराव्या लागतील.

## अध्यात्म

**पुरुषाप्रमाणेच स्त्रीवर्गालाही वारकरी पंथाने भक्तीचा समान अधिकार दिला. याबाबत कोणताच भेदाभेद या पंथाने केला नाही, म्हणूनच ही नामभक्ती स्त्रीवर्गाला तर अधिक भावली. यामुळेच अनेक स्त्रिया या भक्तिमार्गात प्रविष्ट झाल्या. वारकरी पंथात अनेक स्त्री संत उदयास आल्या. याचे कारण हेच आहे. संत जनाबाई या सर्वात अग्रभागी असलेली स्त्री संत. आपल्या वाट्याला आलेले दासीपण जगत कर्माधिष्ठीत नामभक्तीची खरी शिकवण तिने आपल्या आचरणातून दर्शवून दिली.**

---------------------------

# वारकरी पंथाची नामभक्ती

मध्ययुगीन कालखंड हा प्रामुख्याने कर्मकांड प्रधान असा कालखंड होता. हा कालखंड 'यादवकाळ' म्हणून ओळखला जातो. यादव राजे हे वैदिक परंपरेचे कट्टर समर्थक होते. वैदिक धर्माच्या प्रसारासाठी त्यांनी मोठ्या प्रमाणात प्रयत्न केले. धर्म प्रसारकांना त्यांनी अभय देऊन प्रोत्साहन दिले. याच काळात मुस्लीम राजवटीचा शिरकाव झाला. धर्म संघर्षाचा नवा इतिहास रचला गेला. याआधी बौद्ध धर्माबाबत हा अनुभव होता, पण बौद्ध धर्माच्या अभिसरणात एवढा रक्तपात झाला नाही, पण मुस्लीम राजवटीच्या संघर्षात खूप मोठ्या प्रमाणात लढाया, रक्तपात, जुलूम, अन्याय अत्याचाराला आणि रक्तपाताला मराठी माणसांना सामोरे जावे लागले. सक्तीचे धर्मांतर होऊ लागले आणि 'यदा यदा हि अधर्मस्य' अशी परिस्थिती निर्माण झाली. या परिस्थितीत सामान्य माणूस हतबल होतो. मग तो देवाच्या, धर्माच्या अधिक आश्रयास जातो. या कालखंडात हीच परिस्थिती निर्माण झाली. हिंदू धर्माच्या रक्षणासाठी यादव राजाच्या कालखंडात व्रत वैकल्याचा सुकाळ झाला. भक्तिविषयक चुकीच्या समजुती लोकमानसात रूढ होऊ लागल्या.

यादवांचा प्रधान हेमाद्री पंडित याने चर्तुवर्ग चिंतामणीसारख्या ग्रंथातून दोन हजार व्रत-वैकल्याची महिती देऊन कर्मकांडाला अधिक खतपाणी घातले. अनेक ठिकाणी हेमाडपंथी शिव मंदिरे याच काळात बांधण्यात आली. वैदिक धर्माच्या रक्षणासाठी हा सर्व खटाटोप होता. हेमाद्रीचे हे कार्य महत्त्वाचे असले तरी त्याच्या ग्रंथाचे समर्थन करता येत नाही. कारण या ग्रंथामुळे खरी भक्ती विसरून लोक कर्मकांडालाच भक्ती समजू लागले. यामुळे सामान्यजन नाडले गेले.

धर्माच्या नावाखाली त्यांचे आर्थिक शोषण होऊ लागले. ज्याच्याकडे कर्मकांड करण्यासाठी आर्थिक बळ नव्हते, अशा सामान्यांच्या मनात न्यूनगंड निर्माण होऊ लागला. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रात महानुभाव आणि वारकरी पंथाचा उदय झाला. यातील महानुभाव पंथ पुन्हा कडक आचारात गुंतल्यामुळे या पंथाचे स्वरूप मर्यादित राहिले. वारकरी पंथाप्रमाणे त्याचा विस्तार झाला नाही, पण कर्मकांडाला फाटा देऊन **'नामापरते तत्व नाहीरे अन्यथा। वाया आणिक पंथा जशी झणी'**, असे म्हणून वारकरी पंथाने नामभक्तीचा गजर केला.

नाममहिमा गाऊन मराठी संतांनी या सुलभ भक्तिमार्गाचा प्रसार आणि प्रचार केला. अनेक पौराणिक दाखले आणि संदर्भ देऊन वारकरी पंथाने महाराष्ट्राच्या भक्तीक्षितिजावर नामभक्तीची पहाट उगवली. भक्तीक्षेत्रातील हे क्रांतिकारी पाऊल होते. या सुलभ भक्तीमार्गामुळे अनेकांचे धाबे दणाणले. विशेषत: ज्यांची रोजीरोटी धार्मिक कर्मकांडांवर आधारित होती ते धर्ममार्तंड संतापले. या पंथाला पहिला विरोध या कर्मकांडनिष्ठ धर्म मार्तंडांकडूनच झाला. संत ज्ञानदेव, नामदेव, जनाबाई, एकनाथ, तुकाराम या सर्व संतांना यांच्या प्रखर विरोधाचा सामना करीतच विठ्ठलभक्तीचा आणि नामसंकीर्तनाचा नामभक्तीचा प्रसार करावा लागला.



**'नाम संकीर्तन साधन पै सोपे।**
**जळतील पापे जन्मांतरीचे।।**
**तुका म्हणे सोपे आहे सर्वांहूनी।**
**शहाना तो धनी घेत आहे'** असे म्हणून मराठी संतांनी हा सोप्या भक्तीचा विचार मराठी माणसांच्या मनात पेरला. कालांतराने हा विठ्ठलनामाच्या भक्तीचा मळा इतका फुलला, इतका बहरला की अवघा झाला हरी' या उक्तीप्रमाणे अवघ्या महाराष्ट्रभर विठ्ठलभक्तीचे अमाप पीक आले आणि सर्वत्र सुलभ भक्तीच्या सुगीचे दर्शन घडू लागले.

**'सोपे हो साधन साधावया लागी।**
**न लगे उपाधी नाना मते ।।'** असे म्हणून संत ज्ञानदेवांनी या सुलभ भक्तीचे रोपटे लावले आणि पाहता पाहता या भक्तिवेलीने गगनाला गवसणी घातली. अन्य कर्मकांड, तीर्थयात्रा, जप, तप, अनुष्ठान, यज्ञयाग यापेक्षा हे साधन अतिशय महत्त्वाचे आहे हा विचार वारकरी पंथाने सर्व लोकांना पटवून सांगितला. अन्य कोणत्याही मार्गाला जाण्यापेक्षा या सुलभ भक्तिमार्गात सामील होण्याचे आवाहन मराठी संतांनी लोकमानसाला केले आणि महाराष्ट्रातील सामान्य जनांनाही कर्मकांडविरहीत आणि सर्वांना सामावून घेणारा हा चोख भक्तिमार्ग जवळचा वाटला.

वेगळा वेळ, द्रव्य, संपती न खर्च करता आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे अन्य कोणावरही विसंबून, अवलंबून न राहता भक्तीचा हा स्वावलंबी मार्ग अनुसरण्याची संधी वारकरी पंथाने मराठी माणसाला उपलब्ध करून दिली. मराठी संतांनी आपणास दिलेला हा अनमोल असा ठेवा आहे. सामाजिक आणि धार्मिक दृष्टीनेही मध्यकालातील ही घटना ऐतिहासिक आहे. धार्मिक क्षेत्रातील परिवर्तनाचा आणि धार्मिक कर्मकांडरूपी शोषणाच्या मुक्तीचा हा प्रारंभबिंदू आहे. याबाबत वारकरी संतांचे अखंड ऋण मानायला हवेत. परिवर्तनाच्या याच विचाराची प्रेरणा घेऊन पुढे धार्मिक क्षेत्रानंतर सामाजिक क्षेत्रातील परिवर्तनाला सुरुवात झाली. संत ज्ञानदेवांचे हरिपाठाचे अभंग म्हणजे नामभक्तीच्या प्रसाराचे अतिशय उत्तम उदाहरण आहे.

**'देवाचिये द्वारी उभा क्षण भरी।**
**तेणे मुक्ती चारी साधियेल्या।**
**हरी मुखे म्हणा हरी मुखे।**
**पुण्याची गणना कोण करी'**

हा मूलमंत्र देऊन ज्ञानदेव नाममहिमा गातात. हरिपाठ कीर्ती मुखे जरी गाय । पवित्रची होय देह त्याचा। असं म्हटल्यानंतर ही सोपी उपाधी सांडून कोण कर्मकांडाकडे वळेल? म्हणूनच ही क्षणभर वेळ देऊन साधणारी, केवळ परमेश्वराचे नामस्मरण करून पुण्य पदरात पाडून घेणारा भक्तिमार्ग मराठी माणसांनी निवडला, नव्हे तो हृदयस्थ केला.

**'अनंत नामाचे पाठांतर। रामकृष्ण नाम निरंतर।**
**सर्व सुखाचे भांडार । हरी श्रीधर नाम वाचे।**

अनंत नामाचे सार केवळ या सहा अक्षरांमध्ये सामावले आहे, असे प्रतिपादन करून वारकरी पंथाने 'राम कृष्ण हरी' हा मंत्र जपमंत्र म्हणून स्वीकारला. मंत्र हा जपावा सर्वकाळ असे म्हणत या नामस्मरणाला अमर्याद स्वातंत्र्य दिले. स्थळ-कालाची कोणतीही मर्यादा या नामस्मरणरूपी मंत्राला बाध्य नाही. त्यामुळेच आपले सर्व दैनंदिन व्यवहार सांभाळून ही भक्ती करणे सर्वांना सोपे झाले. **'दळीता कांडिता । तुज गाईन अनंता।'** हे आत्मविश्वासपूर्ण उद्गार जनाबाई यामुळेच काढू शकली. **'झाड लोट करी जनी। केर भरी चक्रपाणी'** असे आपल्या परमेश्वराशी अतूट अद्वैत नाते तिने जोडले. **'नाम फुकट चोखट । नाम घेता न ये वीट ।'** असे म्हणत नामभक्तीचे सुलभ महिमा तिने गायले. ही भक्ती करताना कोणताही आर्थिक भार भक्तावर पडत नाही हे विशेष! त्यामुळे इतर सर्व साधनांपेक्षा ही भक्ती विनामूल्य ठरते. यावर वारकरी संतांनी भर दिला. संत ज्ञानदेवांनी हेच प्रतिपादन केले. ते म्हणतात की, **'जप, तप, अनुष्ठान, क्रिया, कर्म, धर्म। हे जाणताती वर्म संतजन। भक्तीमार्ग फुकट । आनंदाचे पव्हे। लागलीसे सवे पुंडलिका।'** नामभक्ती साधल्यास कोणतेच जप-तप करण्याची गरज नाही, हे ज्ञानदेवांनी हरिपाठाच्या अभंगातून सांगितले. वेदशास्त्राप्रमाणे, **श्रुतीचे वचन । एक नारायण सार जपा । जप तप कर्म हरिविण धर्म। वाउगाची श्रम व्यर्थ जाय ।** नामभक्ती ही सकळ भक्तींचे सार आहे आणि हे वेदशास्त्रानेही मान्य केले आहे, म्हणूनच या भक्तीच्या अनुसरणास वारकरी पंथाने अधिक महत्त्व दिले. कथा कीर्तनाच्या माध्यमातून या भक्तीचा गजर केला. संत नामदेवांनी आपल्या कीर्तनातून या भक्तीला अधिक समाजाभिमुख केले. संत नामदेव या भक्तीचे महत्त्व प्रतिपादन करताना म्हणतात की, **'नामाचा महिमा नेणेची पै ब्रह्मा । म्हणोनिया कर्मा अनुसरला ।। नामाचे सामर्थ्य नेणे वेदशास्त्र'** असे म्हणत संत नामदेव या भक्तीचा गौरव करतात.

सर्व पंचत्वामध्ये नाम सामावलेले आहे असे सांगत ते म्हणतात, **'साराचेही सार भक्तीचे भांडार । नाम निरंतर गाता वाचे । नांदतसे नाम आकाश पाताळी । सर्व भूमंडळी घनदाट । तीर्थाचे पै तीर्थ नाम हे समर्थ । होईल कृतार्थ रामनामे।'** वरील संत वचनावरून वारकरी संतांनी तत्कालीन कर्मकांडाच्या मगरमिठीतून सामान्य जनाच्या सुटकेसाठी आणि सुलभ भक्तीच्या प्रतिस्थापनेसाठी कसे प्रयत्न केले याची प्रचिती येते. मराठी संतांचा हाच विचार पुढील सर्व संतांनी आचरणात आणून या भक्तीला प्रशस्त केले. या भक्तिमार्गाच्या शिकवणीमुळे सर्वत्र ब्रह्मविद्येचा सुकाळ झाला आणि चारी वर्णाला भक्तीचा अधिकार प्राप्त झाला. नवभक्तींचे हे महापर्व मराठी संतांनी सुरू केले. हे भक्तीविषयक सामाजिक अभिसरण खूप महत्त्वाचे आहे. या भक्तिमार्गामुळे खेड्यापाड्यात नामभक्ती अधिक लोकप्रिय झाली. यामुळे धार्मिक क्षेत्रातील शोषण आणि वर्चस्व काही प्रमाणात संपुष्टात आले. कालांतराने उच्चवर्णीयांकडूनही या भक्तीचा पुरस्कार केला गेला. केवळ महाराष्ट्रात नव्हे तर उत्तर भारतातही या भक्तीचा तळागाळातील लोकांपर्यंत प्रसार करणारे संत निर्माण झाले.

**- डॉ. अशोक लिंबेकर.**

## टुडेज् ब्लॉग

# अवयवदानासाठी प्रेरक शक्ती!

भारतात होत असलेल्या किडनीच्या तस्करी प्रकरणांची परदेशातील मित्रांकडून उडवली जाणारी खिल्ली पाहून अस्वस्थ झालेल्या डॉक्टरने तेथील गलेलठ्ठ पगाराच्या नोकरीला रामराम करीत भारत गाठले. मद्रासमध्ये एक संस्था स्थापन करून त्याद्वारे लोकांमध्ये अवयवदानाविषयी जनजागृती करण्यास सुरुवात केली. आज २७ वर्षांनंतर कोट्यवधी भारतीयांना त्यांनी प्रत्यक्ष अवयवदान करण्यात मदत केली. त्यातून अगणित लोकांना जीवदान मिळाले. विविध व्याधींशी लढत अवयवांची वाट बघणाऱ्या रुग्णांना जीवनदान मिळवून देणाऱ्या या मसिहा डॉक्टरांचं नाव आहे डॉ. सुनील श्रॉफ.




डॉ. सुनील श्रॉफ हे सध्या मद्रासमधील मेडिकल मिशन हॉस्पिटल येथे वरिष्ठ युरोलॉजी आणि प्रत्यारोपणतज्ज्ञ म्हणून कार्यरत आहेत. मोहन फाऊंडेशनचे ते प्रमुख विश्वस्तदेखील आहेत. एचआयव्ही पॉझिटिव्ह रुग्णावर यशस्वीरित्या किडनी प्रत्यारोपण करणारे ते पहिले भारतीय आहेत हेदेखील अधोरेखित करण्यासारखे आहे. जीवनाला कलाटणी देणारी घटना सांगताना डॉक्टरांचा आवाज आपोआपच गंभीर होऊन जातो. ते सांगतात की, एका १२ वर्षांच्या मुलाला कोब्रा नाग चावला होता. त्याच्यावर मद्रासच्या श्री रामचंद्र मेडिकल कॉलेज आणि संशोधन संस्थेत शस्त्रक्रिया करण्याचे ठरवण्यात आले होते.

शस्त्रक्रिया सुरू झाली, पण त्यात त्याचा मेंदू मृत झाला. तो बरा होईल या आशेने पाच दिवस डॉक्टर आणि नातेवाईक वाट बघत होते, पण दुर्दैवाने तो वाचू शकला नाही. मुलाच्या मृत्यूने अत्यंत दुखी झालेले, भावनाविवश झालेले त्याचे वडील अचानक उठून डॉ. सुनील यांच्याकडे आले आणि मी माझ्या मुलाचे अवयव दान करू शकतो का? असे विचारू लागले. दोन किडण्या, एक हृदय, दोन डोळे काढून घेण्यात आले आणि ते व्यवस्थित जतन करून अल्पावधीत ते पाच गरजू रुग्णांवर प्रत्यारोपित करण्यात आले.

या घटनेने डॉक्टर स्वत:च अंतर्मुख झाले. आपल्या हातून ही किती मोलाची कामगिरी झाली याचे समाधान आणि अभिमान त्यांना वाटू लागला. या घटनेने त्या हॉस्पिटलचे नाव सर्वदूर झाले. प्रसिद्धी झाली. त्या कालावधीत देशात अशा प्रकारची प्रक्रिया पार पाडणारे चौथे हॉस्पिटल म्हणून त्यांचा बोलबाला होऊ लागला आणि इथूनच डॉक्टरांच्या अवयवदान चळवळीला प्रारंभ झाला. त्यातूनच या विषयात जास्तीत जास्त काम करण्याचा निश्चय त्यांनी केला. त्यातून १९९७ मध्ये मोहन (मल्टी ऑर्गन हार्वेस्टिंग एड नेटवर्क) फाऊंडेशनची निर्मिती झाली. लाखो लोकांनी उत्स्फूर्तपणे अवयवदानाचे कार्ड भरून दिले आहेत. संस्थेतर्फे सविस्तर माहिती देणारी हेल्पलाईनदेखील सुरू केली आहे. या फाऊंडेशनच्या मद्राससह बेंगळुरू, हैदराबाद, इम्फाळ, दिल्ली, चंडीगड, नागपूर, जयपूर, मुंबई आणि अमेरिकेत शाखा कार्यान्वित करण्यात आल्या आहेत.

**- भाग्यश्री मुळे.**

## जन्म हा अखेरचा

# स्वीकृतप्रसादीस्थल



ज्योतिर्लिंगरूपी आत्म्यात तो विषयांचे हवन करीत असतो. म्हणून तो अतिशय आनंदी असतो. प्रिय, मोद आणि प्रमोद या मनाच्या वृत्ती आहेत. आवडणारी वस्तू जेव्हा डोळ्यांना दिसते तेव्हा मनुष्याच्या मनात प्रियवृत्ती उत्पन्न होते. वस्तू त्याच्या हाती येते तेव्हा त्याच्या मनात मोदवृत्ती उत्पन्न होते. पहिल्या वृत्तीपेक्षा ही वृत्ती अधिक आनंद देणारी असते.

त्या वस्तूचा जेव्हा तो आस्वाद घेतो तेव्हा त्याच्या मनात प्रमोदवृत्ती उत्पन्न होत असते. एकापेक्षा एक अशा अधिक आनंददायक या वृत्ती आहेत. शिवयोग्याला प्रमोद होत असतो, परंतु तो विषयसेवनानंतर होणाऱ्या आनंदासारखा सामान्य नसतो. तो असामान्य असा परमानंद असतो. सर्व काही परमात्म्याचे आहे, परमात्म्यासाठी मी हे करीत आहे, परमात्म्यालाच मी हे अर्पण करीत आहे, अशा वृत्तीने शिवयोग्याचा व्यवहार चाललेला असतो. काही लोकांना पदार्थ खाऊन आनंद मिळतो. तर काही लोकांना दुसऱ्याला पदार्थ देऊन आनंद मिळतो. स्वतः खाऊन आनंद मिळवणे ही काही जणांची प्रवृत्ती असते तर दुसऱ्याला देऊन आनंद मिळवणे ही देखील काही जणांची प्रवृत्ती असते. शिवयोगी स्वत:साठी काही करीत नसल्यामुळे त्याला शरीराकडून घडणाऱ्या कर्माचे बंधन पडत नाही. शेवटी ज. रेणुकाचार्य या स्थलाचा समारोप करतात.

**सच्चिदानन्द जलधौ शिवे स्वात्मनि निर्मलः।**
**समर्प्य सकलान् भुक्ते विषयान् तत्प्रसादतः।।२०.१३।।**

याआधी अग्नीचा दृष्टान्त देऊन विषय स्पष्ट केला आणि आता समुद्राचा दृष्टान्त देऊन विषय स्पष्ट करीत आहे. समुद्र अनेक प्रकारचे असतात. लवणसमुद्र, क्षीरसमुद्र, घृतसमुद्र अशा समुद्रांचे वर्णन पुराणात सापडते. **(क्रमश:) - काशी जगद्गुरु डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी.**

## जनमानस

# वारीमार्गात 'पितांबरी'चा सेवाभावी उपक्रम!

आठशेहून अधिक वर्षांची परंपरा लाभलेली 'पंढरीची वारी' हे महाराष्ट्राचे एक प्रमुख वैशिष्ट्य आहे. 'गळ्यामंदी तुळसीमाळ, मस्तकी चंदनाचा टिळा । मुखी विठूचे नाम, मनी माऊलीच्या भेटीचा लळा ।।' असा हा वारकरी ज्याला आषाढी एकादशी जवळ आली की, 'भगवंत भेटी'ची आस लागते. मग पाय आपसूकच पंढरीच्या दिशेने वळू लागतात. खांद्यावर भगवी पताका माळून विठूनामाचा गजर करत तो वारीला निघतो. ऊन पावसाची तमा न बाळगता, तहानभूक विसरून माऊलीच्या भेटीसाठी निघालेला हा विठूभक्त जेव्हा दमतो, थकतो तेव्हा क्षणभर विश्रांतीसाठी थांबतो. अशावेळी त्याला चालण्याचे पुन्हा बळ मिळावे, त्याच्यात उत्साह यावा यासाठी 'पितांबरी' आस्थापनाच्यावतीने दरवर्षी वारीमार्गावर वारकऱ्यांच्या हाता-पायांना तेल लावून मसाज केले जाते. पितांबरीचे स्वयंसेवक दमलेल्या वारकऱ्यांची मायेने विचारपूस करतात. त्यांच्या हाता-पायांना, पाठीला पितांबरीचेच उत्पादन असलेले क्युअर ऑन वेदनाशामक तेल लावून मसाज करतात.




हाडांच्या दुखण्यासाठी प्रभावी असलेल्या या तेलाच्या मालिशमुळे वारकऱ्यांनाही वेदनेपासून आराम मिळतो. शेकडो कोलोमीटरचा पायी प्रवास करून वारकरी शरीराने थकला असला, तरी विठूमाऊलीच्या दर्शनाची आस मनी असल्याने त्याचे मन थकत नाही. त्यामुळे पुन्हा एकदा तेवढ्याच उत्साहाने तो पंढरीच्या दिशेने मार्गस्थ होतो. दरवर्षी वारीकाळात हजारो वारकऱ्यांचे हातापायांचे दुखणे पितांबरी दूर करत असते. वयोवृद्ध, तपोवृद्ध वारकऱ्यांच्या सेवेच्या मोबदल्यात त्यांच्या आशीर्वादाचा ठेवा जमा करत पितांबरीचा हा सेवाभावी उपक्रम कोरोना महामारीचा काळ वगळता गेल्या अनेक वर्षांपासून अविरतपणे सुरु आहे. उद्योगासोबतच सामाजिक बांधिलकी जपणारे कंपनीचे मालक रवींद्र प्रभुदेसाई यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या या उपक्रमाचा दरवर्षी हजारो वारकरी लाभ घेत असतात. यंदाही त्यांच्या स्वयंसेवकांचा चमू पंढरीच्या दिशेने निघाल्याचे वृत्त वाचनात आले. राज्यात अनेक औषधी कंपन्या आहेत, ज्या राज्यात व्यवसाय करून आज मोठ्या झाल्या आहेत. त्यांनीही पितांबरीच्या या उपक्रमातून बोध घेऊन वारकऱ्यांच्या सेवेसाठी पुढाकार घ्यावा !

**- जगन घाणेकर, मुंबई.**

# नागरिकही तितकेच जबाबदार!

नालेसफाईच्या नावाने आपण सगळे नेहमीच ओरड करत असतो. पण, नाल्यात कचरा टाकतं कोण, याचा कुणी विचार करतं का? नाले, गटारे किंवा मोकळ्या जागेत आपणच कचरा टाकतो आणि नंतर नालेसफाई का होत नाही म्हणून बोंबदेखील आपणच मारतो. संपूर्ण राज्यात पावसाळ्यापूर्वी नालेसफाईची कंत्राटे दिली जातात. एकट्या मुंबई महापालिकेने यंदा नालेसफाईसाठी २५० कोटींचे बजेट ठेवलं आहे. यावरून संपूर्ण राज्यात नालेसफाईसाठी काही हजार कोटी नक्कीच खर्च होत असावेत. एवढं करूनही नाले तुंबतातच! बरं कुठलीही स्थानिक स्वराज्य संस्था खर्च करते म्हणजे आपल्या कररुपी पैशांतून हा खर्च करते आणि यातून गब्बर होतात कंत्राटदार! मग आपण कचरा कचराकुंडीत टाकल्यास नाल्यांमध्ये कचरा साठणार नाही आणि दरवर्षी नालेसफाईसाठी खर्च होणारे आपले कोट्यवधी रुपये नाल्यात जाणार नाहीत.

दरवर्षी मार्च महिना संपायला आला की संपूर्ण राज्याला वेध लागतात नालेसफाईचे! पावसाळ्यापूर्वी नालेसफाई म्हणजे जणू काही जन्म-मरणाचा प्रश्न बनला आहे. मग बजेट बनवणे, टेंडर काढणे, नालेसफाईला प्रत्यक्षात सुरुवात करणे, त्यानंतर नालेसफाईची कामे पूर्ण होणे (?), तसे कंत्राटदारांकडून दावे करणे, मग महापालिका अधिकारी, राजकीय नेत्यांचे पाहणी दौरे, नाल्यांची सफाई कशी झाली नाही याचे पुरावे दाखवणारे फोटो, त्यानंतर आरोप-प्रत्यारोप हे सगळं अगदी नित्याचं झालं आहे. बरं एवढं होऊनसुद्धा नाल्यांमध्ये कचरा दिसतोच, नाले तुंबतात आणि कंत्राटदाराला त्याचे पैसे मिळतात. पावसाळ्यातील दोन महिने नालेसफाई आणि कंत्राटदाराच्या नावानं ओरड होते. त्यानंतर विषय संपतो आणि थेट पुढील वर्षी मार्चमध्ये पुन्हा नालेसफाईच्या जन्म-मरणाचा प्रश्न उपस्थित होतो. सर्वांना पावसाळ्यात काय होईल, याची पुन्हा काळजी वाटू लागते. या सर्वांतून महत्त्वाचा प्रश्न उपस्थित होतो तो म्हणजे मुळात नालेसफाईची वेळ का येते आणि यावर दरवर्षी कोट्यवधी रुपये खर्च होतात, हे खरंच किती योग्य आहे.




एकट्या मुंबईच्या नालेसफाईकडे पाहिलं तर यंदा नालेसफाईचं २५० कोटींचं बजेट होते.

आता यातील सर्वात महत्त्वाचा मुद्दा आहे तो कचऱ्याचा! मुळात नाल्यात कचरा जातोच कसा, हा कळीचा प्रश्न आहे. तर तुम्ही-आम्ही सर्वच बेशिस्त आहोत म्हणून नाल्यात कचरा जमा होतो. अनेक लोक घंटागाडीपर्यंत कचरा नेण्याचा कंटाळा करतात, मग सोपा मार्ग म्हणजे प्लास्टिकच्या पिशवीत कचरा बांधून थेट नाल्यात फेकला जातो. विचार करा, अशा हजारो कचऱ्याच्या पिशव्या नाल्यात फेकल्या तर नाला तुंबणार नाही तर काय होणार? मुंबईतील ३५-४० टक्के लोक झोपडपट्टी किंवा तत्सम भागात राहतात. त्या भागात महापालिका किंवा नगरपालिकेच्या कचरा गोळा करणाऱ्या गाड्या पोहचू शकत नाहीत. मग ही मंडळी त्यांचा बहुतांश कचरा नाल्यात फेकतात. नाले तुंबायला आणखी काय लागतं? म्हणजे आपणच नाल्यात कचरा टाकायचा, त्यानंतर नालेसफाई होत नाही म्हणून आपणच बोंबाबोंब करायची, नाल्यांमुळे डास वाढल्याच्या तक्रारीही आपणच करायच्या, मग आरोग्यावर खर्च करायचा, नालेसफाईवर महापालिका किंवा स्थानिक स्वराज्य संस्थेनं कोट्यवधी रुपयांचा खर्च करायचा, तो खर्च मग आपल्याच खिशातून कररुपानं गोळा करायचा, ही आपली आता प्रस्थापित व्यवस्था झाली आहे.

मुंबई महापालिकेनं यंदा नालेसफाईवर अडीचशे कोटी खर्च केले आहेत. मुंबई महापालिकेप्रमाणेच ठाणे, नवी मुंबई, उल्हासनगर, कल्याण-डोंबिवली, मिरा-भाईंदर, वसई-विरार, पनवेल अशा अनेक महापालिका, शेकडो नगरपालिका तसेच हजारो नगरपंचायती आणि ग्रामपंचायती या सर्वांचा नुसता विचार केला तर राज्यातील किती हजार कोटी केवळ नालेसफाईवर खर्च होत असतील, याचा ढोबळ गणित मांडण्याचा प्रयत्न करा! बरं हा कचरा आपणच करत असतो. मग आपणच घाण करायची ते निस्तरण्यासाठी हजारो कोटींचा खर्च करायचा यातून कोणाचं हित साधतं? आपणच पालिकेकडे जमा केलेल्या करातून आपलाच खिसा कापण्याची संधी नालेसफाईच्या माध्यमातून कंत्राटदाराला देत आहोत, याची जाणीव आपल्याला का होत नाही? नाही म्हणायला गाळ काढण्याची गरज भासते, पण गाळ काढल्यानंतर काय होतं, हे वर वाचलं आहे. त्यामुळे या नालेसफाईच्या कामाखाली सुरू असलेली तिजोरीतील उधळपट्टी थांबवायची असेल तर तुम्ही-आम्ही नाले, गटार किंवा इतरत्र कुठेही कचरा न टाकता कचराकुंडीत किंवा घंटागाडीत कचरा जमा होईल, याची काळजी घेतली पाहिजे.

**- अविनाश चांदणे.**

सुराज्य सोलापूर हे दैनिक मुद्रक, प्रकाशक राकेश हरिपंत टोळ्ये यांनी सह्याद्री पब्लिशर्स, १५७/१५८, औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तेथे आणि ६०६/७/८, नारायण पेठ, पुणे-३० येथून एकाच वेळी प्रकाशित केले. सोलापूर मुख्य कार्यालय - फोन-०२१७-२६०७२०१, फॅक्स-०२१७-२६०७२०२, पुणे शहर कार्यालय - फोन/फॅक्स - ०२०-२४४६४७५५. I R. N. I. NO. MAHMAR/२००२/०९७०७. Email - dailysuraajya@gmail.com संस्थापक - स्व. राजेश विष्णूपंत कोठे, संपादक - राकेश टोळ्ये.

## संक्षिप्त वृत्त



**कुर्डुवाडी :** कुर्डुवाडीतील नगरपरिषदेच्या वार्ड क्र. २ व प्रभागातील नागरी सुविधेबाबत संदीप भराटे हे आमरण उपोषणास बसले.

### कुर्डुवाडीतील सुविधेसाठी भराटे यांचे उपोषण

**कुर्डूवाडी** : कुर्डुवाडीतील नगरपरिषदेच्या वार्ड क्र. २ व प्रभागातील नागरी सुविधेबाबत दिलेल्या निवेदनाची दखल न घेतल्याने अर्जदार संदीप भराटे हे दि.१ जुलै रोजी नगरपरिषदेच्या प्रांगणात आमरण उपोषणास बसले आहेत. भराटे यांनी नागरी सुविधेसाठी नगरपरिषदेकडे दि.१९ जून रोजी लेखी निवेदन सादर केले होते. दिलेल्या अर्जात वार्ड क्र.२ व प्रभागातील रोड लाईट खुप प्रमाणात बंद आहेत त्या त्वरीत चालु करून मिळाव्यात, गटारी स्वच्छ करून मिळाव्यात, शिवसाई कॉलनीतील हातपंपामध्ये मोटर टाकुन नागरीकांच्या पाण्याची सोय करावी.तसेच शिवसाई कॉलनीतील गार्डनचे काम रद्द न करता ते काम प्रशासनाच्या वतीने मंजुर झालेले असून टेंडर प्रक्रिया सुद्धा झालेली आहे तरी ते टेंडर फोडून सबंधीत ठेकेदारास वर्कऑर्डर देऊन काम चालु करावे असे या निवेदनात म्हटले आहे.

---

### ग्रामसेवक संघटनेच्या उत्तर तालुका अध्यक्षपदी कांबळे; सचिवपदी भोई

**सोलापूर** : उत्तर तालुका ग्रामसेवक संघटनेच्या उत्तर तालुका अध्यक्षपदी गंगाधर शंकर कांबळे ह्यांची पुनर्निवड करण्यात आली. पंचायत समिती उत्तर मधील अहिल्याबाई होळकर सभागृहात घेण्यात आलेल्या डी एन ई १३६ ग्रामसेवक संघटनेची निवडणूक प्रक्रिया ग्रामसेवक संघटनेचे जिल्हाध्यक्ष शरद भुजबळ,यांच्या अध्यक्षतेखाली,निवडणूक निर्णय अधिकारी तथा कार्याध्यक्ष तात्या ढवळे,जिल्हा सरचिटणीस दयानंद पाटील संपन्न झाली. पदाधिकारी पुढील प्रमाणे सचिव पदी-प्रतापसिंह भोई, उपाध्यक्ष- गणेश नारायणकर,महिला उपाध्यक्ष-मीनाक्षी सरवदे,कार्याध्यक्ष - कृष्णत डवले,कोषाध्यक्ष- राजकुमार साबळे,सह सचिव- भालचंद्र काळे,संघटक-बापूराव ढावणे,महिला संघटक-अनुराधा ननवरे यावेळी नंदकुमार पाटील,अक्रम पठाण,मारुती कांबळे,राम कांबळे सह ग्रामसेवक उपस्थित होते.

---

### राज्य उत्पादन शुल्क विभागाचे हातभट्ट्यांवर जिल्हाभरात छापे

**सोलापूर** : राज्य उत्पादन शुल्क विभागाने शनिवारी जिल्हाभरात राबविलेल्या मोहिमेत हातभट्टी दारू निर्मिती ठिकाणांवर धडक कारवाई करत वीस गुन्ह्यात ५२० लिटर हातभट्टी दारू, २१ हजार २८० लिटर रसायनासह दोन वाहने असा नऊ लाख १८ हजार ६०२ रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला. सविस्तर वृत्त असे की, राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून हातभट्टी दारू निर्मिती व विक्री ठिकाणांवर सातत्याने कारवाई करण्यात येत असून शनिवारी राबविलेल्या विशेष मोहिमेत जिल्हाभरातील हातभट्टी ठिकाणांवर धाडी टाकण्यात आल्या.

# परदेशात नोकरी देण्याच्या बहाण्याने ३६ लाखांची फसवणूक; चौकडीचा प्रताप

## परदेशात नोकरीची उत्तम संधी देण्याच्या बहाण्याने जवळपास ६० जणांची फसवणूक

**सोलापूर/प्रतिनिधी**

परदेशात नोकरीची उत्तम संधी देण्याच्याबहाण्याने जवळपास ६० जणांची फसवणूक झालीय. डायनॅमिक कन्सल्टन्सी अँड मॅन पॉवर सर्विसेस नावाने सोलापुरात सुरू केलेल्या शॉप मध्ये जवळपास या सर्व इच्छुकांची ३६ लाख रुपयांची फसवणूक झाली आहे. हा प्रकार सप्टेंबर २०२२ ते डिसेंबर २०२२ दरम्यान उत्तर सदर बझार विद्यानगरात घडलाय. हा शॉप सुरू केलेल्या चौकडीने सिराज अब्दुल रशीद नदाफ यांच्यासह त्या सर्व इच्छुकांची फसवणूक केल्याप्रकरणी सदर बाजार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आलाय.

याबाबत मिळालेली अधिक माहिती अशी की, सय्यद मसूद उर्फ असद गझनफर अली खतीब (रा. कोंडा नगर, सोलापूर) याच्यासह चौघा जणांनी अशोक चौकातील आर. एन. गोली सेलिब्रेशन मध्ये शॉप क्रमांक ३० मध्ये पहिल्या मजल्यावर डायनेमिक कन्सल्टन्सी अँड मॅन पॉवर सर्व्हिसेस नावाचे कार्यालय थाटले होते. या कार्यालयात सिराज अब्दुल रशीद नदाफ याला नोकरीस ठेऊन' परदेशात नोकरीची उत्तम संधी चे पॅम्पलेट छापताना जाणीवपूर्वक सिराज नदाफ याचा भ्रमणध्वनी क्रमांक छापला होता. परदेशात नोकरी करण्याची इच्छा आणि संधींच्या आमिषाला बळी पडून जवळपास ६० इच्छुक उमेदवारांकडून ३६ लाख रुपये घेण्यास भाग पाडून ती रक्कम फोन पे गुगल पे बँकेद्वारे व रोख स्वरूपात घेऊन १८ लोकांचा बनावट विजा, नेटर ऑफर लेटर हे बनावट कागदपत्रे तयार करून ते लोकांनाभ्रमणध्वनी क्रमांक छापला होता.

परदेशात नोकरी करण्याची इच्छा आणि संधींच्या आमिषाला बळी पडून जवळपास ६० इच्छुक उमेदवारांकडून ३६ लाख रुपये घेण्यास भाग पाडून ती रक्कम फोन पे गुगल पे बँकेद्वारे व रोख स्वरूपात घेऊन १८ लोकांचा बनावट विजा, लेटर ऑफर लेटर हे बनावट कागदपत्रे तयार करून ते लोकांना सिराज नदाफ याच्या करवी देऊन त्या सर्व लोकांची व नदाफ यांची फसवणूक केली. या रक्कमेची मागणी केली असता, रईस अहमद इलाहीबक्ष दलाल (रा. सोलापूर) याने त्यांना शिवीगाळी करून हाकलून दिले.

याप्रकरणी सिराज अब्दुल रशीद नदाफ यांनी सदर बझार पोलीस ठाण्यात दाखल केलेल्या फिर्यादीनुसार सय्यद मसूद उर्फ असद गझनफर अली खतीब (रा. कोंडा नगर, सोलापूर), सय्यद नवेद हुसेन (रा. मगदूमिया बिल्डिंग, माहीम दर्गासमोर माहीम, मुंबई), सय्यद गझनफर अली खतीब (रा. कोंडा नगर, सोलापूर) आणि रईस अहमद इलाहीबक्ष दलाल (रा. सोलापूर) यांच्याविरुद्ध ३६ लाख रुपये फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आलाय. सहाय्यक पोलीस निरीक्षक अहिवळे या गुन्ह्याचा अधिक तपास करीत आहेत.

# धनगर समाजातील विद्यार्थ्यांसाठी राज्य सरकारची स्वतंत्र स्वयम योजना

**पिलीव/प्रतिनिधी**

## योजना २०२४-२५ पासून अंमलात येणार

महाराष्ट्रात सध्या मराठा व ओबीसी आरक्षणासाठी मोठी आंदोलने सुरु आहेत. धनगर समाज्याची सुद्धा आरक्षणाची अनेक दिवसाची मागणी प्रलंबित आहे. महाराष्ट्र शासनाने आदिवासी विकास विभागाच्या धर्तीवर स्वतंत्र स्वयम योजना राबविण्यास नुकतीच मान्यता दिली आहे. महाराष्ट्र शासनाने धनगर समाजातील विद्यार्थ्यांसाठी प्रथमच ही योजना सुरु केली आहे.

वसतिगृहापासून वंचित असणाऱ्या विद्यार्थीना सुद्धा याचा लाभ मिळणार आहे. या शिष्यवृत्तीसाठी अर्जदार धनगर समाजातील असावा,अर्जासोबत जात वैधता प्रमाणपत्र आवश्यक आहे, ज्या शहरातील शैक्षणिक संस्थेत प्रवेश घेतला आहे, त्याठिकाणचा रहिवासी नसावा, बारावी परिक्षेत किमान ६० टक्के गुण आवश्यक, प्रवेश घेतलेल्या अभ्यासक्रमाचा कालावधी दोन वर्षापेक्षा कमी नसावा, पालकांचे वार्षिक उत्पन्न २.५० लाखापेक्षा जास्त नसावे.

> बारावीनंतर मुंबई, पुणे,नागपूर किंवा इतर शहरात उच्च शिक्षण घेण्यासाठी जातात .या विद्यार्थीना प्रतिवर्ष ६० हजार रुपये, क वर्गातील महापालिका क्षेत्रातील विद्यार्थीनसाठि ५१ हजार रुपये, तर इतर ठिकाणी शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थनसाठी ४३ हजार रुपये प्रतिवर्ष शिष्यवृत्ती मिळणार आहे.

ही योजना २०२४-२५ पासून अमलात येणार आहे तरी जास्तीत जास्त धनगर समाजातील विद्यार्थ्यांनी या योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्यावतीने करणयात आले आहे.



# पोलीस भरतीसाठी विशेष बंदोबस्त

**सोलापूर/प्रतिनिधी**

समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र. १०, सोलापूर कार्यालयाच्या आस्थापनेवर सशस्त्र पोलीस शिपाई यांची एकूण २४० रिक्त पदांची सशस्त्र पोलीस शिपाई भरती २०२२-२३ ची प्रक्रिया १९जून ते ०७ जुलैया कालावधीत आयोजीत करण्यात आलेली आहे.

या प्रक्रियेमध्ये उमेदवारांची १०० मी धावणे ०५ किमी धावणे व गोळा फेक या मैदानी चाचणी घेण्यात येत आहेत. मैदानी चाचणीच्या वेळी काही उमेदवार शारिरीक क्षमता वाढविण्यासाठी उत्तेजित द्रव्य, स्टिरॉईड, गोळ्या (ढलश्रशीं) किंवा इंजेक्शन चा वापर करण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे मैदानी चाचणी दरम्यान उत्तेजित द्रव्यांचे गोळयांचे सेवन केल्यामुळे संबधीत उमेदवारांचे शरिरावर गंभिर परिणाम होण्याची शक्यता आहे व त्यामध्ये उमेदवारांचे जिवास धोका होवू शकतो असे वैद्यकिय अधिकाऱ्यांचे मत आहे.

या प्रकारच्या बाबींना आळा घालण्यासाठी या कार्यालयाकडून उत्तेजित द्रव्य, स्टिरॉईड, गोळ्या किंवा इंजेक्शन इ. साठी तपासणी पथक नेमण्यात आले असून प्रत्येकी ठिकाणी सीसीटीव्ही, हॅण्ड कॅमेरे लावण्यात आले आहेत. तसेच वैद्यकिय पथक नेमण्यात आले.

# प्रविण भरले खून प्रकरण : गुन्हा दाखल करण्याचे आदेश

**सोलापूर** : सोरेगांवातील प्रविण भरले संशयास्पद मृत्युप्रकरणी खुन करुन पुरावा नष्ट केल्याप्रकरणी न्यायालयाचे गुन्हा दाखल करण्याचे आदेश पोलिसांना देण्यात आले आहे.

याबाबत अधिक माहिती अशी कि, येथील रहिवासी नागनाथ कृष्णा भरले (वय-४४, रा. मु.पो. सोरेगांव, ता.उ. सोलापूर) यांचा मुलगा प्रविण भरले याच्या संशयास्पद मृत्युप्रकरणी प्राजाक्ता प्रमोद गायकवाड,अर्चना प्रमोद गायकवाड, श्रीधर प्रमोद गायकवाड (सर्व रा. राघवेंद्र नगर, सैफुल, सोलापूर),विकास जानराव (रा. माशाळ वस्ती), प्रकाश विश्वनाथ फुलमाळी, (रा.मु.पो. नंदुर, ता.द.सोलापूर),अनिल शिवाय (रा. माशाळ वस्ती) यांच्या विरुद्ध भा.द.वि. कलम ३०२, १२० (ब), २०१ व ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्याचे आदेश सोलापूर येथील प्रथम वर्ग न्यायाधिश एस. आर. सातभाई सो यांनी दिले.



# शंभर जन्मठेपांबद्दल १०० सामाजिक उपक्रमांचा मानस : ॲड. राजपूत

## दोन गुन्हेगारांना मरेपर्यंत फाशीची शिक्षा लावण्यामध्ये यश प्राप्त

- ॲड. प्रदीपसिंग एम. राजपूत यांनी महाराष्ट्रात उमटवला आपल्या कार्याचा ठसा
- जेष्ठ व नागरिकांतून कौतुकाचा वर्षाव

**सोलापूर/प्रतिनिधी**



सोलापूर जिल्हा व सत्र न्यायालय येथे प्रमुख जिल्हा सरकारी वकिल म्हणून ॲड, प्रदिपसिंग एम. राजपूत हे गेल्या ६ वर्षांपासून कार्यरत असून, ते त्यांचे काम अतिशय प्रामाणिकपणे, निःपक्षपणे चालवून शासनास व गोरगरिब जनतेला न्याय मिळवून देत आहेत. ॲड. प्रदिपसिंग एम. राजपूत यांनी त्यांच्या कार्यकाळामध्ये जवळपास १०० गुन्हेगारांना जन्मठेप, तर ०२ गुन्हेगारांना मरेपर्यंत फाशीची शिक्षा लावण्यामध्ये यश प्राप्त केले आहे. तसेच १ वर्ष ते २५ वर्षापर्यंतची देखील शिक्षा अनेक गुन्हेगारांना त्यांनी त्यांच्या कार्यकाळात लावलेली आहे.

तसेच अनेक राजकिय नेत्यांचे. समाजातील क्रूर गुन्हेगारांचे तसेच अनेक सराईत गुन्हेगारांचे जामीनाचे व अटकपूर्व जामीनाचे अर्ज देखील त्यांनी नामंजूर करून घेण्यात आपल्या कार्याचा ठसा संपूर्ण महाराष्ट्रात उमटविलेला आहे. सदर त्यांच्या कार्यामुळे त्यांचे संपूर्ण महाराष्ट्रातील जनतेकडून कौतुक होत असून, सोलापूर शहरातील सर्व सामान्य नागरिकांपासून ते ज्येष्ठथोरांकडून त्यांचे कौतुक होत आहे.

ॲड. प्रदिपसिंग एम. राजपूत यांनी सदर समाजाचे ऋण फेडण्यासाठी म्हणून व सामाजिक बांधिलकी म्हणून १०० जन्मठेपांबद्दल १०० सामाजिक उपक्रम राबविण्याचा संकल्प केला आहे.

सदर कार्यक्रम हा प्रदिपसिंग राजपूत यांचे मित्र परिवाराकडून पार पडणार असून, सदर कार्यक्रमात जास्तीत-जास्त लोकांनी सहभागी होवून रक्तदान करावे, असे आव्हान करण्यात आले आहे.

> **उद्या सामाजिक उपक्रम ..**
>
> सदर उपक्रमाचा शुभारंभ १०० जन्मठेपांबद्दल १०० सामाजिक उपक्रम असा बुधवार दि.०३जुलै २०२४ रोजी सकाळी १०.०० वाजता डॉ. हेडगेवार रक्तपेढी, जुना एम्प्लॉयमेंट चौक, सोलापूर येथे आयोजित केला आहे. सदर कार्यक्रमास सोलापूर जिल्हयाचे जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद, पोलीस आयुक्त एम. राजकुमार, पोलीस अधिक्षक शिरीष सरदेशपांडे, बार कौन्सील ऑफ महाराष्ट्र आणि गोवाचे सदस्य ॲड. मिलिंद थोबडे आणि सोलापूर बार असोसिएशनचे अध्यक्ष अमित आळंगे यांची उपस्थिती राहणार आहेत.

# दिव्यांगाच्या मानधनात वाढ करा दिव्यांग उद्योग समूहातर्फे निवेदन

**परंडा** : दिव्यांग व्यक्तींना शासनाकडून मिळत असलेल्या मानधनात वाढ करण्यात यावी अशी मागणी दिव्यांग उद्योग समूहाच्या वतीने तहसीलदार मार्फत मुख्यमंत्री उपमुख्यमंत्री यांच्याकडे करण्यात आली.

या निवेदनात असे म्हटले आहे की आंध्र प्रदेश राज्यात दिव्यांग व्यक्तींना सहा हजार रुपयांचे मानधन देण्याचा निर्णय तेथील राज्य सरकारने घेतला आहे त्याच धर्तीवर राज्य सरकारने दिव्यांग व्यक्तींचा उदरनिर्वाह भत्ता मानधनात वाढ करण्यात यावी. अशी मागणी दिव्यांग उद्योग समूहाचे संस्थापक अध्यक्ष तानाजी घोडके यांच्या मार्गदर्शनाखाली दिव्यांग बांधवांच्या वतीने करण्यात आली आहे.महाराष्ट्र राज्याने देशात पहिले दिव्यांग कल्याण मंत्रालय सुरू केले परंतु आजतागायत दिव्यांगाना त्याचा काही उपयोग झालेला नाही दिव्यांगाना पेन्शनच्या नावाने केवळ संजय गांधी निराधार योजनेचे केवळ तुटपुंजा १५०० रुपये एवढी रक्कम मिळत आणि तेही वेळेवर मिळत नाही. स्थानिक स्वराज्य संस्थाकडून ५७ टक्के दिव्यांग कल्याण निधी मिळतो तोही काहीना वाटपच करीत नाहीत असा प्रकार सध्या महाराष्ट्र राज्यात चालू आहे तरी या निवेदनाद्वारे उपमुख्यमंत्री उपमुख्यमंत्री यांनी दिव्यांगाच्या या विशेष घटकाकडे लक्ष देऊन दिव्यांगाना न्याय द्यावा अशी मागणी दिव्यांग उद्योग समूहाच्या वतीने करण्यात आले आहे



**परंडा: दिव्यांग उद्योग समूहाच्या वतीने तहसीलदार मार्फत मुख्यमंत्री उपमुख्यमंत्री यांच्याकडे करण्यात आली.**

# महाराष्ट्र शासनाच्या सिबीलशिवाय शेतकऱ्यांना पिक कर्जाच्या निर्णयाला बँकाकडून केराची टोपली

**पिलीव/प्रतिनिधी**

## शेतकरी वर्गांची कर्जासाठी ससेहोलपट

- सिबील स्कोरची जाचक अट रद्द करुन, मागेल त्या शेतकऱ्यांना पिक कर्ज ताबडतोब दयावे अशी मागणी
- सिबील स्कोरसाठी तीनशे रुपयाची आकारणी
- शेतकरीवर्गाला आर्थिक संकटाचा सामना करावा लागत आहे.

> सिबील स्कोरची जाचक अट शासनाने रद्द करुनही पिक कर्ज शेतकऱ्यांना न देणे अतिशय चुकीचे आहे. शासनाने याविषयी बँका,सोसायटी, जिल्हा बँक यांना स्पष्ट आदेश दयावेत.
>
> – **नबाजी मदने** शेतकरी कुसमोड.

महाराष्ट्रात शेती हा मुख्य व्यवसाय असणाऱ्या शेतकऱ्यांनच्या अडचणी काहीं केल्या कमी होईनात .शासनाने शेतकऱ्यांनविषयी अनेक चांगले निर्णय घेतले तरी त्याची अमंलबजावणी प्रभावीपणे न झाल्यामुळे शेतकऱ्यांन पाठीमागचे विघ्न काही केल्या कमी होत नाही. शासनाने शेतकरी मग तो अल्पभुधारक,अत्यल्पभुधारक असो यांना पिक कर्ज देताना कोणताही दुजा भेदभाव करु नये असे सांगितले आहे.

अडचणीत असणाऱ्या शेतकऱ्यांना पिक कर्ज देताना सिबील स्कोरची सक्ती अजिबात करु नये असे शासनाने आदेश दिले आहेत.मात्र सध्या शेतकऱ्यांना जिल्हा बँकेमार्फत पिक कर्ज देताना सोसायटयाकडून अगोदर सिबील स्कोर बघा तो चांगला असेल तरच तुम्हाला कर्ज मिळेल अन्यथा तुम्हाला कर्ज मिळणार नाही असे स्पष्ट सांगण्यात येत आहे. तुम्ही सोलापूर जिल्हा मध्यवर्ती बँकेत तीनशे रुपयांचे चलन भरुन सिबील स्कोर तपासा मगच तुम्हाला कर्ज रोखा दिला जाईल असा स्पष्टच आदेश दिला जात आहे. शासनाने सिबील स्कोरची अट काढुन टाकली आहे असे संबंधित अधिकाऱ्यांना सांगितले असता आमच्याकडे शासनाचा तसा आदेशच नाही आणी तुम्हाला हे कोणी सांगितले असे अधिकारी शेतकऱ्यांना म्हणत कर्ज नाकारात आहेत.

मग शासनाने नुसती घोषणाच केली आहे का ? ही पोकळ घोषणा आहे कि काय असा प्रश्न शेतकरी विचारीत आहेत. जिल्हा बँकेबराबर,राष्ट्रीयकृत बँक सुद्धा सिबील स्कोरची अट ठेवुन शेतकऱ्यांना पिक कर्ज नाकारत आहेत. शासनाने ताबडतोब याची प्रभावीपणे अमंलबजावणी करुन सिबील स्कोरची जाचक अट रद्द करुन मागेल त्या शेतकऱ्यांना पिक कर्ज ताबडतोब दयावे अशी मागणी अडचणीत असणाऱ्या शेतकऱ्यांनमधुन होत आहे.

गतवर्षी पाऊस नसल्याने खरीप हंगाम वाया गेला तसेच परतही पाऊस न झाल्यामुळे दुषकाळी परिस्थितीचा सामना करावा लागला सध्या शेतकरी प्रचंड आर्थीक अडचणींचा सामना करीत आहे यंदा पाऊसही वेळेत झाला आहे पण खते,बि बियाणे, मशागत ,औषधासाठी पैसे नाहीत


### जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषत: मौजे बार्शी व बार्शी तालुका जि. सोलापूर परिसरातील लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,

आमचे अशिल श्री. शिरीष धनंजय ताटे रा. सोमवार पेठ, बार्शी ता. बार्शी जि. सोलापूर यांचे शिवक्रांती प्रतिष्ठाण संस्थेचे बार्शी नोंद क्र. २७३५४ (सो) प्रमाणपत्र दि. २९/०६/२०२४ रोजी बार्शी येथील बस स्थानक येथे कोठेतरी पडुन गहाळ झालेले आहे. सदर संस्थेचे प्रमाणपत्र गहाळ झालेले आहे. त्याबाबत आमचे अशिलाने बार्शी शहर पोलीस स्टेशन सोलापूर येथे हरवलेल्या मालमत्तेचे नोंदणी क्रमांक ३७३/२०२४ अन्वये रितसर नोंद केलेली आहे.

सदरचा वर नमुद प्रमाणपत्र कोणास आढळुन आल्यास अथवा सापडुन आल्यास सदर संस्थेचे प्रमाणपत्र खालील पत्यावर आणुन द्यावा अथवा पोष्टाने पाठवून द्यावी. सदर संस्थेच्या प्रमाणपत्राचा दुरूपयोग होवू नये म्हणून हि जाहीर नोटीस दिली. ता. ०२/०७/२०२४

सही/-
अशिल
श्री. शिरीष धनंजय ताटे

सही/-
**ॲड. एस. यु. सोनवणे**
एम.बी.ए.एलएल.बी.
जिल्हा आणि सत्र न्यायालय, बार्शी,
जि. सोलापूर
मो. ९८३४५८७८२६

# रांझणी ते गारअकोले रस्ता रुंदीकरणासाठी ग्रामस्थ आक्रमक

## रस्ता रुंदीकरणासाठी मुंबई मंत्रालयावर ग्रामस्थांकडून धडकणार गाजर दिंडी

टेंभुर्णी/प्रतिनिधी

**माढा तालुक्यातील कोंढारभाग परिसरातील मुख्य दळणवळण असलेला राष्ट्रीय महामार्गाला जोडणारा प्रजिमा १२८ हा रस्ता रुंदीकरण करण्याच्या मागणीसाठी सध्या सुरू असलेल्या कामाला ग्रामस्थांनी तीव्र विरोध दर्शवून काम बंद करण्याचा इशारा दिला. या परिसरातील रस्त्यांची प्रचंड दुर्दशा झाल्याने नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे. सातत्याने होणाऱ्या अपघातांमुळे विद्यार्थी आणि नागरिकांना प्रवास करणे जिकिरीचे झाले आहे. त्यामुळे नागरिक रस्ता रुंदीकरण करण्याची मागणी करीत आहेत. मात्र, सार्वजनिक बांधकाम विभागाने रांझणी ते आलेगाव बुद्रुक येथील भैरवनाथ शुगर साखर कारखान्यापर्यंत फक्त पाच किमी रस्ता रुंदीकरण करण्याचा प्लॅन इस्टिमेट केल्याने नागरिकांनी संताप व्यक्त केला.**

- कोंढारभाग परिसरातील मुख्य दळणवळण असलेला राष्ट्रीय महामार्गाला जोडणारा प्रजिमा १२८ हा रस्ता रुंदीकरण करण्याच्या मागणीसाठी कामाला ग्रामस्थांचा तीव्र विरोध
- सार्व. बांधकाम विभागाने रांझणी ते आलेगाव बु. भैरवनाथ शुगर साखर कारखान्यापर्यंत पाच किमी रस्ता रुंदीकरण करण्याचा प्लॅन इस्टिमेट केल्याने नागरिकांनी संताप
- तत्कालीन खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर यांनी रांझणी ते गारअकोले रस्ता सुधारणा कामासाठी ३२ कोटी २० लाख मंजूर करून आणण्यात आले होते.
- उद्‌घाटनप्रसंगी खा. निंबाळकर यांच्या ताफ्यासमोर नागरिकांनी रस्ता रुंदीकरण करण्याच्या मागणीसाठी 'गाजरांचा' पाऊस पडला होता. तेव्हा खा. निंबाळकर यांनी मुख्यत्वे हा रस्ता सुधारणा व रुंदीकरण करण्याच्या प्लॅन इस्टिमेटमध्ये दुरुस्ती करण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या होत्या.





माढा : तालुक्यातील कोंढारभाव परिसरातील रांझणी ते गारअकोले रस्त्याची झालेली दुरावस्था व रुंदीकरण न करता पूर्वीप्रमाणेच सुरू असलेले रस्त्याचे काम तर दुसऱ्या छायाचित्रात ग्रामस्थांनी तीव्र विरोध दर्शवून काम बंद करण्याचा इशारा दिला.

### सार्वजनिक बांधकाम विभागाचा मुजोरीपणा

तत्कालीन खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर यांनी रांझणी ते गारअकोले रस्ता सुधारणा कामासाठी ३२ कोटी २० लाख मंजूर करून आणण्यात आले होते. उद्‌घाटनप्रसंगी खा. निंबाळकर यांच्या ताफ्यासमोर नागरिकांनी रस्ता रुंदीकरण करण्याच्या मागणीसाठी 'गाजरांचा' पाऊस पडला होता. तेव्हा खा. निंबाळकर यांनी मुख्यत्वे हा रस्ता सुधारणा व रुंदीकरण करण्याच्या प्लॅन इस्टिमेटमध्ये दुरुस्ती करण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या होत्या.

कोंढारभाग परिसरातील ग्रामस्थ, ग्रामपंचायतींनी कनिष्ठ अभियंता, उपविभागीय सार्वजनिक बांधकाम विभाग कुडूवाडी, कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग सोलापूर, मुख्य अभियंता पुणे सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, सार्वजनिक बांधकाममंत्री यांना निवेदने देऊन रस्ता रुंदीकरणाची मागणी केली होती. मात्र, संबंधित अधिकाऱ्यांनी ग्रामस्थांना रस्ता रुंदीकरण करण्याची हमी देऊनही ठेकेदारांसोबतच्या अर्थपूर्ण सबंधांमुळे हा रस्ता रुंदीकरण न करण्याचा घाट अधिकाऱ्यांनीच घातल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे.

रस्ता रुंदीकरणाच्या मागणीसाठी संतप्त झालेल्या नागरिकांच्या आरोपानंतर सुनील हेळकर, उपअभियंता सार्वजनिक बांधकाम, विभाग कुर्डूवाडी यांना जाब विचारताच त्यांनी प्रतिक्रिया देण्यास नकार देऊन पळ काढला.

> रांझणी-गारअकोले रस्ता रुंदीकरण करण्याची मागणी आम्ही ग्रामस्थ गेल्या दहा वर्षांपासून करीत आहोत. रुई म्हसोबा देवस्थानासह अन्य मोठी दोन देवस्थाने, शाळा-महाविद्यालये, साखर कारखान्यांची वाहतूक या मार्गावरून असल्याने सातत्याने वर्दळ असते. अरुंद रस्त्यामुळे अनेकांना प्राण गमवावे लागले आहेत. त्यामुळे हा रस्ता रुंदीकरण न झाल्यास सार्वजनिक बांधकाम विभाग कार्यालय, मुंबई मंत्रालयावर ग्रामस्थ गाजर दिंडी काढणार आहोत.
>
> **- हरिभाऊ माने.**

कोंढारभाग परिसरातील रांझणी, आलेगाव बुद्रुक, रुई, आलेगाव खुर्द, गारअकोले, टाकळी (टें), चांदज, आढेगाव या गावांमधून पुणे-सोलापूर राष्ट्रीय महामार्ग व पालखी महामार्गापासून जाणाऱ्या नीरा नरसिंगपूर राज्य मार्गाला या रस्त्याची कनेक्टिव्हिटी आहे. या मार्गावर रांझणी येथील ओंकारनाथ देवस्थान, रुई-म्हसोबा देवस्थान, गारअकोले-श्री स्वामी समर्थ देवस्थान असल्याने भाविकांची संख्या जास्त असते. रुई येथील म्हसोबा देवस्थानला सर्वाधिक भाविक संख्या असून दररोज हजारोंच्या संख्येने भाविक येतात. पूर्वीचा रस्ता रुंद असल्याने वाहनांची संख्या जास्त असल्यामुळे वारंवार अपघात घडत आहेत. त्यामुळे या परिसरातील नागरिक अनेक वर्षांपासून रस्ता रुंदीकरणाची मागणी करीत आहेत.

---


## संक्षिप्त वृत्त

### अनोळखी वाहनाच्या धडकेने दुचाकी चालक ठार

**टेंभुर्णी** : वेगाने जाणाऱ्या अनोळखी वाहनाच्या धडकेने दुचाकी चालक गंभीर जखमी होऊन मरण पावला. हा अपघात शनिवारी रात्रीच्या सुमारास घडला. शेखर बबन जाधव (वय वर्षे ४३, रा. कसबा पेठ, टेंभुर्णी) असे मयताचे नाव आहे. ते आपल्या दुचाकीवरून घारीवाल टाऊनशिप येथून घराकडे निघाले होते. त्यावेळी टेंभुर्णी ते अकलूजकडे जाणाऱ्या अज्ञात वाहनाच्या धडकेने ते गंभीर जखमी होऊन मयत झाले. या अपघाताची फिर्याद मयताचे बंधू संतोष जाधव (रा. कसबा पेठ टेंभुर्णी) यांनी पोलिसात दाखल केली. पुढील तपास फौजदार मोरे करीत आहेत.

### दुधाला पाच रुपये अनुदान जाहीर; प्रत्यक्षात लाभ किती होणार?

**पिलीव** : महाराष्ट्र शासन अडचणीत असणाऱ्या दूध उत्पादक शेतकऱ्यांना अडचणीतून बाहेर काढण्यासाठी प्रयत्न करीत आहे. मात्र याची प्रभावीपणे अमंलबजावणी होत नसल्यामुळे याचा लाभ बोटावर मोजण्याएवढ्याच दूध उत्पादक शेतकऱ्यांना होत आहे. यापूर्वीही शासनाने दूध



उत्पादक शेतकऱ्यांना प्रतिलीटर ५ रुपये अनुदान जाहीर केले होते. मात्र, जाचक अटींमुळे फार कमी शेतकऱ्यांना याचा लाभ झाला. आता शासनाने पुन्हा आजपासून दुधाला प्रतिलीटर ५ रुपये अनुदान जाहीर केले आहे खरे पण, याचा अडचणीत असणाऱ्या किती दूध उत्पादक शेतकऱ्यांना फायदा होणार हा खरा प्रश्न आहे. महाराष्ट्रात खाजगी दूध संघाकडून शेतकऱ्यांची प्रचंड लुबाडणूक सुरू आहे. शासनाने काहीही केलेतरी शासन निर्णयाला खाजगी दूध संघवाले राजकीय वरदहस्तामुळे जुमानत नाहीत, अशी विदारक परिस्थिती आहे. राज्यात दुधाची भेसळ हा फार मोठा विषय आहे. शासनाने जाहीर केलेले अनुदान फक्त शासकीय संघ देतात पण खाजगीवाले या निर्णयाला केराची टोपली दाखवतात. दुधाचा खरेदी दर २५ रुपये तर विक्री दर ५० रुपये प्रतिलीटर एवढा आहे. ही विदारक परिस्थिती कधी बदलणार आणि सर्वसामान्य दूध उत्पादक शेतकऱ्यांना खरा न्याय कधी मिळणार? हा खरा प्रश्न आहे.

> दुधाचे दर कमी झाल्यामुळे हा व्यवसाय करणे फार अडचणीचे झाले आहे. शासन अनुदान देते मात्र, जाचक अटींमुळे अनेकांना अनुदान मिळतच नाही.
>
> **- सुर्यकांत वाघमोडे, दूध उत्पादक शेतकरी.**

---

# स्वच्छ व सुंदर अभियानात अकलूज बसस्थानक प्रथम

## अकलूज बसस्थानकाला पाच लाखांचे बक्षिस





**अकलूज : स्वच्छ व सुंदर बसस्थानक अभियानांतर्गत अकलूज बसस्थानकाने प्रथम क्रमांक पटकवल्याबद्दल युवा सेना जिल्हा प्रमुख गणेश इंगळे, उपतालुका प्रमुख दत्ता साळुंखे, शहर प्रमुख शेखर खिलारे यांच्यावतीने आगार प्रमुख प्रमोद शिंदे यांचा सत्कार करण्यात आला.**

अकलूज/प्रतिनिधी

एस. टी. महामंडळाने घेतलेल्या स्वच्छ व सुंदर बसस्थानक अभियानांतर्गत 'ब' वर्गामध्ये पुणे प्रदेशंतर्गत सोलापूर विभाग मधील अकलूज बसस्थानकाने प्रथम क्रमांक पटकवल्याबद्दल युवा सेना जिल्हा प्रमुख गणेश इंगळे, तालुका प्रमुख सुभाष काकडे, उपतालुका प्रमुख दत्ता भाऊ साळुंखे, अकलूज शहर प्रमुख शेखर खिलारे यांच्यावतीने अकलूजचे आगार प्रमुख प्रमोद शिंदे यांचा सत्कार करण्यात आला. एस. टी. महामंडळाने १ मे २०२३ ते ३० एप्रिल २०२४ या काळात सर्व बस स्थानकावर हिंदुहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे स्वछ व सुंदर बस स्थानक अभियान राबविले होते.

स्पर्धेत अकलूज आगारस ५ लाखाचे प्रथम क्रमांकाचे बक्षीस मिळाले. ही स्पर्धा राज्यातील ५६३ बस स्थानकावर घेण्यात आली. याप्रसंगी गणेश भिताडे, चेतन खिलारे, आप्पा महाडिक, धनाजी मस्के, अकलूज आगारातील अधिकारी अनिरुद्ध सूर्यवंशी, सहा. कार्यशाळा अधीक्षक, वाहतूक नियंत्रक कांतीलाल मदने, एस. टी. कामगार संघटना अकलूज आगार अध्यक्षा विद्या साळुंके-माने, मधुकर हेटकळे, वाहन परीक्षक विलास निंबाळकर, वरिष्ठ लिपिक उदय दुपडे, कार्यशाळा सहाय्यक प्रवीण निर्धार उपस्थित होते.

### लोकसहभागातून विकास-

लोकसहभागातून बसस्थानकाचा विकास या संकल्पनेवर आधारित हे अभियान राबविण्यात आले होते. बसस्थानक परिसरातील सुशोभिकरण, आकर्षक रंगरंगोटी, मोकळ्या जागेत बाग बगीचा, वृक्षारोपण, पिण्याचे शुद्ध व थंड पाणी, सेल्फी पॉईंट इ. सुविधा अकलूज बसस्थानकावर करण्यात आल्या आहेत. अकलूज आगाराचा 'ब 'वर्ग बसस्थानक यामध्ये पुणे प्रदेशातून प्रथम क्रमांक आलेला आहे.

---

# लऊळ केंद्रातील ५०० विद्यार्थ्यांना शालेय साहित्यांचे वाटप



**माढा: अखिल भारतीय सेनेच्यावतीने शालेय साहित्य वाटप करताना गणेश नलवडे, सरपंच योगेश पाटील आदींसह मान्यवर.**

माढा/प्रतिनिधी

अखिल भारतीय सेनेच्यावतीने माढा तालुक्यातील लऊळ केंद्रातील जि. प. प्राथ. शाळेतील लऊळ, पडसाळी, व्होळे, उजनी या ठिकाणच्या जवळपास ५०० गुणवंत व गरजवंत विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करण्यात आले. यामध्ये स्कूल बॅग आणि वह्या पुस्तके याचा समावेश आहे. यावेळी भविष्यात विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासासाठी कायम सहकार्य करणार असल्याचे अखिल भारतीय सेनेचे माढा तालुका अध्यक्ष गणेश नलवडे यांनी सांगितले. ज्या त्या शाळेत गावातील प्रतिष्ठित मंडळी मुख्याध्यापक शिक्षक आणि अखिल भारतीय सेनेचे पदाधिकारी यांच्या समवेत समारंभपूर्वक वाटप करण्यात आले.

यावेळी पडसाळी गावचे सरपंच योगेश पाटील व्होळे गावचे सरपंच ज्योतीराम चोपडे, औदुंबर पाटील, ॲड. कल्याण वाळुजकर, स्वप्निल भाऊ जानराव, नीलकंठ लोकरे, राहुल भोंग, विनायक लंगोटे, पप्पुनाना भोंग, सौदागर लोकरे, मुन्ना शिरतोंडे,. कार्यक्रमाचे आयोजन अखिल भारतीय सेना माढा तालुका अध्यक्ष गणेश नलवडे यांनी केले होते.

---

# कुर्डूवाडी शहर व परिसरात पाऊस

कुर्डूवाडी/प्रतिनिधी

पंधरा दिवसांच्या पावसाच्या प्रतीक्षेनंतर कुर्डूवाडी शहरात व परिसरात रविवार दि. ३० रोजी पावसाला सुरुवात झाली आहे. यामुळे शेतकरी वर्गातून आनंद व्यक्त होत आहे. या पावसामुळे खरीप पेरणी झालेल्या व पेरणीसाठी तयार असलेल्या शेतकऱ्यांना लाभदायक ठरणार आहे.

गेल्या वीस पावसाने ओढ दिली होती. यामुळे खरीप पेरण्या केलेल्या शेतीपिके जुळू लागली होती. रविवारी दुपारी दोन वाजता पावसाला सुरुवात झाली. एक तार जोरदार पावस पडला. यानंतर रिमझिम पाऊस सुरू होता. या पावसामुळे अनेक



ठिकाणी विवाहाचे मुहूर्त असल्यामुळे नातेवाईकांची धावपळ सुरू झाली. या पावसामुळे शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे तर खरीप पिकांसाठी शेतकऱ्यांना पोषक वातावरण झाले असल्याचे शेतकऱ्यांतून बोलले जात आहे. उकाड्यांमुळे हैराण झालेल्या नागरिकांना पावसामुळे हवेत गारवा निर्माण झाला असून त्यांना दिलासा मिळाला आहे.

---

# माढा प्रहार दिव्यांग संघटनेचे रक्तदान शिबिर

कुर्डूवाडी/प्रतिनिधी

दिव्यांग बांधवांना आपल्या मागण्यांसाठी सरकारी कार्यालयात हेलपाटे मारताना नेहमीच हेळसांड होताना आपण पाहतो. मात्र, त्यांच्यातही किती सामाजिकता आहे हे त्यांनी दाखवून दिले. निमित्त होते ते प्रहार दिव्यांग संघटनेतर्फे कुर्डूवाडीत आयोजित रक्तदान शिबिराचे.

प्रहार संघटनेचे संस्थापक अध्यक्ष आ. बच्चू कडू यांनी राज्यात रक्ताचा तुटवडा निर्माण झाल्यामुळे, राज्यातील संपूर्ण प्रहार सेवकांना दि. २४ मे ते ३० जून दरम्यान रक्तदान



**कुर्डूवाडी : दिव्यांग संघटनेच्यावतीने आयोजित रक्तदान शिबिरात मोठ्या प्रमाणात दिव्यांग बांधवांनी सहभाग नोंदविला.**

करण्याचे आवाहन केले होते. आवाहनास प्रतिसाद देत माढा तालुका प्रहार दिव्यांग क्रांती संघटना यांच्याकडून, कुर्डूवाडी येथे रविवारी (दि. ३०) रक्तदान शिबीर घेण्यात आले. शिबिरात दिव्यांग बांधवांनी मोठ्या प्रमाणात रक्तदान केले. आम्ही शरीराने दिव्यांग असलो तरी मनानं नाही, अशा आर्विभावात आणि सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून दिव्यांगांनी उत्स्फूर्तपणे रक्तदान केले.

शहरातील बालोद्यान परिसरात जिल्हाध्यक्ष-दत्तात्रय चौगुले, संजीवनी बारंगुळे, सचिव-संजय जगताप, जिल्हा उपाध्यक्ष दत्तात्रय जमदाडे, विश्वास पारसे, हनुमंत चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली शिबिराचे आयोजन केले होते.

यावेळी प्रहार दिव्यांग संघटनेचे माढा तालुकाध्यक्ष विजय चव्हाण, महिला तालुकाध्यक्ष पुनम दाभाडे, उपाध्यक्ष गोरख देवकर, शहराध्यक्ष संतोष कांबळे, कौसर दाळवाले, अमोल खाडे, सागर सुराणा, प्रवीण पाटील, महावीर मुटकुळे, गीता लाडे, मंदा गोरे, श्रीकांत सुतार, नामदेव सावंत आदींनी परिश्रम घेतले.

---

# अकलूज सांगोला रस्त्याची दुर्दशा

## पालखी सोहळ्यापूर्वी खड्डे बुजवण्याची वेळापूर ग्रामस्थांची मागणी

- अकलूज-सांगोला मार्गावरील डॉ. उमेश नाईक यांच्या हॉस्पिटलसमोरील तीन ते चार ठिकाणी मोठ मोठे खड्डे पडले.
- अकलूज-सांगोला मार्गावरील रस्त्यामुळे नागरिक प्रवासी, हैराण
- अकलूज-सांगोला मार्ग बनला अपघातास निमत्रंण

वेळापूर/प्रतिनिधी

वेळापूरमधून जाणाऱ्या अकलूज सांगोला रोडची ठिकठिकाणी खड्डे पडल्याने मोठी दुर्दशा झाली आहे. संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्यास लाखो वारकऱ्यांच्या समवेत प्रारंभ झाला असून या पालखी सोहळ्याचा दि. १३ जुलै रोजी वेळापूर नगरीत मुक्काम येत असतो व वेळापूर नगरी सह या परिसरातील ग्रामीण भागातील भाविक ज्ञानेश्वर माऊलींच्या पादुकांचे दर्शन घेण्यासाठी येत असतात.

पालखी सोहळ्यापूर्वी अकलूज-सांगोला या मार्गावरील डॉ. उमेश नाईक यांच्या हॉस्पिटल समोरील तीन ते चार ठिकाणी मोठ मोठे खड्डे पडलेले आहेत यामुळे वाहतुकीला मोठा अडचण निर्माण झाले आहे.

जड वाहतुकीसही मोठी अडचण निर्माण होत आहे तसेच या ठिकाणाहून नागरिकांना शाळेसाठी विद्यार्थ्यांना जाताना तारेवरची कसरत करावी लागत आहे तसेच मोटर सायकल चालकांना मोटर सायकल चालवणे अवघड बनले आहे. तसेच या ठिकाणावरून दुचाकी वाहनांचे छोटे-मोठे अपघात ही झाले आहेत त्याचबरोबर पावसाळा सुरू झाला असून याठिकाणी सांगोलाकडून रोडवरुन उतारावरून पाणी वाहत येऊन मोठ्या प्रमाणात रोडवर पाणी जमा होते यामधील खड्डे न कळल्याने अनेक वेळा मोटार सायकल पडण्याचे वाहन चालक जखमी होण्याच्या घटना घडत असून संबंधित विभागाने याची दखल घेऊन रोडवरील सर्व खड्डे बुजवावेत, अशी वेळापूर ग्रामस्थांनी मागणी केली आहे.

### गेल्या तीन वर्षांपासून खड्ड्याने नागरिक त्रस्त

गेले तीन वर्षापासून डॉ. उमेश नाईक यांच्या हॉस्पिटलसमोर मोठमोठे खड्डे पडत आहेत. याबाबत वेळापूर ग्रामस्थांनी निवेदनही दिले आहे. त्याचबरोबर रिपाइं आठवले माळशिरस तालुका, स्वाभिमानी शेतकरी संघटना यांच्या वतीने ही खड्डे बुजवण्याबाबत आवाज उठवण्यात आला होता, खड्ड्याच्या ठिकाणी वेळापूर ग्रामपंचायत यांच्यावतीने हे मुरूम टाकण्यात आला होता. प्रत्येक वेळी खड्डे बुजवल्यानंतरही त्याच ठिकाणी मोठमोठे खड्डे पडत असून यामुळे सर्वांना त्याचा मोठा त्रास होत असून या रोडच्या संबंधित विभागाने रोडवरील खड्डे बुजून वारकऱ्यांना, ग्रामस्थांना, विद्यार्थांना त्रास होणार नाही याची काळजी घ्यावी.

**– वेळापूर सरपंच रजनीश बनसोडे.**





**वेळापूर: अकलूज-सांगोला रोडवर डॉ.नाईक यांच्या हॉस्पिटलसमोर ४ ते ५ ठिकाणी खड्डे पडले असल्याचे दिसत आहेत.**

# महापालिकेच्या दोन रोड स्वीपर मशीन अक्षरशः गंजत पडून

## महापालिका प्रशासनाचे अक्षम्य दुर्लक्ष !

## लाखो रूपयांचे नुकसान; मशीन भंगारत काढायची वेळ

✔ सोलापूर/प्रतिनिधी

महापालिकेच्या दोन रोड स्वीपर मशीन गाड्या राजमाता अहिल्यादेवी होळकर प्रसूती गृह (डफरीन हॉस्पिटल)च्या आवारात गेल्या अनेक वर्षांपासून अक्षरक्षः गंजत पडून आहेत. दुरुस्ती अभावी बंद असलेल्या या स्वीपर मशीन्समुळे अगोदरच लाखोंचा भुर्दंड महापालिकेला झाला आहे. आता बंद अवस्थेतील या वाहनांना भंगारात काढण्याकडेही महापालिकेचे दुर्लक्ष आहे. या भंगार गाड्यांमुळे या हॉस्पिटलच्या परिसरात अस्वच्छतेचे विदारक दृश्य दिसून येत आहे.



शहरातील रस्त्यांची यांत्रिकी पद्धतीने स्वच्छता करण्यासाठी सोलापूर महापालिकेने गेल्या तीन-चार वर्षांपूर्वी




सोलापूर : डफरीन हॉस्पिटलच्या आवारात गंजत आणि धूळखात पडलेली रोड स्विपर मशीन.

मोठा गाजावाजा करत दोन रोड स्वीपर मशीन खरेदी केल्या होत्या. तत्कालिन महापालिका आयुक्त पी. शिवशंकर यांच्या हस्ते याचे उद्घाटन करण्यात आले. या मशीनद्वारे रोज रात्री १० नंतर १२० कि.मी. मुख्य रस्त्यांची स्वच्छता करण्यात येणार होती. महापालिकेने नवी दिल्ली येथील कंपनीला या कामाचा मक्ता दिला होता. यासाठी प्रति रनिंग किलोमीटर १,१५५ रुपये दर आकारण्यात आला होता. मात्र या मशीन काही महिन्यातच बंद पडल्या. स्वच्छता करणारे ब्रश व इतर कारणास्तव मेंटेनन्स करता येऊ शकत नसल्याने कायमस्वरूपातच महापालिकेच्या मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या राजमाता अहिल्यादेवी होळकर प्रसूतीगृहाच्या आवारात त्या धुळखात पडून आहेत. या दोन स्वीपर मशीन पूर्णपणे गंजल्या आहेत. या दोन गाड्या बंद पडल्याने महापालिकेला लाखोचा भुर्दंड झाला. या स्लीपर मशीन गाड्या हॉस्पिटलच्या मधोमध पडून असल्याने या वाहनांच्या आजूबाजूला अस्वच्छता निर्माण झाली आहे. यामुळे डासांचे प्रमाण वाढत आहे. या बंद गाड्या तरी भंगारात काढायलाही महापालिकेला वेळ मिळेनासा झाला आहे.

### महापालिकेचे लाखो रूपये गेले धुळीत

शहरातील रस्त्यांची अत्याधुनिक मशीनच्या साहाय्याने स्वच्छता झाल्यामुळे धुळीचे प्रमाण कमी होईल या हेतूने महापालिकेने या स्वीपर गाड्या आणल्या होत्या. मात्र गाड्या आणल्यानंतर त्या कामी महिन्यांनी बंद पडल्या. याशिवाय या मशिनद्वारे रोजचे १२० कि.मी. चे उद्दिष्टही पूर्ण होत नव्हते. यात अधिकारी आणि ठेकेदार यांची मिलीभगत होती, असा आरोप होत आहे. त्यामुळे महापालिकेचे लाखो रूपये धुळीतच गेले आहेत.

### हॉस्पिटल आवारात अस्वच्छता

डफरीन हॉस्पिटल येथे बालाजी अमाईन्स कंपनीच्या सहकार्याने कोट्यावधी रुपये खर्च करून येथील प्रसूतिगृह अत्याधुनिकरण केले आहे. यामुळे येथील वातावरण, परिसर स्वच्छ व आरोग्यदायी ठेवणे आवश्यक आहे. इतकेच नव्हे येथेच महापालिका झोन कार्यालय आहे. तरीसुद्धा या आवारात ही वाहने धूळखात पडून असल्याने अस्वच्छतेचे विदारक चित्र पहायला मिळते.

### गाड्या इतर ठिकाणी हलवण्याची गरज

हॉस्पिटल ऐवजी इतर ठिकाणी या गाड्या हलवण्याची आवश्यकता आहे. मात्र याकडे महापालिका प्रशासनाचे अक्षम्य दुर्लक्ष होत आहे. नव्या आरोग्य अधिकारी डॉ. राखी माने यांनी यासंदर्भात लक्ष देण्याची गरज वर्तवली जात आहे.

---

## संक्षिप्त वृत्त



सोलापूरः विद्यार्थ्यांच्या सत्काराप्रसंगी उत्तमप्रकाश खंदारे, मिनाक्षी पेठे व इतर.

### क्रांतीसूर्य प्रतिष्ठानतर्फे गुणवंतांचा सत्कार

✔ **सोलापूर** : क्रांतीसूर्य प्रतिष्ठान च्या वतीने इयत्ता दहावी व बारावीतील उत्तीर्ण विद्यार्थी- विद्यार्थिनींचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून माजी क्रीडा राज्यमंत्री उत्तम प्रकाश खंदारे , सेवानिवृत्त पोलीस अधिकारी मिनाक्षी पेठे, माजी पी.एस.आय. अनिल उकरंडे, संगीता बिराजदार, अश्विनी लोंढे, संगीता धडे, संस्थेचे प्रमुख मार्गदर्शक शशिकांत उकरंडे आदी उपस्थित होते. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी नितीन बनसोडे, अंबादास भवाळे, अजय धडे, नंदकिशोर दिडवाणी, पांडुरंग अडसूळ इत्यादींनी परिश्रम घेतले आभार विजय लोंढे यांनी मानले.

### डॉ. मंजूषा शहा मिसेस डिजिटल क्वीनने सन्मानित



✔ **सोलापूर** : मिसेस इंडिया एम्प्रेस ऑफ द नेशन सीजन ५ ची अंतिम स्पर्धा २३ जून रोजी पुणे हायात येथे पार पडली. यात देशभरातील विविध प्रांतातील ५४ स्पर्धकांनी स्पर्धकांनी भाग घेतला होता. अंतिम फेरीसाठी आठ स्पर्धक निवडले गेले होते. यात सोलापुरातील भूलतज्ज्ञ डॉ. मंजुषा मिलिंद शहा यांना डिजिटल क्वीनने सन्मानित करण्यात आले. चार दिवस झालेल्या स्पर्धेची विभागणी तीन विभागात केली होती. त्यातील इलाईट कॅटेगरीमध्ये मिसेस डिजिटल क्वीनम्हणून डॉ. मंजुषा शहा यांची निवड झाली आहे. याबद्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

### समता परिषदेच्या सोलापूर महानगर उपाध्यक्षपदी अर्जुन माळी



✔ **सोलापूर** : अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषद सोलापूर महानगर संघटनेची बैठकीचा आयोजन केले होते. राष्ट्रीय नेते छगन मुजबळ यांच्या सूचनेनुसार सोलापूर महानगर उपाध्यक्षपदी अर्जुन माळी यांची एकमताने निवड करण्यात आली. समता परिषदेचे महानगराध्यक्ष शशिकांत कांबळे यांच्या हस्ते निवडीचे पत्र देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी अर्जुन माळी यांना पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या व प फुले शाहू आंबेडकर यांचे विचार तळागळापर्यंत पोहोचवून समता परिषदेच्या माध्यमातून सामाजिक कार्यात सतत सक्रिय राहावे, असे सांगण्यात आले. यावेळी समता परिषदेचे उपाध्यक्ष सचिन अक्कलकोटे उपाध्यक्ष इरफान शेख, शकील नदाफ राष्ट्रवादी काँग्रेसचे ओबीसी सेलचे शहराध्यक्ष अनिल छत्रबंद, विवेक फुटाणे, सोहेल यमनूर उपस्थित होते

### संघर्ष सेनेच्या युवक शहराध्यक्षपदी संदीप कांबळे



✔ **सोलापूर** : संघर्ष सेनेच्या वतीने नुकत्याच घेण्यात आलेल्या बैठकीमध्ये संघर्ष सेनेच्या युवक शहराध्यक्षपदी संदिप कांबळे यांची निवड करण्यात आली. बैठकीत अध्यक्ष म्हणून संघटनेचे संस्थापक शेखर बंगाळे होते. यावेळी संघटनेचे विचार व ध्येय धोरणाच्या माध्यमातून युवकांचे विविध प्रश्न प्रश्न सोडवू, असे नूतन युवक शहराध्यक्ष संदिप कांबळे यांनी व्यक्त केले. यावेळी संघर्ष सेनेचे ओबीसी अध्यक्ष गौरव तसेच डी.डी पांढरे, विशाल होसमनी, प्रतीक पवार, प्रविण चाफाकरंडे, भिमराव माने, बनसिध्द सलगर, जिगर लवटे, यांच्यासह अनेक बांधव उपस्थित होते.

## पाहिजेत

साईराम कंपनीत कामासाठी मुले, मुली व महिला पाहिजेत. वय - १८ ते ३५, शिक्षण अट नाही, पगार ९ ते १५ हजार. राहणे मोफत. संपर्क मो.: अकलूज : ९१५८७७०१६७, सांगोला : ९२०९३०५७१५ (२६४/०३०७२४)

सुराज्य सोलापूर Classified

**निवेदन** : या अंकात प्रसिध्द झालेल्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिध्द केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आवाहनाच्या सत्यतेबाबत 'सुराज्य' हमी घेऊ शकत नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

---

# नागरी सुविधांअभावी आठ नगरातील रहिवाशांचे हाल

### त्रस्त महिलांचे उपायुक्तांना निवेदन

✔ सोलापूर/प्रतिनिधी

## रस्ते, लाईट, ड्रेनेज पाणीपुरवठ्याचा उडाला बोजवारा



महापालिकेच्या अपुऱ्या सुविधांबाबत उपायुक्तांना निवेदन देण्यास आलेल्या महिला.

नीलम नगर परिसरातील तब्बल आठ नगरातील रस्ते, लाईट , ड्रेनेज, पाणीपुरवठा आदी नागरी सुविधांचा पुरता बोजवारा उडाला आहे. नागरी सुविधांअभावी येथील रहिवासी त्रस्त झाले आहेत. तातडीने सुविधा द्याव्यात या मागणीचे निवेदन येथील त्रस्त महिलांनी महापालिका उपायुक्त मच्छिंद्र घोलप यांना दिले आहे.

सोलापूर शहरातील नीलम नगर परिसरातील अंबिका नगर, कामाक्षी नगर, ईश्वर नगर, कमलेश्वर नगर, हिमगिरी नगर, विश्वास नगर, व्यंकटेश नगर या आठ नगरातील मूलभूत नागरी सुविधांचा बोजवारा उडाला आहे. यामुळे येथील त्रस्त महिलांनी थेट महापालिका गाठली. जनता दरबारात उपायुक्तांना विविध मागण्यांचे निवेदन दिले. या परिसरात रस्ते खड्डेमय झाले आहेत. काही नगरात तर रस्त्यांवर मुरूम टाकण्यात आला आहे. यामुळे नागरिकांना ये - जा करण्यात म अडचणी येत आहेत. लाईट बंद आहेत. ड्रेनेजसाठी रस्ता खोदल्याने या परिसरात यामुळे चिखल झाला आहे. या परिसरात पाच बोर आहेत पण पुरेसे पाणी येत नाही. काही ठिकाणी लाईटचे पोल उभारले नाहीत. नऊ दिवसाआड पाणीपुरवठा होत आहे.

टँकरची पुरेशी सोय करण्यात आली नाही. असा आरोप निवेदनात केला आहे. निवेदन देतेवेळी अंबिका देवकर, कमलाबाई पवार , चंदा शिंदे, अनुसया देवकर, बायम्मा चव्हाण, यल्लमा अलकुंटे, पार्वती पटेल, वनमाला बंदपट्टे, सुमित्रा गोट्याळ, सुनिता कानडे, मुमताज सय्यद आदींसह महिला उपस्थित होत्या.

### महापालिकेत आंदोलन करण्याचा इशारा

महापालिकेच्या अपुऱ्या सुविधांमुळे या भागातील नागरिकांना जगणे मुश्किल झाले आहे. कर भरूनही येथील आम्हाला मुलभूत सुविधा मिळत नाहीत, असा आरोप करत महिलांनी लवकरात लवकर सुविधा मिळाल्या नाहीत तर महापालिकेत आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे.

# मुंबईसाठी २५ सप्टेंबरपर्यंत धावणार विशेष रेल्वेगाडी

✔ **सोलापूर** : सोलापुरातून तिरुपती, मुंबई, पुणे, दौंडकडे जाणाऱ्या आणि येणाऱ्या रेल्वे गाड्यांच्या कालावधीत वाढ करण्यात आली आहे. त्यामुळे प्रवाशांची प्रवासाची चांगली सोय होणार आहे. सोलापूर - लोकमान्य टिळक टर्मिनस साप्ताहिक विशेष एक्स्प्रेस ही गाडी ६ ऑगस्ट ते २४ सप्टेंबर या कालावधीत धावेल. परतीची लोकमान्य टिळक टर्मिनस सोलापूर साप्ताहिक विशेष एक्स्प्रेस ही गाडी ७ ऑगस्ट ते २५ सप्टेंबर च्या दरम्यान धावणार आहे. सोलापूर-तिरुपती साप्ताहिक विशेष एक्स्प्रेस गाडी ४ जुलै ते २६ सप्टेंबर दरम्यान धावणार आहे. परतीची तिरुपती सोलापूर साप्ताहिक विशेष एक्स्प्रेस ही गाडी ५ जुलै ते २७ सप्टेंबर दरम्यान धावणार आहे. सोलापूर- दौंड आणि दौंड-सोलापूर दैनिक विशेष गाडी १ जुलै ते ३० सप्टेंबर दरम्यान धावणार आहे. सोलापूर-कलबुर्गी आणि कलबुर्गी- सोलापूर दैनिक विशेष गाडी १ जुलै ते ३० सप्टेंबर दरम्यान धावणार आहे, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

---

# सोलापुरात सर्वात स्वस्त वैद्यकीय उपचार मिळतात : डॉ. कुमठेकर



सोलापूर : डॉक्टर्स दिनानिमित्त आयोजित सत्कार कार्यक्रमात डॉ. शिरीष कुमठेकर, राजशेखर शिवदारे, प्रा. डॉ. येळेगावकर, प्रा. डॉ. तेली व इतर.

✔ सोलापूर/प्रतिनिधी

डॉक्टरी पेशा हा पवित्र पेशा मानला जातो. त्याला आता वैद्यकीय व्यवसायाचे स्वरूप प्राप्त झाले असले तरी सोलापुरातील काही डॉक्टर्स व रुग्णालये पुणे व मुंबईच्या तुलनेत दर्जेदार व उत्तम वैद्यकीय सेवा सोलापुरात स्वस्त दरात देत आहेत. त्यामुळेच सोलापूर हे वैद्यकीय व्यवसायाचे आंध्र, कर्नाटक आणि महाराष्ट्रातले सीमेवरचे मुख्य केंद्र झाले आहे, असे प्रतिपादन सुप्रसिद्ध शल्य चिकित्सक व कर्करोग तज्ञ डॉ. शिरीष कुमठेकर यांनी केले.

फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया सोलापूर शाखा, इंडियन रेड क्रॉस सोसायटी, व कॉलेज ऑफ फार्मसीच्या संयुक्त विद्यमाने डॉक्टरांचा सत्कार समारंभा प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. कुमठेकर बोलत होते. अध्यक्षस्थानी स्वामी समर्थ सहकारी सूतगिरणीचे चेअरमन राजशेखर शिवदारे हे होते.

यावेळी प्रा. डॉ. एन. बी. तेली, प्रा. डॉ. श्रीकांत येळेगावकर, डॉ. राजीव प्रधान, प्रा. भीमाशंकर शेटे, प्राचार्य डॉ. आर. वाय. पाटील, सुगतरत्न गायकवाड आदी उपस्थित होते.

स्वागत व प्रास्ताविक प्रा. डॉ. श्रीकांत येळेगावकर यांनी केले. मान्यवरांचा सत्कार प्रा. डॉ. एन. बी. तेली यांनी केला. सूत्रसंचालन सुगतरत्न गायकवाड यांनी केले तर आभार प्राचार्य डॉ. आर. वाय. पाटील यांनी मानले. या कार्यक्रमास कविवर्य मारुती कटकधोंड, जुळे सोलापूर म.सा.पचे अध्यक्ष पद्माकर कुलकर्णी, डॉ. किरण पाटणकर, डी फार्मसी कॉलेजचे प्राचार्य डॉ. जी. के. कापसे, प्रा. विजया राजोपाध्ये, विविध क्षेत्रातील प्राध्यापक व विद्यार्थी विद्यार्थिनी बहुसंख्येने उपस्थित होते.

---

# राष्ट्रवादी काँग्रेसकडून कृषी दिन साजरा

✔ सोलापूर/प्रतिनिधी




स्व. नाईक यांच्या प्रतिमेस अभिवादन करताना संतोष पवार, जुबेर बागवान व इतर.

१ जुलै कृषि दिन हरित क्रांतीचे जनक स्व.वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या वतीने त्यांचा प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन विनम्र अभिवादन करण्यात आले तसेच कृषी दिनाचे औचित्य साधून कृषी उत्पन्न बाजार समिती परिसरात शेतकरी शेतकरी बांधवांचा सन्मान करण्यात आला.

यावेळी जिल्हाध्यक्ष संतोष पवार कार्याध्यक्ष जुबेर बागवान उपस्थित होते. हा उपक्रम राष्ट्रवादी युवकचे अध्यक्ष सुहास कदम, कार्याध्यक्ष तुषार जक्का, संघटक दत्तात्रय बडगंची, महिला कार्याध्यक्ष चित्रा कदम, समन्वयक शशिकला कसपटे, विद्यार्थी अध्यक्ष पवन पाटील यांनी आयोजित केला होता.

याप्रसंगी जिल्हाध्यक्ष ज्येष्ठ नेते हेमंत चौधरी, जनरल सेक्रेटरी प्रमोद भोसले,आनंद मुस्तारे, इरफान शेख, बाबू पटेल, अहमद मासूलदार, आयुब शेख, वैभव गंगणे, शामराव गांगर्डे यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या सर्वच फ्रंटल सेल पदाधिकाऱ्यांची मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# भाविकांना दर्शन रांगेत पाणी बॉटलसह लिंबू पाणी देणार

## जिल्हाधिकाऱ्यांनी दिली माहिती

✔ सोलापूर/प्रतिनिधी

आषाढी एकादशी पंढरपूर यात्रा काळात पंढरपुरात येणाऱ्या भाविकांना दर्शन रांगेत लिंबू पाणी, तसेच एक लिटर पाणी बॉटल देण्यात येणार आहे. यासाठी जिल्हा प्रशासनाकडून सव्वा कोटींची निविदा काढल्याची माहिती जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिली आहे.

पंढरपूर शहर व परिसरात स्वच्छता, पिण्याचे स्वच्छ पाणी, शौचालय, वारकऱ्यांच्या राहण्याच्या व्यवस्थेसह स्वच्छ वारी, निर्मलवारी, तसेच यात्रा काळात प्रमुख चौकांमध्ये सुशोभीकरण, तसेच विद्युत रोषणाई व्यवस्थेसाठी राज्य शासनाने पाच कोटी निधी मंजूर केल्याचीमाहितीदेखील जिल्हाधिकाऱ्यांनी दिली. विशेष म्हणजे, यंदा डीपीसीमधून साडेचार ते पाच कोटींचा निधी वारीसाठी देण्यात येणार आहे.

सीसीटीव्ही, तसेच पब्लिक अनाउन्समेंट सिस्टम, तसेच सार्वजनिक ठिकाणी लायटिंग अन् सुशोभीकरणासाठी दोन कोटींचा निधी, असे एकूण साडेचार कोटींचा निधी पंढरपूर वारीसाठी मिळणार आहे. बुधवारी पंढरपूर आषाढी यात्रा होणार आहे.

वारकऱ्यांची व्यवस्था करण्यासाठी, तसेच त्यांच्या सुरक्षेच्या दृष्टीने नियोजन करण्यासाठी जिल्हा नियोजन समितीकडून साडेचार कोटींचा निधी देण्याची सूचना पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी केली आहे. त्यानुसार कार्यवाही सुरू झाली आहे.

डीपीसीकडून पंढरपूर नगरपालिकेला सदर निधी देण्यात येणार आहे. प्रस्तावित निधी नगरपालिकेकडून खर्च करण्यात येणार आहे.

---

# जिल्ह्यातील मध्यम व लघू तलावात पाणीसाठा वाढला

## यंदा चांगला पाऊस; नद्या, ओढे भरून वाहू लागले

✔ सोलापूर/प्रतिनिधी

मागील वर्षी अत्यल्प पावसाने कोरडे राहिलेल्या तलावात यंदा जून महिन्यातच पाणी येऊ लागले आहेत. मध्यम व लघू अशा २१ तलावात पाणीसाठा झाला आहे. मध्यम तलावात दीड टीएमसी पाणीसाठा झाला आहे.

यंदा जिल्ह्यात जून महिन्यात यंदा चांगला पाऊस पडला आहे. त्यामुळे जिल्ह्यातील नद्या व ओढे भरून वाहिले आहेत. जून महिन्यात भीमा, सीना, नागझरी व इतर नद्यांना पाणी आल्याने लवकर उन्हाळा कमी झाला आहे. मागील वर्षी जून महिन्यात अल्पसा पाऊस पडला होता. जुलै महिन्यात सरासरीपेक्षा



अधिक पाऊस पडला होता मात्र जून व ऑगस्ट महिन्यात फारच कमी पाऊस पडल्याने पावसाळ्यातही उन्हाळ्यासारखी परिस्थिती जाणवत होती. पाऊस कमी पडल्याने जिल्ह्यातील मध्यम व लघू तलाव कोरडे राहिले होते. पूर्ण पावसाळ्यात चार-सहा तलाव सोडले तर इतर मध्यम व लघू तलाव कोरडेच राहिले होते. भरोश्याचा पाऊस म्हणून परतीचा पाऊस दरवर्षी जिल्ह्यात दरवर्षी पडतो. मागील वर्षी परतीच्या पावसानेही दगा दिला होता. यावर्षी जून महिन्यात जिल्ह्याच्या वर्षाच्या सरासरीच्या ४० टक्क्यांपर्यंत पाऊस पडला आहे. दमदार पाऊस पडलेल्या तालुक्यातील तलावात पाणीसाठा झाला आहे. जिल्हातील एकरुख (तळेहिप्परगा) तलावात ०.५७ टीएमसी तर मांगी, जवळगाव, आष्टी, बोरी, हिंगणी, पिंपळगावढाळे या मध्यम तलाव झालेल्या साठ्यासह दीड टीएमसी पाणीसाठा झाला आहे..

केवळ जून महिन्यात साडेसात टक्के पाणीसाठा झाला आहे.जिल्हातील ५५ मध्यम तलावांपैकी १६ तलावात कमी-अधिक प्रमाणात पाणी आले आहे.

### शहर- जिल्ह्यात भरलेल्या तलावांची टक्केवारी

होटगी तलाव ५० टक्के भरला असून कारी ५२ टक्के, वैराग ४४ टक्के, गोरमाळे २९ टक्के, कळंबवाडी २६ टक्के, शेळगाव २३ टक्के, म्हसेवाडी ३७ टक्के, घेरडी ३२ टक्के, जवळा २५ टक्के, कासेगाव व ममदापूर प्रत्येकी १९ टक्के, पडवळकरवाडी २० टक्के, चिंचोली ९ टक्के, राजुरी १३ टक्के, वालवड १४ टक्के व कोरेगाव १७ टक्के, असे ७.८७ टक्क्यांपर्यंत पाणी साठले आहे.



# शेतकऱ्यांना मोफत वीज; महावितरणलाच दिलासा



**मुंबई :** उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी शेतकऱ्यांना मोफत विजेची घोषणा केली असली तरी गेली काही वर्षे केवळ पाच-दहा टक्केच बिलवसुली होत असल्याने बहुतांश कृषीपंपांसाठी सध्या एकप्रकारे मोफतच वीजपुरवठा होत आहे. विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर केलेल्या घोषणेचा मोठा राजकीय लाभ मिळण्याची सत्ताधारी पक्षांच्या नेत्यांना अपेक्षा आहे. मात्र त्यापेक्षा कृषी वीजबिलाची रक्कम राज्य सरकारकडून मिळणार असल्याने महावितरणला अधिक आर्थिक दिलासा मिळणार आहे.

राज्यात सध्या सुमारे ४६ लाखांहून अधिक कृषीपंप असून सरकार ७.५ अश्वशक्तीपर्यंतच्या कृषीपंपांना मोफत वीज पुरविणार आहे. या निर्णयाचा लाभ ४४ लाख सहा हजार शेतकऱ्यांना होईल, असे अजित पवार यांनी अर्थसंकल्पात घोषणा करताना सांगितले होते. सध्या कृषीग्राहकांना प्रतियुनिट सुमारे दीड रुपयाप्रमाणे बिल पाठविले जाते. वार्षिक सुमारे सहा हजार कोटी रुपयांची बिले पाठविली जातात. त्यापैकी केवळ पाच टक्के म्हणजे २८०-३०० कोटी रुपयांपर्यंतच बिल वसुली होते. काही काळापूर्वी हे प्रमाण आठ-दहा टक्क्यांवर गेले होते, अशी माहिती महावितरणच्या अधिकाऱ्यांनी दिली. त्यामुळे सध्या एकप्रकारे ९५ टक्के कृषीपंपांच्या बिलांची वसुली होत नाही व मोफतच वीज पुरविली जात आहे.

कृषी वीजबिलाची थकबाकी ४५ हजार कोटी रुपये आहे. सर्व ग्राहकांची एकूण थकबाकी ७४ हजार कोटी रुपयांच्या घरात असून उपसा सिंचन योजना, शासकीय कार्यालय, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या दिवाबत्ती योजना आदींच्या वीजबिलांची थकबाकीही आठ हजार कोटी रुपयांहून अधिक आहे.

सरकारने कृषीपंपांसाठी मोफत वीज पुरविण्याचा घेतलेला निर्णय स्वागतार्ह आहे. पण त्यापोटीचा निधी आणि शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या बिलांची थकबाकी सरकारने महावितरणला नियमितपणे द्यावी. सध्या कृषीपंपांच्या वीजबिलाची थकबाकी ४५ हजार कोटी रुपयांपर्यंतच गेली आहे. त्यामुळे ही थकबाकी देण्याचाही निर्णय सरकारने घेतल्यास महावितरणला दिलासा मिळेल.

# एका दिवसात ३.५ लाख सातबारा उतारे निघाले; तब्बल ४५ लाखांचे उत्पन्न!

पुणे/प्रतिनिधी

**खरीप पीककर्ज तसेच पीक विम्यासाठी शेतकऱ्यांना सध्या सातबारा आणि आठ अ उतारे काढावे लागत आहेत. मात्र, ही सुविधा आता ऑनलाइन असल्याने तलाठ्यांच्या कार्यालयात हेलपाटे मारण्याची गरज भासत नाही.**

त्यामुळेच राज्यात बुधवारी (दि. २६) एका दिवसात सुमारे तीन लाख उतारे डाऊनलोड करण्याचा विक्रम घडला. यातून महसूल विभागाला तब्बल ४५ लाख रुपयांचे उत्पन्न मिळाले आहे.

राज्यात सप्टेंबर २०१९ पासून सातबारा उतारे ऑनलाइन पद्धतीने डिजिटल स्वरूपात उपलब्ध करून देण्यात आले आहेत. तत्कालीन जमाबंदी आयुक्त एस. चोक्कलिंगम व राज्य समन्वयक रामदास जगताप यांच्या प्रयत्नांतून ही संकल्पना राबविण्यात आली.

**राज्यातील स्थिती १ एप्रिल ते २६ जूनपर्यंत**

सातबारा उतारे – ६२,४९,९००
आठ अ – २२,१७,०००
फेरफार – ३,७१,०००
मिळकत पत्रिका – ३,२७,८००
महसूल – १६ कोटी २० लाख रुपये

यासाठी महाभूमी या पोर्टलवरून सातबारा, आठ अ, मिळकत पत्रिकांचे उतारे सहज डाऊनलोड करता येतात.



डिजिटल स्वाक्षरीत ७/१२ - DIGITALLY SIGNED 7/12

Do you Know ULPIN (आपल्याला युलपिन क्रमांक माहिती आहे का ?) :

जिल्हा (District):
तालुका (Taluka):
गाव (Village):
(Search Survey No./Gat No.):
(Select Survey No./Gat No.):

महाभूमी पोर्टलवरून बुधवारी रात्री बारा वाजेपर्यंत सुमारे २ लाख ९३ हजार ९०० सातबारा, आठ अ, मिळकत पत्रिकांचे उतारे डाऊनलोड करण्यात आले.

त्यातून महसूल विभागाला सुमारे ४५ लाख रुपयांचे उत्पन्न मिळाले. सर्वाधिक उतारे डाऊनलोड करण्याचा हा एका दिवसातील उच्चांक ठरला आहे. यात २ लाख २ हजार ८०० सातबारा, ७६ हजार ६०० आठ अ, ८ हजार ६०० फेरफार तसेच ५ हजार ९०० मिळकत पत्रिका आहेत.



# पाऊस कमी, पेरण्या खोळंबल्या! पिकविमा विमा रखडला

**मागच्या काही दिवसांपासून राज्यात मान्सूनच्या पावसाचा (चेपीप ठरळप) जोर कमी झाल्यामुळे पेरण्या खोळंबल्याचे चित्र आहे. तर पेरण्या झाल्या नसल्यामुळे शेतकऱ्यांना अद्याप पीक विमा अर्ज करण्यासाठी अडथळे येत आहेत. शेतकरी जोरदार पावसाची वाट पाहत आहेत. तर ज्या भागांत पाण्याची उपलब्धता आहे अशा भागांतील शेतकऱ्यांनी पेरण्या आवरून घेतल्या आहेत. पण दुष्काळी भागातील पेरण्या (डुब्लपस) अद्याप रखडलेल्या आहेत.**

दरम्यान, मागच्या हंगामात राज्यातील १ कोटी ७० लाख शेतकऱ्यांनी पंतप्रधान पीक विमा योजनेचा लाभ घेतला आहे. तर राज्य सरकारकडून याही वर्षी एक रूपयांत पीक विमा योजनेचा (झचत्रहृध) लाभ शेतकऱ्यांना देण्यात येणार आहे. विमा हप्त्याची रक्कम थेट केंद्र आणि राज्य सरकारच्या तिजोरीतून विमा कंपन्यांना जाणार आहे. पण यंदा राज्यात पेरण्या खोळंबल्या असून कृषी विभागाच्या अद्ययावत माहितीनुसार आत्तापर्यंत म्हणजे २८ जून पर्यंत केवळ २८ लाख ३१ हजार शेतकऱ्यांनीच पिक विम्यासाठी अर्ज केले आहेत.

**विभागनिहाय शेतकरी अर्ज**

कोकण विभाग – ८ हजार ६९४
नाशिक विभाग – १ लाख ७९ हजार
पुणे विभाग – ३ लाख ६६ हजार
कोल्हापूर विभाग – ३५ हजार १८४
छ. संभाजीनगर विभाग – ९ लाख ५९ हजार
लातूर विभाग – ७ लाख ७८ हजार
अमरावती विभाग – ४ लाख १० हजार
नागपूर विभाग – ९७ हजार

छत्रपती संभाजीनगर विभागातील सर्वांत जास्त शेतकऱ्यांनी विम्यासाठी अर्ज केले असून एकूण अर्जाच्या ३३ टक्के शेतकरी केवळ छत्रपती संभाजीनगर विभागातील आहेत. तर सर्वांत कमी पिकविमा अर्ज हे कोकण आणि कोल्हापूर विभागातून आले आहेत. कोकणातून केवळ ८ हजार तर कोल्हापुरातून केवळ ३५ हजार शेतकऱ्यांनी पिकविम्यासाठी अर्ज केला आहे.

# उस्मानाबाद मधून आलेल्या ड्रॅगन फ्रूटची मागणी वाढतेय

सोलापूर/प्रतिनिधी

**सोलापूरमधील खासगी बाजारपेठमध्ये आलेले ड्रॅगन फ्रुटचे आकर्षण वाढत असून खरेदीसाठी झुंबड उडत आहे. प्रती नग आणि किलोप्रमाणे हे ड्रॅगन मिळत आहेत.**

तुळजापूर, उस्मानाबाद, सांगली परदेशात येथील फळ उत्पादक शेतकऱ्यांनी उत्पादित केलेले ड्रॅगन फ्रूट हे दुर्मिळ फळ सोलापूरच्या व्यापाऱ्यांनी उपलब्ध केले आहे. रंगभवन,सात रस्ता येथे विविध आकारात ड्रॅगन फ्रूट विक्रीस ठेवल्याचे दिसून आले. हे फळ शरीरासाठी थंडावा, उष्णता कमी करणारे आहे. सर्व स्तरातील लोकांना खाण्यासाठी उपयुक्त आहे. वरून खडबडीत असले तरी देखील आतील गर हा गुलाबी आणि पांढरा रंगाचा व मोहरी सारखे गोड,थोडं रसाळ असल्याने खाण्याऱ्यांची हौस एकदम स्वस्त,आरोग्यदायी फळ आहे.

सोलापूरमधील ग्राहकांना हे फळ जुने जरी असले तरी देखील ऋतूमानाप्रमाणे हे फळ विक्रीसाठी उपलब्ध होत आहे. पावसाळ्यात याची आवक होत असल्याने आणि मागणी वाढली आहे. आकारमानानुसार प्रति नग १० रुपये ते ५० रुपये ,किलो ८० ते १०० रुपये विक्री होताना दिसत होत आहे.

पावसाळ्यातच ड्रॅगन हे फळ सोलापूर, तुळजापूर येथून आणले जाते. सोलापूरमधील काही व्यापारी ऋतूमानाप्रमाणे फळे विक्रीसाठी उपलब्ध करून देतात. किलो प्रमाणे उपलब्ध असून २०० शे क्विंटल आवक झाली आहे.
– **मतीन बागवान** व्यापारी, सोलापूर

ग्राहकांना आवडेल असे आकार,वान नुसार,नग आणि किलो मध्ये विक्री केली जात असून ग्राहक समाधानी असल्याने आम्ही खुश आहोत.
– **मुस्तफा शेख** विक्रेता रंगभवन सोलापूर

आरोग्यासाठी उपयुक्त असलेले हे फळ सोलापूर मधील फळ विक्रेत्यांनी उपलब्ध करून दिले आहे. हे फळ स्वस्त असल्याने ग्राहकांना खुश करत आहे.
– **गोकुळ कुलकर्णी**–ग्राहके.





# सोलापूरच्या मार्केट यार्डात कांद्याची विक्रमी आवक
## १५ कोटीहून अधिक उलाढाल

सोलापूर/प्रतिनिधी

सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये सोलापूरसह परराज्यातून मोठ्या प्रमाणात कांद्याची आवक आली असून सोमवारी १५ कोटी ९५ लाख ६२०० ची उलाढाल झाली असल्याचे कांदा विभागाच्या वतीने सांगण्यात आले.

सोलापूरसह कर्नाटक, तेलंगणा, विजापूर येथून मोठ्या प्रमाणात ६५ ट्रकच्या माध्यमातून १२ हजार २७४ अधिक क्विंटल आवक झाली आहे. सोलापूर बाजार समितीमध्ये ५०० रुपये पासून ३६०० प्रति क्विंटल भाव चालू असल्याचे कांदा विभागाच्या वतीने सांगितले आहे.

खासगी बाजार पेठ मध्ये ४० ते ५० प्रति किलो,१०० रुपये ला अडीच किलोचा भाव मिळत आहे. भारताचे अर्थकारण पूर्णपणे कांदे आणि बटाटेच्या किमतींवरच आहे. सर्व सामान्य ग्राहक मात्र किलोच्या भावाने खरेदी करत असल्याने महागाई फटका सर्व सामान्यांच्या खिशाला बसत आहे.

कांद्याची आवक मोठ्या प्रमाणात होत आहे.लहान मोठा कांदा पाहून भाव ठरत आहे.सरासरी ५०० रुपये पासून ३५०० प्रति क्विंटल होलसेल भाव मिळत आहे.
– **सलील बागवान** व्यापारी

प्रति किलो ४० रुपये भाव,१०० रुपये अडीच ते तीन किलो असे किरकोळ विक्री केली जात आहे.ग्राहक येतात पण भाव विचारून निघून जात आहेत.
–**एजाज शेख** किरकोळ विक्रेता

# शेतकऱ्यांसाठी भावांतर योजना राबविण्याची गरज

नागपूर/प्रतिनिधी

**केंद्र सरकारच्या सीएसीपी आणि राज्य सरकारने काढलेल्या महाराष्ट्रातील १० पिकांच्या उत्पादन खर्चात तसेच राज्य सरकारने शिफारस केलेल्या आणि केंद्र सरकारने जाहीर केलेल्या किमान आधारभूत किमतीत (एमएसपी) मोठी तफावत असल्याचे सीएसीपीच्या एमएसपी रिपोर्टवरून स्पष्ट झाले आहे. त्यामुळे राज्यातील शेतकऱ्यांनी एमएसपी दराने शेतमालाची विक्री केल्यास त्यांना तोटाच सहन करावा लागणार आहे. हा तोटा भरून काढण्यासाठी राज्यात भावांतर योजना लागू करणे आणि दरातील तफावतीची रक्कम शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा करणे आवश्यक आहे.**



राज्य सरकारने सन २०२४-२५ च्या खरीप विपणन हंगामासाठी (घहरीळष इशरीप) राज्यातील खरीप पिकांचा उत्पादन खर्च आणि त्याच पिकांच्या एमएसपीची शिफारस केंद्र सरकारच्या सीएसीपी (कमिशन ऑन ग्रिकल्चरल कॉस्ट एंड प्राइजेस) ला सादर केली. यात राज्य सरकारने कापसाचा उत्पादन खर्च प्रतिक्विंटल ८,३७७ रुपये काढला आणि कापसाला ९,६३४ रुपये प्रतिक्विंटल एमएसपी जाहीर करण्याची शिफारस केली. दुसरीकडे, सीएसीपीने महाराष्ट्रातील कापसाचा उत्पादन खर्च प्रतिक्विंटल ६,४५३ रुपये काढला आणि लांब धाग्याच्या कापसाची एमएसपी ७,५२१ रुपये प्रतिक्विंटल तर मध्यम लांब धाग्याच्या कापसाची ७,१२१ रुपये प्रतिक्विंटल जाहीर केली. यात महाराष्ट्रातील शेतकऱ्यांनी एमएसपी दराने कापूस विकला तर त्यांना प्रतिक्विंटल किमान २,५९३ रुपयांचे नुकसान सहन करावे लागणार आहे.

राज्य सरकारने धानाचा उत्पादन खर्च ४,०५३ रुपये प्रतिक्विंटल काढला असून, ४,६६१ रुपयांच्या एमएसपीची शिफारस केली. सीएसीपीने मात्र ३,५२० रुपयांचा उत्पादन खर्च काढला आणि साधारण धानाची एमएसपी २,३०० रुपये तर ग्रेड ए धानाची एमएसपी २,३२० रुपये जाहीर केली. त्यामुळे धान उत्पादकांना प्रतिक्विंटल २,३६९ रुपयांचे नुकसान सोसावे लागणार आहे.

राज्य सरकारने सोयाबीनचा उत्पादन खर्च प्रतिक्विंटल ६,०३९ रुपये काढला असून, केंद्राकडे ६,९४५ रुपये एमएसपीची शिफारस केली. सीएसीपीने महाराष्ट्रातील सोयाबीनचा उत्पादन खर्च प्रतिक्विंटल ४,४२८ रुपये काढला आणि ४,८९२ रुपये एमएसपी जाहीर केली. त्यामुळे सोयाबीन उत्पादकांना प्रतिक्विंटल किमान २,०५३ रुपयांचे नुकसान सहन करावे लागणार आहे. ही स्थिती राज्यातील ज्वारी, बाजरी, मका, तूर, मूग, उडीद व भुईमूग या पिकांचीही आहे.

**किमान दीडपट दर द्या**

एमएसपी ही त्या पिकाच्या उत्पादन खर्चाच्या दीडपट जाहीर केली जात असल्याचा दावा केंद्र सरकारच्यावतीने वारंवार केला जात आहे. केंद्र व राज्याने काढलेल्या एकाच पिकाच्या एमएसपी दरात मोठी तफावत दिसून येत आहे. त्यामुळे राज्य सरकारने कापसाला किमान प्रतिक्विंटल १२ हजार रुपये, धानाला सहा हजार रुपये, सोयाबीनला नऊ हजार रुपयांप्रमाणे उर्वरित इतर सात पिकांना दर द्यावे. त्या पिकांचे बाजारभाव आणि राज्य सरकारने जाहीर केलेल्या उत्पादन खर्चाच्या दीडपट रक्कम यातील तफावत शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा करावी.

**काय आहे भावांतर योजना**

देशात भावांतर योजना केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चव्हाण यांनी मुख्यमंत्री असताना सन २०१७ मध्ये मध्य प्रदेशात सर्वप्रथम लागू केली होती. यात त्यांनी शेतमालाचा बाजारभाव आणि एमएसपी यातील फरकाची रक्कम शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा केली होती. ज्या शेतमालाचे दर एमएसपीपेक्षा कमी होते आणि सरकारने त्या शेतमालाची एमएसपी दराने खरेदी केली नव्हती, अशावेळी त्यांनी ही योजना राबविली होती. याच धर्तीवर राज्य सरकारने त्यांच्याच आकडेवारीच्या अनुषंगाने ही योजना राज्यात राबवायला हवी.

# स्वच्छतेचा संदेश देणाऱ्या पंचायत समितीत महिलांची कुचंबना

- स्वच्छ शौचालय नसल्याने महिलांना सहन करावा लागतोय नाहक त्रास
- स्वच्छतागृह असून अडचण नसून खोळंबा अशी अवस्था
- महिला कर्मचाऱ्यांसह अधिकाऱ्यांनी घेतली गांधारी भूमिका

पंढरपूर/दिनेश खंडेलवाल

पर्यावरणाची स्वच्छतेची वारी पंढरीच्या दारी म्हणत देहू आळंदीहून पंढरपूर पर्यंत येणाऱ्या सर्व पालख्या मध्ये स्वच्छते बाबत प्रबोधन केले जाते. प्रशासनाकडून ही स्वतंत्र वारी पंढरपुरात आल्यानंतर येथील पंचायत समितीमध्ये त्याचा समारोप होतो. परंतु याच पंचायत समितीमध्ये असलेल्या स्वच्छतागृहाची दुरावस्था झाल्यामुळे महिला वर्गाची मोठी कुचंबना होत आहे. एकीकडे प्रशासन स्वच्छतेच्या प्रबोधनासाठी मोठा निधी खर्च करत असतानाच दुसरींकडे मात्र निधी येऊनही स्वच्छतेची दुरावस्था पाहायला मिळते.

या ठिकाणी असलेल्या स्वच्छतागृहात तसेच परिसरात घाणीचे साम्राज्य, दुर्गंधी, पाण्याचा दुष्काळ, अस्वच्छतेने व्यापले आहे. पंचायत समिती मध्ये असलेले महिला कर्मचारी व अधिकार्यांनी याबाबत गांधारिची भूमिका घेतली असून स्वच्छतेकडे दुर्लक्ष केल्याचे दिसून येत आहे.

पंचायत समितीच्या आवारात असलेले स्वच्छतागृह म्हणजे असून अडचण नसून खोळंबा अशा अवस्थेत असल्याने महिला वर्गातून मोठ्या प्रमाणात संताप व्यक्त होत आहे. पंढरपूर तालुक्याच्या ग्रामीण भागातून तसेच शहरातील विविध भागातून कामानिमीत्त शहर व ग्रामीण भागातील महिला भगिनी येत असतात. परंतु या ठिकाणी शेकडो महिलांना स्वच्छतागृहाची पुरेशी सोय नसल्याने मोठ्या प्रमाणात नाहक त्रास सहन करावा लागत आहे. दरम्यान पंचायत समितीकडून गेल्या अनेक वर्षात याबाबतीत कोणतेही ठोस पावले उचलली जात नसल्याने केवळ दिखाव्या साठी स्वच्छता दिंडी समारोपात प्रबोधन केले जाते का? असा प्रश्न महिला वर्गातून उपस्थित केला जात आहे.

पंढरपूर पंचायत समिती ही श्री विठ्ठल रुक्मिणी देवस्थानामुळे संपूर्ण राज्यभरातून येणाऱ्या भाविक भक्तांना परिचीत असलेली पंचायत समिती आहे. या पंचायत समिती मध्ये आषाढी तसेच कार्तिकी वारीच्या दरम्यान स्वच्छता दिंडीच्या मार्फत थेट मुख्यमंत्री किंवा उपमुख्यमंत्र्यांच्या हस्ते या दिंडीचा समारोप करून संपूर्ण राज्यभरातील भाविक भक्तांसाठी स्वच्छतेचा संदेश दिला जातो. तसेच स्वच्छतेच्या कामांसाठी दरवर्षी कोट्यावधी रुपयांचा खर्चही केला जातो. तर दुसरींकडे मात्र पंचायत समितीच्या दुर्लक्षामुळे येथे कामासाठी येणाऱ्या शेकडो महिलांना स्वच्छतागृहाची पुरेशी सोयच नसल्याने मोठी कुचंबना व त्रास सहन करावा लागत असल्याने संताप व्यक्त केला जातो. पंचायत समितीच्या पाठीमागील बाजूस पुरुषांसाठी मुतारीची तसेच स्वच्छतागृहाची सोय आहे.

### स्वच्छतेसाठी वर्षा शिंदे यांनी दिला इशारा

राष्ट्रवादी कॉंग्रेस अजित पवार गटाच्या सोलापूर जिल्हा महिला अध्यक्षा वर्षाताई शिंदे यांनी पंचायत समिती मधील स्वच्छतागृह व परिसरातील सर्व ठिकाणाची पाहणी करून गटविकास अधिकारी यांना भेटून निवेदन दिले. यामध्ये येणाऱ्या आषाढी सोहळ्याच्या अगोदर स्वच्छतागृहाबाबत सर्व सुविधा महिलांसाठी उपलब्ध करून द्याव्यात. अन्यथा आंदोलन करावे लागेल असा इशारा दिला आहे. यावेळी त्यांच्या समवेत राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी तालुकाध्यक्षा ॲडवोकेट सुकेशिनी बागल, तालुका उपाध्यक्षा रूपाली रंधवे, रेखा यादव, तालुका सदस्या वर्षा भोसले आदी महिला भगिनी उपस्थित होत्या.

# आषाढी वारीत झेडपी ठेवणार १ हजार स्नानगृहासह ४ हजार शौचालये; स्वच्छतेचे अप टू डेट नियोजन

## दहा मानाच्या पालख्यांना ६० ठिकाणी ही सुविधा देण्यात येणार

सोलापूर/प्रतिनिधी

जिल्हा परिषदेच्या वतींने संत ज्ञानेश्वर पालखी मार्ग व संत तुकाराम महाराज यांचे सह दहा पालखी मार्गावर ४ हजार तात्पुरती शौचालये उभारणेत येत आहेत. या बरोबरच एक हजार स्नानगृहे देखील उभारणेत येत असल्याची माहिती जिल्हा परिषदेच्या प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी मनिषा आव्हाळे यांनी दिली.

पालखी मार्गावर जिल्हा परिषदेच्या सिईओ मनिषा आव्हाळे यांनी सुविधांची पाहणी करून करून कामे वेगाने पुर्ण करणेचे सुचना दिल्या. भाविका साठी विविध सुविधा देणेत येत आहेत. दहा मानाच्या पालख्यांना ६० ठिकाणी ही सुविधा देणेत येत आहे. पालखी मार्गावर स्वच्छतेसाठी जाणीवपुर्वक प्रयत्न करणेत येत असून निर्मल वारी अभियान यशस्वीपणे राबविणे साठी वारकरी व ग्रामस्थांनी सहभागी व्हावे असे आवाहन सिईओ मनिषा आव्हाळे यांनी केले आहे.

जिल्हा परिषदेचे सर्व विभाग या साठी प्रयत्न करीत आहेत. वारकरी बांधवांना पालखी मार्गावर आरोग्य सुविधा बरोबर स्वच्छता व पिण्याचे पाणी व स्नानगृहाची सुविधा देणेत येत आहे.

**एक हजार स्नानगृहे :** शौचालयासाठी २३७ लोक काम करीत आहेत. चार पाळ्यात हे काम सुरू राहणार आहे. स्वच्छतेसाठी ३४ मैला गाळ उपसणारे मशीन असणार आहेत. ३४ जेटींग मशीन असून एक हजार स्नानगृहे असणार आहेत. पालखी मार्गावर ८२ चेजींग रूम असणार आहेत. महिलांना कपडे बदलणे साठी चेजींग रूम ची सुविधा करणेत येत आहे.

**३१२ प्लास्टिक संकलन :** पालखी मार्गावर ३१२ ठिकाणी प्लास्टिक संकलन केंद्रे असणार आहेत. पालखी मार्ग निर्मल करणे साठी प्रशासनाचे प्रयत्न असणार आहेत. मार्गावर कुठेही प्लास्टिक दिसणार नाही. प्लास्टिकचा वापर कमी करणे साठी भाविकांना आवाहन करणेत येत असून वापरात आलेले प्लास्टिक संकलन केंद्रात टाकणे साठी ३१२ ठिकाणी प्लास्टिक संकलन केंद्रात प्लास्टिक टाकणेची व्सवस्था करणेत आली आहे. मार्गावर जर पाचशे मीटरवर तसेचपालखी तळावर मुक्कामाचे व विश्रांतीचे ठिकाणी ही व्यवस्था असणार असल्याचे सिईओ आव्हाळे यांनी सांगितले.

# लक्ष्मी टाकळीतील रस्त्यांसाठी दहा लाखाचा निधी

## डीपीडीसी सदस्य महेश साठे यांनी सोडवला प्रलंबित रस्त्याचा प्रश्न

पंढरपूर/प्रतिनिधी



**पंढरपूर : पंढरपूर तालुक्यातील मौजे लक्ष्मी टाकळी येथील उपनगरामध्ये अनेक ठिकाणी रस्त्यांचे डीपीडीसी सदस्य महेश साठे यांनी आपल्या फंडातून दहा लाख रुपयांची मदत करत रस्त्यांच्या कामाचे भूमिपूजन करण्यात आले.**

पंढरपूर तालुक्यातील मौजे लक्ष्मी टाकळी येथील उपनगरामध्ये अनेक ठिकाणी रस्त्यामुळे वाहतुकीला अडचणी निर्माण होत असून त्या परिसरात राहणाऱ्या नागरिकांना चांगल्या प्रकारे वाहतूक व्हावी, रस्त्यावरून ये जा करणे सोयीचे व्हावे या उद्देशाने डीपीडीसी सदस्य महेश नाना साठे यांनी आपल्या फंडातून दहा लाख रुपयांची मदत करत विविध ठिकाणी असलेल्या रस्त्यांपैकी काही रस्त्यांच्या कामाचे भूमिपूजन महेश नाना साठे यांच्या माध्यमातून करण्यात आले आहे.

मौजे लक्ष्मी टाकळी येथील प्रतिभाताई परिचारक नगर मधील शिंदे सर येथील गल्ली, अकबर आतार व सर्व गोड गल्ली, कट्टी सर विटकर गल्ली या तिन्ही गल्लीमध्ये महेश नाना साठे डीपीडीसी सदस्य तथा शिवसेना सोलापूर लोकसभा संपर्कप्रमुख यांच्या फंडामधून कॉंक्रिटीकरण व खडीकरणासाठी दहा लाख रुपये देण्यात आले.

यावेळी महेश नाना साठे बोलताना म्हणाले की राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे मुळे मला जिल्हा नियोजन समिती सदस्य पदी संधी मिळाली आहे. त्यामुळे मी पंढरपूर व सोलापूर जिल्ह्यातील जनतेच्या विविध विकास कामांना निधीच्या स्वरूपात अंशतः न्याय देऊ शकलो आहे. येणाऱ्या काळामध्ये देखील जास्तीत जास्त प्रमाणामध्ये कसं या संधीचं सोनं करता येईल यावर भर देण्याचा प्रयत्न केला जाईल.

विशेष म्हणजे सोलापूर जिल्ह्यातील मुख्यमंत्री शिंदे यांचे अतिशय विश्वासू म्हणून महेश नाना साठे यांच्याकडे पाहिले जाते. त्यामुळे पंढरपूर मंगळवेढा येथील नागरिकांकडून महेश नाना साठे यांच्या बद्दल अपेक्षा वाढत आहेत.

या भूमिपूजन प्रसंगी उपस्थित महेश नाना यांचे मोठे बंधू तथा लक्ष्मी गावचे सरपंच संजय साठे ग्रा .स. त्यांच्या मातोश्री सौ नागरबाई साठे ग्रा.स. त्यांच्या वहिनी सौ रेश्मा साठे, ग्र .स .त्यांच्या पत्नी सौ रोहिणी साठे, ग्रा.स.सागर सोनवणे, सागर कारंडे, शिंदे सर, कुलकर्णी काका, जाधव सर, कट्टी सर, शिंदे मॅडम, हुसेन तांबोळी ,देवल साहेब, ननवरे साहेब, अकबर आतार, राजू शेख, विटकर, कोकाटे साहेब, नितीन खडतरे, सौरभ नाटिळक,आसबे सर, औदुंबर पोतदार, इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

# ॲड. मीनलताई साठेंची जुलैमध्ये माढा विधानसभा मतदारसंघात जनसंवाद यात्रा

## कॉंग्रेसकडूनच इच्छुक मात्र गरज पडलीच तर हाती तुतारी घेण्याची तयारी

माढा/प्रतिनिधी

येत्या जुलै महिन्यापासून माढा विधानसभा मतदारसंघातील जनतेच्या समस्या जाणून घेण्यासाठी जनसंवाद यात्रा काढणार असल्याची माहिती माढ्याच्या नगराध्यक्षा ॲड मिनलताई साठे यांनी पत्रकार परिषदेत सांगितले .

माढ्याच्या नगराध्यक्षा मिनलताई साठे यांनी राष्ट्रवादी कॉंग्रेसचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्यासह उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या भेटी घेतल्याची चर्चा तालुक्याच्या राजकारणात रंगत असतानाच मूळच्या कॉंग्रेसच्या असणाऱ्या मीनल साठे यांनी ही जागा कॉंग्रेस पक्षाला सुटण्याची अपेक्षा ठेवली आहे. जर राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या शरद पवार गटाला जर ही जागा राहिलीच तर परिस्थितीनुसार राष्ट्रवादी कॉंग्रेसची तुतारी हाती घेण्याची तयारी ठेवत कोणत्याही परिस्थितीमध्ये येऊ घातलेली विधानसभा लढवायचीच असा चंग कॉंग्रेसचे नेते दादासाहेब साठे व नगराध्यक्ष मीनल साठे यांनी एकत्रित घेतलेला पत्रकार परिषदेत जाहीर केल्याने तालुक्यासह जिल्ह्यातील राजकीय वर्तुळामध्ये खळबळ माजली आहे.



मीनल साठे



दादासाहेब साठे

पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नावरती उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची आपण भेट घेतलेली नसल्याचं दादासाहेब साठे यांनी आवर्जून सांगितलं. याच वेळी शरद पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांची एका कौटुंबिक कार्यक्रमात भेट झाली होती यावेळी कोणत्याही प्रकारची राजकिय चर्चा झालेली नाही. आम्ही महाविकास आघाडीच्या माध्यमातून कॉंग्रेस पक्षाकडे इच्छा व्यक्त केलेली आहे. महाविकास आघाडीच्या माध्यमातून कॉंग्रेसने ही जागा घेत आम्हाला तिकिट द्यावे ही अपेक्षा आहे. मात्र महाविकास आघाडीमध्ये जर ही जागा राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षालाच राहिली तर कॉंग्रेस पक्षाच्या ज्येष्ठ नेत्यांशी चर्चा करून आवश्यकता वाटलीच तर राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या शरद पवार गटाकडून सुद्धा आम्ही निवडणूक लढवणार असा ठाम निर्धार यावेळी दादासाहेब साठे आणि मीनल साठे यांनी संयुक्तपणे पत्रकारांना सांगितला.

माढा शहरातील विकास कामांसाठी दिलेला निधी आणि किल्ला माढेश्वरी देवी मंदिर तसेच क्रीडा संकुल याची आमदार बबनराव शिंदे यांनी केलेली पाहणी हा येऊ घातलेल्या विधानसभा निवडणुकीच्या दृष्टीने फार्स आहे .या कामासाठी सातत्याने या अगोदरच नगरपंचायतीच्या वतीने पाठपुरावा केलेला आहे. माढाच्या पाणीपुरवठा योजनेसाठी सुद्धा जवळपास ५० कोटी रुपयांचा प्रस्ताव शासन दरबारी दिलेला आहे निवडणुका जवळ येत असल्याकारणाने श्रेय मिळवण्याच्या उद्देशाने आमदार शिंदे प्रयत्न करत असल्याची टीका यावेळी दादासाहेब साठे यांनी केली

# विविध गावातील नागरिकांनी घेतली जलदूत राजू खरेंची भेट

पंढरपूर/प्रतिनिधी



**मोहोळ : ग्रामस्थांनी गावच्यावतीने राजु खरे यांचा पुष्पहार घालून सन्मानपूर्वक सत्कार केला. औंढी येथील ग्रामस्थ अर्चना बिस्किटे आर डी शिंदे विश्वजीत बिस्किटे, सचिन आगलावे, मंगेश जाधव**

मोहोळ विधानसभा राखीव मतदार संघातुन आगामी विधानसभा निवडणुक रिंगणात पुर्ण ताकदिनीशी उतरण्याची तयारी केलेले जलदूत राजु खरे यांचे भेटीसाठी कार्यकर्त्यांसह मोहोळ तालुक्यातील विविध गावातील नागरिकांनी मोठी गर्दी केली असुन शनिवार २९ रोजी गोपाळपूर येथील त्यांचे निवासस्थानी टाकळी सिकंदर, नळी, औंढी, खंडाळी येथील ग्रामस्थांनी गर्दी केली होती. यावेळी त्यांचेही गावांतर्गत विविध विकासाभिमुख मुद्यावर चर्चा करण्यात आली.

मोहोळ विधानसभा मतदार संघातुन ईच्छुक असणारे आणि सर्व सामान्य जनतेत मिसळुन सामाजिक कामासह या भागात वैयक्तिक पातळीवर जनतेच्या समस्या प्राधान्यक्रमाने सोडविण्यावर राजू खरे यांचा प्रभाव असल्याने आत्तापर्यंत विविध गावांत शैक्षणिक, क्रिडा, वैद्यकीय मदत मोठ्या प्रमाणात त्यांचे माध्यमातून सुरू आहे. यामुळे समस्या घेऊन येणार्या नागरिकांना कोणत्याही माध्यमातून मदत केली जात असल्याने गोपाळपूर ता. पंढरपूर येथील खरे यांचे निवासस्थानी शनिवार आणि रविवार मोठी गर्दी होत आहे.

नागरिकांच्या अडचणी सोडविण्यावर भर देणारे उद्योजक राजाभाऊ खरे यांचेकडे या भागातील सामान्य नागरिक हक्काचा माणुस म्हणुन पाहत आहे.

गेले चाळीस ते पंचेचाळीस वर्षे राजकीय व सामाजिक क्षेत्रांत वावरणाऱ्या खरे यांना जनतेच्या सुख दुःखांची नस सापडली आहे. म्हणूनच जनतेत त्यांची ओळख सर्वसामान्य जनतेचे असामान्य

नेतृत्व, वृद्धांचा व निराधारांचा आधार तसेच मोठ्याआजाराने पिडीत झालेल्या रुग्णांसाठी मोफत सेवा देणारा देवदूत अशी झाली आहे.

शनिवारी गोपाळपूर याठिकाणी सिकंदर टाकळी येथील ग्रामस्थांनी भेट दिली यावेळी टाकळी, नळी, खंडाळी, औंढी ग्रामस्थांनी केली गावांतर्गत विकासावर चर्चा करण्यात आली.

यावेळी मोहोळ मतदार संघातील टाकळी सिकंदर येथील सागर वसेकर, शब्बीर पठाण, सुरेश वसेकर, अमुलाल पठाण, नितीन चोपडे, चंद्रकांत भानवसे, फयाज मुलाणी, बशीर पठाण, ईमुलाल पठाण, अभिजीत वसेकर, किरण वसेकर यांनी विविध विकासाभिमुख मुद्यावर चर्चा केली यावेळी

नळी येथील ग्रामस्थांच्यावतीने उपसरपंच कडप्पा कांबळे, ग्रामपंचायत सदस्य साहेबराव घोडके, सिद्धराम आठवले, संतोष आठवले, सुरेश आठवले माजी ग्रामपंचायत सदस्य, ग्रामस्थ यांनीही गावांतर्गत अडचणीबाबत चर्चा केली.

ग्रामस्थांनी गावच्यावतीने राजु खरे यांचा पुष्पहार यालून सन्मानपूर्वक सत्कार केला. औंढी येथील ग्रामस्थ अर्चना बिस्किटे आर डी शिंदे विश्वजीत बिस्किटे, सचिन आगलावे, मंगेश जाधव, ग्रामस्थ यांनीही उद्योजक खरे यांची भेट घेत गावातील विविध समस्यावर चर्चा करण्यात आली.





**अक्कलकोट : पंचायत समिती सभागृह येथे हरितक्रांतीचे जनक कै.वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त याप्रसंगी मार्गदर्शन करताना गटविकास अधिकारी शंकर कौतिके.**

# स्व. वसंतराव नाईकांच्या जयंतीनिमित्त कृषी दिन साजरा

**अक्कलकोट :** महाराष्ट्र शासन कृषी विभाग व पंचायत समिती अक्कलकोट यांच्या संयुक्त विद्यमाने पंचायत समिती सभागृह येथे हरितक्रांतीचे जनक कै.वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त कृषी दिन साजरा करण्यात आला.

कै. माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या प्रतिमा पूजनाने कार्यक्रमाचा प्रारंभ झाला कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गट विकास अधिकारी शंकर कवतिके होते. याप्रसंगी मार्गदर्शन करताना गटविकास अधिकारी शंकर कौतिके म्हणाले शेतकरी बंधूंनी केवळ पारंपारिक शेतीच्या भरवशावर न राहता आधुनिक शेती तंत्रज्ञान आत्मसात केले पाहिजे सर्वात महत्त्वाचे मातीचे परीक्षण करून घ्या ज्यामुळे आपल्या शेतात कोणते पीक चांगल्या प्रकारे येऊ शकते याची माहिती मिळते शेती करत असताना खतांचा अतिरेक सुद्धा टाळला पाहिजे. खतांचा समतोल राखा पाणी बचतीचे तंत्रज्ञान वापरा आणि शेती फुलवा असे आवाहन केले. तालुका कृषी अधिकारी हर्षद निगडे यांनी बोलताना कृषी विभागाच्या महाडीबीटी पोर्टल वरील विविध योजनांचा व महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी १०० टक्के अनुदानावर फळबाग लागवड नाविन्यपूर्ण बाब म्हणून शेतीला रेशीम उद्योगाची जोड द्यावी. रेशीम उद्योगासाठी शासनाने एकरी ४ लाख रुपये पर्यंत अनुदान देत आहे.

# पंढरीत येणाऱ्या भाविक आणि वारकऱ्यांना सेवा देण्यासाठी जिल्हा परिषद प्रशासन सज्ज

**सोलापूर : जिल्हा परिषद प्रशासनाच्या वतीने पंढरीत येणाऱ्या वारकरी आणि भाविकांसाठी तब्बल २९९ टॅंकरली शुद्ध पाण्याचा पुरवठा करण्यात येणार असून इतरही सुखसोयी वारकऱ्यांना देण्यात येणार असल्याची माहिती जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मनीषा आव्हाळे यांनी दिली.**

- २९९ टॅंकरने शुध्द पाण्याचा पुरवठा करण्यात येणार
- मुख्य कार्यकारी अधिकारी मनिषा आव्हाळे यांची माहिती

आषाढी वारी २०२४ अंतर्गत सोलापूर जिल्हयात मानाच्या १० पालख्यांच्या मार्गावरील ७७ गावामध्ये वारक-यांसाठी १९२ शासकिय व ९७ खाजगी व इतर १० असे एकूण २९९ टॅंकरने पिण्यासाठी पुरेसा व शुध्द पाणी पुरवठा करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

वारीसाठी सोलापूर जिल्हयात श्री. संत ज्ञानेश्वर महाराज यांची पालखी दि. १० जुलै २०२४ रोजी तर श्री. संत तुकाराम महाराज यांची पालखी दि. ११ जुलै २०२४ रोजी प्रवेश करीत आहे. जिल्हयात ९ तालुक्यात श्री. संत ज्ञानेश्वर महाराज, श्री. तुकाराम महाराज, श्री. संत मुक्ताबाई, श्री. संत सोपानकाका महाराज, श्री. संत निवृत्तीनाथ महाराज, श्री. संत एकनाथ महाराज, श्री. संत गजानन महाराज, श्री. संत निळोबाराय महाराज, श्री क्षेत्र कौडण्यपूर, श्री. संत योगीराज चांगावटेश्वर महाराज या दहा मानाच्या पालख्या प्रवेश करतात. त्यामुळे सदर मानाच्या १० पालख्यांच्या मार्गावरील ७७ गावामध्ये वारक-यांसाठी १९२ शासकिय व ९७ खाजगी व इतर १० असे एकूण २९९ टॅंकरने पिण्यासाठी पुरेसा व शुध्द पाणी पुरवठा करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.



“ या टॅंकरमध्ये पाणी भरण्यासाठी बोअर व विहीर अशा एकूण ७९१ स्त्रोत निश्चित करून या स्त्रोतांचे जलशुध्दीकरण करण्यात आले आहे. तसेच पाणी शुध्दीकरणासाठी प्रती २५ किलोचे १ हजार ५३० इतकी पोती टी.सी.एल. पावडरचा पुरवठा पालखी मार्गावरील ग्रामपंचायतींना करण्यात आला आहे.

**-सुनिल कटकधोड, कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग**



“ आषाढी वारीमध्ये सहभागी झालेल्या वारक-यांना पिण्यासाठी शुध्द पाणी पुरवठा करण्यासाठी ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, उपविभाग, आरोग्य विभाग तसेच ग्रामपंचायतीमधील अधिकारी व कर्मचारी यांची जबाबदारी निश्चित करण्यात आली आहे. सदर अधिकारी व कर्मचारी यांना पाणी पुरवठा नियमन करणे, टी.सी.एल. पावडरचा पुरवठा करणे, पाणी स्त्रोतांच्या ठिकाणी दिवाबत्तीची सोय करणे, टैंकर भरण्याच्या जागा निश्चित करणे, पालखी मार्गावरील सर्व उदभवांचे सर्वेक्षण करणे, पाणी नमुने तपासणी करणे, पाणी शुध्दीकरण करून पुरवठा करणे या कामांची जबाबदारी देण्यात आली आहे.

**-अमोल जाधव, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी व स्वच्छता)**

“ पालखी मार्गावरील पिण्याच्या पाण्याच्या सर्व उदभवांचे सर्वेक्षण करणे, पाणी नमुने तपासणी करणे आणि वारक-यांना पाणी शुध्दीकरण करून पुरवठा करणे आदी कामे अतिशय जबाबदारीने करण्यासाठी आरोग्य विभागाचे अधिकारी व कर्मचारी हे दक्षता घेत आहे.

**-डॉ. संतोष नवले, जिल्हा आरोग्य अधिकारी**

# १ लाख २३ हजार पदे भरूनही राज्यात दीड लाख पदे रिक्तच

✔ सोलापूर/प्रतिनिधी

**राज्यामध्ये आतापर्यंत. १. २३ लाख पदे भरूनही आणखी उर्वरित रिक्त दीड लाख पदे शिल्लक असून त्यातील आणखी ५० हजार पद भरती करण्याचे नियोजन शासनाच्या विचाराधीन असून लवकरच त्याची भरती प्रक्रिया सुरू करण्यात येणार आहे.यात सोलापुरातील जि.प.मधीलही अनेक पदांचा समावेश आहे.**

## ● आता आणखी ५० हजार पदभरतीचे नियोजन
## ● रिक्त पदांची माहिती सामान्य प्रशासन विभागाने मागविली




स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवाप्रसंगी ७५ हजार शासकीय पदे भरण्याचे राज्य सरकारने जाहीर केले. त्यामुळे कोरोनात दोन वर्षे वाया गेलेल्या तरुणांना मोठा दिलासा मिळाला. विद्यमान सरकारने दोन वर्षांत तब्बल सव्वालाख पदांची भरती केली आहे. सरकारच्या ४३ शासकीय विभागांमध्ये अजूनही दीड लाख पदे रिक्त असून आता विधानसभेच्या आचारसंहितेपूर्वी आणखी ५० हजार पदभरती करण्याचे नियोजन सुरू आहे. त्याअनुषंगाने शासकीय विभागाकडील रिक्त पदांची माहिती सामान्य प्रशासन विभागाने मागविली आहे.

शासकीय विभागांमधील पदभरती करण्याची 'एमपीएससी'ची तयारी असतानाही खासगी संस्थांच्या माध्यमातून पदभरती केली जात आहे. आतापर्यंतच्या पदभरतीत अनेक विभागांच्या परीक्षेचे पेपर फुटल्याचे आरोप झाले आणि त्यामुळे नाराज झालेल्या तरुणांचा फटका सरकारला लोकसभा निवडणुकीत बसल्याचे दिसून आले. 'एमपीएससी'मार्फतच गट ब व क संवर्गाची पदभरती व्हावी, अशी तरुणांची मागणी असून याचा सरकारला गांभीर्याने विचार करावाच लागेल. राज्य सरकारने सर्वात मोठी शिक्षक, पोलिस, आरोग्य अशा विभागांमधील पदभरती केली. पण, परीक्षा व निकालातील गोंधळ, नेमणुकीस विलंब, अशा कारणांमुळे भरतीपेक्षा त्या गोंधळामुळे बदनामी झाली. आता विधानसभा निवडणूक तोंडावर असतानाही 'एमपीएससी'कडून संयुक्त पूर्व परीक्षा गट क आणि ब या पदांच्या भरतीची जाहिरात प्रसिद्ध झालेली नाही. शिक्षक भरती अजूनही अर्ध्यावर असून पोलिस भरतीसाठी अर्ज मागविले, पण भरती सुरू झालेली नाही. त्यामुळे राज्य सरकारला तरुणांची नाराजी दूर करण्यासाठी सर्व सुधारणा करावीच लागेल आणि नोकरभरती करावी लागणार आहे.

> सध्याच्या विद्यमान सरकारने अनेक शासकीय विभागाच्या परीक्षा घेतल्या, पण अनेक परीक्षा वादाच्या भोवऱ्यात अडकल्या. पेपरफुटी, वाढीव परीक्षा शुल्क, पेपरफुटीवर न केलेला कायदा, एसआयटी नेमूनही न झालेली चौकशी आणि 'एमपीएससी'तर्फे सर्वच पदभरतीची मागणी असतानाही मध्येच आणलेले खाजगीकरण, या सर्व गोष्टीचा फटका लोकसभा निवडणुकीत सरकार बसला. आता सरकार युवकांच्या अपेक्षा पूर्ण करेल व तातडीने रिक्त पदे भरेल अशी अपेक्षा आहे.
>
> **- महेश शेरगुड,** कार्याध्यक्ष, स्पर्धा परीक्षा समन्वय समिती

### ● सध्याचे शासकीय विभाग पदसंख्या

तलाठी ४,६४४ जिल्हा परिषदा १९,४६० आरोग्य गट क, ड १०,९४९.पोलिस १७,५४०.वनविभाग २,३१९.सहकार ३०९. कृषी सेवक २,१०९.नगरपरिषदा १,७८२.वैद्यकीय शिक्षण व संशोधन ५,१५५. एमआयडीसी ८०२. राज्य उत्पादन शुल्क ५११.सांस्कृतिक विभाग ३९.पशुसंवर्धन ३७६.सांस्कृतिक ३९.एमपीएससी ८,४२१. महापालिका १६२८.श्री तुळजाभवानी मंदिर संस्थान ४७.महाराष्ट्र न्यायवैद्य विभाग १२५. नागपूर रुग्णालय गट- ड ६८०.शिक्षक भरती ११,०८५. असे एकूण १,२३,६१६.

### ● लवकरच नोकरभरतीला सुरुवात होणार

समान्य प्रशासन विभागाने ६ जून रोजी मंत्रालयीन सहसचिव, उपसचिव, तसेच सर्व विभागीय आयुक्तांकडे एकूण रिक्तपदांची माहिती मागवलेली आहे. ऑगस्ट २०२३ ते मे २०२४ अखेरपर्यंत नियुक्ती आदेश दिलेल्या पदांची संख्या, परीक्षेचा निकाल लागल्यानंतर कागदपत्रे तपासण्याची कार्यवाही सुरू असलेल्या पदांची संख्या, कंपनीबरोबर करारनाम्याची कार्यवाही पूर्ण झाली आहे. पण अद्याप परीक्षेचा निकाल लागला नाही अशा पदांची संख्या असा तपशील मागवलेला आहे. या आधारे लवकरच नोकरभरतीला सुरुवात होणार असल्याचे वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सांगितले.

# प्रिसिजन वाचन अभियानाचा सोलापुरात शनिवारी शुभारंभ

## ● प्रिसिजन फाउंडेशनच्या अध्यक्षा डॉ. सुहासिनी शहा यांची माहिती

✔ सोलापूर/प्रतिनिधी

प्रिसिजन फाउंडेशनने आजवर अनेक सामाजिक व सांस्कृतिक उपक्रम राबविले आहेत. शिक्षण, आरोग्य, शाश्वत विकास या बरोबरच सांस्कृतिक क्षेत्रातही प्रिसिजन गप्पा, प्रिसिजन संगीत महोत्सवासारखे प्रकल्प चालू आहेत. याबरोबरच आता प्रिसिजन वाचन अभियान हा उपक्रम हाती घेत आहोत, अशी माहिती प्रिसिजन फाउंडेशनच्या अध्यक्षा डॉ. सुहासिनी शहा यांनी पत्रकार परिषदेत दिली.



शनिवार दि. ६ जुलै २०२४ सायंकाळी ६. २५ वा. आय एम ए सभागृह, डफरीन चौक सोलापूर येथे या प्रिसिजन वाचन अभियानाचा शुभारंभ होत आहे. वाचन अभियानाचे पहिले पान उघडले जाणार आहे. 'वॉकिंग ऑन द एज' या पुस्तकाचे अभिवाचन आणि या पुस्तकाचे लेखक प्रसाद निक्ते यांच्याशी दिलखुलास गप्पा असे हे या अभियानचे पहिले पान असेल. प्रसाद निक्ते यांनी सह्याद्री घाटमाथ्याच्या धारेवरून उत्तरेहून दक्षिणेकडे उभा महाराष्ट्र चालत जाऊन सह्याद्रीच्या पर्वतरांगांचा अभ्यास केला. ही मोहिम पूर्ण करण्यासाठी त्यांना अखंडपणे ७५ दिवस चालावे लागले. या अनोख्या प्रवासाचं वर्णन म्हणजे 'वॉकिंग ऑन द एज' हे पुस्तक होय. या मोहिमेत तेथील जनजीवन, संस्कृती, भाषा, देवदेवता, परंपरा यांचा वेध घेण्याचा त्यांचा ध्यास होता. त्यातूनच सातपुडा आणि सह्याद्रीच्या जनजीवनाचा एक अनमोल दस्तावेज तयार झाला. या पुस्तकाचे अभिवाचन डॉ. सुमेधा कंदलगांवकर या करणार आहेत. त्यानंतर लेखक प्रसाद निक्ते यांची मुलाखत होईल. वाचन प्रेमी रसिक सोलापूरकरांनी 'प्रिसिजन वाचन अभियानात सहभागी होऊन वाचनाचा आणि श्रवणाचा मनमुराद आनंद घ्यावा, असे आवाहन डॉ. सुहासिनी शहा व डॉ किरण सारडा यांनी केले आहे.

### असे आहे अभियानाचे स्वरूप

प्रत्येक महिन्याच्या पहिल्या शनिवारी पुस्तक वाचनाशी संबंधित एका कार्यक्रमाचे आयोजन, पुस्तकाचे अभिवाचन, लेखकांच्या मुलाखती, पुस्तक समिक्षणपर संवाद, काव्य मैफिली, ललित, वैचारिक पुस्तकं आणि मासिकांचा वाचक वाढवण्यासाठी सोलापुरातील जास्तीत जास्त व्यक्तींना प्रेरित करणे.या अभियानाच्या माध्यमातून सोलापुरात प्रतिथयश लेखक, कवी यांची वाचकांची भेट आणि संवाद घडविणे, असे कार्यक्रमाचे स्वरूप असेल.

# विधवा महिलांना शासकीय योजनांचा लाभ मिळवून देणार : विद्या लोलगे

**● वर्ल्ड ऑफ वुमेन राज्यस्तरीय संघटनेची स्थापना**

**सोलापूर** : विधवा, घटस्फोटीत महिलांना संघटित करून शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी तसेच त्यांना समाजात मान सन्मान मिळवून देण्यासाठी वर्ल्ड ऑफ वुमेन या राज्यस्तरीय संघटनेची स्थापना स्थापना केल्याची माहिती संस्थापक अध्यक्षा विद्या लोलगे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

घरातील कर्त्या पुरुषांचे अकाली निधन झाल्यानंतर त्या कुटुंबावर मोठा आघात होतो. अशा संकट ग्रस्त महिलांना आधार देऊन त्यांना संघटित करण्यात येणार आहेत. नोंदणीसाठी ऑनलाईन नंबर व वेबसाईट सुरू केली आहे. संघटनेच्या माध्यमातून एक लाख महिलांना संघटित करण्यात येणार आहे. त्यांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळवून देऊन स्वयंसिध्दा बनविण्यात येणार आहे. कर्नाटक व राजस्थानच्या धर्तीवर विधवा, घटस्फोटित महिलांना प्रत्येकी दरमहा रूपये ३ हजार पेन्शन देण्यात यावी. ज्येष्ठ विधवा महिलांना पेन्शन तहहयात सुरू ठेवावी. कुटुंबातील कर्ता पुरुषाचे निधन झाल्यानंतर रूपये ५ लाखांचे अर्थसहाय्य देण्यात यावे. सरकारी, निमसरकारी व सहकारी संस्थामधील नोकरभरतीमध्ये पात्र विधवा/घटस्फोटिता महिलांना आरक्षण देण्यात यावे यासह विविध मागण्यांसाठी पाठपुरावा करण्यात येणार आहे. या पत्रकार परिषदेस लता फुटाणे, शोभा गायकवाड, मार्था आसादे, आसमाँ शेख, निलीमा हिरेमठ, सरोजीनी जाधव, योजना कामतकर, यशोदा सोनवणे आदी उपस्थित होते.



सोलापूर : स्व. नाईक यांच्या प्रतिमेला अभिवादन करताना समता मराठी विद्यालयातील शिक्षक-शिक्षका.

## समता मराठी विद्यालयात वसंतराव नाईक जयंती साजरी

✔ **सोलापूर** : मागास समाज सेवा मंडळ संचलित समता मराठी विद्यालयात स्व.वसंतराव नाईक यांची जयंती साजरी करण्यात आली. शाळेचे मुख्याध्यापक जयवंत हक्के यांच्या हस्ते नाईक यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी मिनाक्षी टी. राठोड कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होत्या. सेवाजेष्ठ शिक्षिका सुनिता पवार या प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. याप्रसंगी शिक्षिका चारुशिला म्हमाणे, मिनाक्षी राठोड यांनी वसंतराव नाईक यांच्या कार्याबद्दलचे मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्तविक ज्योती रणसिंग यानी केले तर सूत्रसंचालन सुजाता डोंगरे यांनी केले. आभार समिना मुजावर यांनी मानले. यावेळी संतोष राजपूत, कल्पना वाघमारे, लता क्षिरसागर, गीता पवार, रामराव चव्हाण, अनिल चव्हाण व विद्यार्थी उपस्थित होते. यावेळी विद्यार्थ्यांना गणवेशाचे वाटप करण्यात आले.

## राजराजेश्वरी प्राथमिक शाळेचे हिंदी राष्ट्रभाषा परिक्षेत यश

✔ **सोलापूर** : विनायक नगर येथील राजराजेश्वरी बालक मंदिर प्राथमिक शाळेने राष्ट्रभाषा प्रचार समिती वर्धातर्फे घेण्यात आलेल्या हिंदी राष्ट्रभाषा परीक्षेत यश प्राप्त केले. पाचवी सुलेखन परीक्षेत १२ विद्यार्थी, सहावी प्राथमिक परीक्षेत २२ तर सातवी प्रारंभिक परीक्षेत ३२ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. विद्यार्थ्यांना सहशिक्षक बजरंग शिरसाट यांचे मार्गदर्शन लाभले. विद्यार्थ्यांचे संस्थाध्यक्ष अण्णाराव कुंभार, मुख्याध्यापिका वैशाली कुंभार, माध्यमिक प्रशालेचे ज्ञानेश्वर म्हेत्रे व सर्व शिक्षक-शिक्षिका आदींनी अभिनंदन केले.

## पाटील पत्रकारिता परिक्षेत उत्तीर्ण



✔ **सोलापूर** : यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ नाशिक मार्फत घेण्यात आलेल्या डिप्लोमा इन मास कम्युनिकेशन अँड जर्नालिझम या एक वर्षाच्या अभ्यासक्रममध्ये मच्छिंद्र पाटील उत्तीर्ण झाले आहेत.त्यांना ७९.७५ % गुण मिळाले. त्यांना पत्रकार रविंद्र नाशिककर व पांडुरंग सुरवसे यांचे मार्गदर्शन लाभले. विमल कन्या प्रशालेत ते इंग्रजी या विषयाचे शिक्षक आहेत. त्यांनी अनेक विध्यार्थ्यांना मार्गदर्शन केले आहे. झाडे लावा झाडे वाचवा या अभियानात ते नेहमी सक्रिय असतात.

## माही वे एज्युकेशनल अँड चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या वतीने वृक्षारोपण

✔ **सोलापूर** : द माही वे एज्युकेशन अँड चॅरिटेबल ट्रस्ट आयोजित माही वीक सोमवार पार झाला. महेंद्रसिंग धोनीच्या ४३व्या वाढदिवसानिमित्त आयोजित या वीकची सुरवात ४३ झाडांच्या वृक्षारोपणाने झाली. कर्णिक नगर परिसरातील बगीच्या मध्ये हे वृक्षारोपण झाले. यावेळी रवींद्र मोहोळकर, मुकिद वळसंगकर, रश्मी मोहोळकर, अक्षता चव्हाण,किरण खरटमल, सुप्रिया मोहोळकर समर्थ सोरटे, सुयोग भोसले आदी उपस्थित होते.

# सोलापूर विद्यापीठ कॅम्पसमध्ये पदवी अभ्यासक्रमांसाठी प्रवेश सुरू!

**कुलगुरूंच्या हस्ते प्रवेश प्रक्रिया कार्यालयाचे झाले उद्घाटन**

✔ सोलापूर/प्रतिनिधी

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठामध्ये बीएससी, बीकॉम पदवी प्रथम वर्ष अभ्यासक्रमांसाठी विद्यार्थ्यांना थेट प्रवेश देण्याची प्रक्रिया सुरू असून यासाठी प्रवेश प्रक्रिया कार्यालयाचे उद्घाटन कुलगुरू प्रा. प्रकाश महानवर यांच्या हस्ते झाले.

विद्यापीठातील रसायनशास्त्र संकुलामध्ये पदवी प्रथम वर्ष प्रवेशासाठी कार्यालय सुरू करण्यात आले आहे. यंदाच्या वर्षापासून सोलापूर विद्यापीठामध्ये बीएससी, बीकॉम पदवीचे अभ्यासक्रम सुरू करण्यात आले आहे. त्यासाठी प्रवेश प्रक्रिया कार्यालयाच्या उद्घटनप्रसंगी प्र-कुलगुरू प्रा. लक्ष्मीकांत दामा, व्यवस्थापन परिषदेचे सदस्य प्रा. सचिन गायकवाड, रसायनशास्त्र संकुलाच्या संचालिका डॉ. अंजना लावंड, डॉ. विकास घुटे, डॉ. आर. एस. मेंते, डॉ. गौतम कांबळे, डॉ. विनायक धुळप, पदवी अभ्यासक्रमाचे समन्वयक डॉ. धवल कुलकर्णी, डॉ. अनिल घनवट, डॉ. प्रभाकर कोळेकर, डॉ. सदानंद शृंगारे, डॉ. मुकुंद माळी आदी उपस्थित होते.



सोलापूर : प्रवेश प्रक्रिया कार्यालयाचे उद्घाटन करताना डॉ.अंजना लावंड, कुलगुरू प्रा. प्रकाश महानवर व इतर.

बीएससी इन्व्हरमेंटल सायन्स, इंडस्ट्रियल मॅथमॅटिक्स, इंडस्ट्रियल मायक्रोबायोलॉजी, फार्मासिटिकल मॅन्युफॅक्चरिंग अँड क्वालिटी, पेंट टेक्नॉलॉजी, फार्मासिटिकल अँड फाईन केमिकल टेक्नॉलॉजी या अभ्यासक्रमात करता येणार आहे.

बीकॉम (बीएफएसआय) आणि बीबीए तसेच बीसीए यासाठी देखील प्रवेश प्रक्रिया सुरू आहे. यासाठी बारावी शास्त्र व वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांनी विद्यापीठात येऊन बीएससी व बीकॉमसाठी प्रवेश निश्चित करावे, असे आवाहन विद्यापीठ प्रशासनाकडून करण्यात आले आहे. प्रवेशाच्या अधिक माहितीसाठी डॉ. धवल कुलकर्णी (मो. ९४२३५९१३६०), डॉ. मुकुंद माळी(८८३०३२६६१५) व डॉ. सदानंद शृंगारे (९०९६५८८९१८) यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन विद्यापीठ प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

# मोहरमनिमित्त १२ जुलैपासून शहरात मिरवणुका निघणार

✔ **सोलापूर** : मोहरम कमिटी शहर सोलापूरच्या वतीने यंदाही मोहरम राष्ट्रीय सणा निमित्त दि. १२ ते १७ जुलै २०२४ पर्यंत शानदार मिरवणुका निघणार आहेत, अशी माहिती अध्यक्ष हाजी मकबूल मोहोळकर यांनी पत्रकार परिषदेत दिली.

१ जुलै २०२४ रोजी सभासद मुजावरांसाठी मोहरम कमिटी मध्यवर्ती कार्यालयाचे बारा इमाम चौक येथे उद्घाटन होणार आहे.७ जुलै रोजी चंद्रदर्शन पंजाची स्थापना आलावा ठिकाणी होणार आहे. त्यानंतर ८ जुलै रोजी इस्लामी नूतन वर्षाची सुरुवात होणार आहे. १२ जुलै रोजी सायंकाळी ७ वाजता मोहरमची पाचवी निमित्त बेगम पेठ सालार किराणा दुकान येथून पीर छोटे मुस्लिम पंजाची मिरवणूक निघणार आहे.

१३ जुलै रोजी ५ वाजता दुर्वेश मस्जिद शनिवार पेठ येथून पीर छोटे अब्बास अली पंजाची धावती मिरवणूक निघणार आहे. १४ जुलै रोजी मोहरम ची सातवी निमित्त रात्री ९ वाजता मराठा वस्ती येथून पीर इमाम कासिम पंजाची मिरवणूक निघणार आहे. १५ जुलै रोजी पीर छोटे मौलाली पंजाची मिरवणूक निघणार आहे. या पत्रकार परिषदेस शकिल मौलवी, मुसा मुर्शद , अ. गफार गुडमिट्टे, अ. सत्तार चांदा, किरण सपार, शाह इकबाल दुर्वेश, म. रफिक मोहोळकर आदी समाजबांधव उपस्थित होते.



# आवडेल तेथे प्रवास योजनेला सोलापूरकरांची वाढती पसंती

## गतवर्षी तब्बल १७ लाख ६८ हजारांचे उत्पन्न | पासधारकांना आरक्षण करून प्रवासाची मुभा

✔ सोलापूर/प्रतिनिधी

**छोटे व्यापारी, उद्योजक, छोटे विक्रेते अशा अनेकांना कामानिमित्त सलग काही दिवस एसटीचा प्रवास करावा लागतो. अनेक हौशी पर्यटक आठवड्याची सुट्टी घेऊन मनसोक्त भ्रमंती करतात. अशा प्रवाशांसाठी राज्य मार्ग परिवहन महामंडळाने 'आवडेल तेथे प्रवास' योजना सुरू केली आहे. सोलापुरात याला चांगला प्रतिसाद लाभला आहे. सोलापूर आगारामधून गेल्यावर्षी या योजनेतून तब्बल १७ लाख ६८ हजारांचे वार्षिक उत्पन्न मिळाले आहे.**

राज्य मार्ग परिवहन महामंडळाने १९८८ मध्ये १० दिवसांसाठी पास देत आवडेल तेथे प्रवास' योजना सुरू केली. एप्रिल २००६ मध्ये योजनेची पुनर्रचना करत १० दिवस पास सुविधा रद्द करून त्यात चार आणि सात दिवस असा समावेश केला. शहर वाहतुकीसह राज्यांतर्गत आणि आंतरराज्य वाहतुकीत एसटी ज्या ठिकाणी पोहोचते, अशा सर्व ठिकाणांपर्यंत या पासची वैधता आहे. पासधारकांना आरक्षण करून प्रवासाची मुभाही दिली आहे. यासाठी स्वतंत्र आरक्षण शुल्क भरावे लागते. पासधारकांकडून तीर्थक्षेत्रांसह, पर्यटन स्थळांवर विशेष भर दिला जात आहे. जत्रा - यात्रा उत्सवांसह सलग सुट्यांच्या काळात या पासची मागणी वाढत आहे, असे एसटीतील अधिकाऱ्यांनी सांगितले. आवडेल तिथे कुठेही प्रवास योजनेंतर्गत ४ दिवस व ७ दिवसांचा पास दिला जातो या पासची वैधता पहिल्या दिवशी रात्री १२ वाजल्यापासून ते शेवटच्या दिवशी (४ आणि ७) दिवशी रात्री १२ वाजेपर्यंत आहे. हे पास साध्या, जलद, रात्रसेवा, शहरी, यशवंती आणि आंतरराज्य बसेससाठी वापरता येतात.




### ● सोलापूर आगारातून महिन्याला २५० लाभार्थी

आवडेल तिथे कुठेही प्रवास या योजनेचा सोलापुर आगारात मोठ्या प्रमाणात प्रवासी लाभ घेत आहेत. या आगारातून महिन्याला सुमारे २५० लाभार्थी या योजनेचा लाभ घेतात. नोकरदार वर्गासाठी मासिक आणि त्रिमासिक पासची सोय आहे. मासिकमध्ये २० दिवसाचे पैसे भरायचे आणि ३० दिवस प्रवास करायचा आहे. त्रैमासिक पासमध्ये ५० दिवसांचे पैसे भरून ९० दिवसांचा प्रवास आहे.

> आवडेल तिथे कुठेही प्रवास या योजनेचा सोलापुर आगारात मोठ्या प्रमाणात प्रवासी लाभ घेत असतात. त्याचबरोबर कामगार, नोकरदार यांच्यासाठी मासिक व त्रिमासिक याचाही चांगला प्रतिसाद आहे.
>
> **- वंदना मते, वाहतूक नियंत्रक**

### ● असे आहेत पासचे दर

४ दिवसांच्या पासाची किंमत प्रौढांसाठी १ हजार १७० रुपये आणि लहान मुलांसाठी (५ ते १२ वर्षे) ५८५ रुपये दर आहेत. तर शिवशाही बसच्या ४ दिवसांच्या पासाचे दर प्रौढांना १ हजार ५२० रुपये आणि मुलांना ७६५ रुपये आहे. ७ दिवसांच्या साधाराण बसच्या पासासाठी प्रौढांना २ हजार ४० रुपये तर मुलांना १ हजार २५ रुपये दर आहेत. शिवशाही बसच्या ७ दिवसांच्या पासासाठी प्रौढांची किमान किंमत ३ हजार ३० रुपये आणि मुलांसाठी १ हजार ५२० रुपये दर आहेत.

### ● अर्ज करण्याची पद्धत

अर्जदाराला सर्वात प्रथम आपल्या क्षेत्रातील नजीकच्या राज्य परिवहन बस स्टॅण्डमध्ये जाऊन योजनेचा अर्ज घ्यावा लागेल. अर्जात विचारलेली सर्व माहिती भरून सोबत योग्य ती कागदपत्रे जोडून पैसे भरून पास घ्यावा लागेल.

# बार्शी बाजार समितीसाठी राऊत विरुद्ध सोपल-बारबोले गटातच होणार सामना

## सरकार विरोधातील वातावरण राऊत गटाला धोक्याचे



बार्शी/सचिन अपसिंगकर

**बार्शी बाजार समितीसाठी प्रारूप मतदार यादी जाहीर झाली आहे. निवडणूक नियमाप्रमाणे सहकार खात्याने निवडणूक प्रक्रियेसाठी मतदार यादी निश्चिती सुरू केली आहे. त्यामुळे बाजार समितीची निवडणूक जाहीर होईल अशी ही शक्यता वर्तवली जात आहे. यंदा बाजार समितीसाठी राऊत विरुद्ध सोपल, बारबोले गटात सामना होणार आहे. आगामी विधानसभेच्या दृष्टीने ही निवडणूक सोपल आणि राऊत यांच्यासाठी महत्वाची ठरणार आहे. सरकारच्या विरोधात असलेल्या वातावरणाच्या पार्श्वभूमी ही निवडणूक होत असल्याने आमदार राऊत गटाला ही निवडणूक सोपी नाही, असे बोलले जात आहे.**

बाजार समितीच्या संचालक मंडळाचा पंचवार्षिक कालावधी संपल्यानंतर त्यांना राज्य शासनाने दोन वेळा मुदत वाढ दिली आहे. आता मुदतवाढ दिलेल्या कार्य कालावधीची मुदत येत्या २४ जुलै रोजी संपत आहे. बाजार समितीच्या सत्ताधाऱ्यांनी गेल्या सर्वसाधारण सभेत पुन्हा एकदा राज्य शासनाकडे संचालक मंडळाचा कार्यकाल वाढवून देण्यासाठी ठराव मंजूर करून घेतला आहे. बाजार समितीचे सर्वेसर्वा आमदार राजेंद्र राऊत हे राज्यातील महायुती सरकारचे आणि भारतीय जनता पार्टीचे समर्थक अपक्ष आमदार आहेत. त्यांचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याबरोबर चांगले संबंध आहेत. त्यामुळे कदाचित पुन्हा एकदा संचालक मंडळाचा कार्यकाल वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही. मात्र निवडणूक नियमाप्रमाणे सहकार खात्याने निवडणूक प्रक्रिया साठी मतदार यादी निश्चिती सुरू केली आहे. त्यामुळे बाजार समितीची निवडणूक जाहीर होईल अशी ही शक्यता वर्तवली जात आहे.

या बाजार समितीवर माजी मंत्री दिलीप सोपल यांच्या गटाचे सुमारे २५ वर्ष पूर्णपणे वर्चस्व होते. माजी मंत्री सोपल यांनी या बाजार समितीचे सभापतीपद भूषवले आहे. २०१७ साली प्रथमच झालेल्या खुल्या निवडणुकीत त्यांच्या ताब्यातून बाजार समितीची सत्ता गेली. गत निवडणुकीत बाजार समितीच्या वाटचालीत प्रथमच सर्व शेतकऱ्यांना मतदानाचा अधिकार देण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला होता. त्यामुळे त्या निवडणुकीत बाजार समितीच्या १८ संचालक पदांच्या जागांसाठी शेतकऱ्यांमधून थेट मतदान झाले. त्या निवडणुकीत आमदार राजेंद्र राऊत गटाचे ९ तर माजी मंत्री दिलीप सोपल गटाचे सात उमेदवार व माजी प्रशासक राजेंद्र मिरगणे यांच्या गटाचे दोन संचालक निवडून आले होते. त्या निवडणुकीनंतर एकमेकांच्या विरोधात लढलेले राऊत मिरगणे गट तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनानुसार एकत्र आले व बाजार समितीमध्ये आमदार राजेंद्र राऊत गटाच्या ताब्यात सत्ता आली. राज्यातील सर्वात तरुण वयाचे सभापती म्हणून रणवीर राऊत यांची निवड झाली. त्या निवडीनंतर आमदार राऊत गटाने बाजार समितीमध्ये गेली जवळपास सात वर्ष सत्ता भूषविली आहे.




### १८ संचालक निवडून द्यावे लागणार

यंदाच्या निवडणुका या शेतकऱ्यांमधून न घेता त्या जुन्या पद्धतीने घ्याव्यात असा निर्णय महाविकास आघाडी सरकारने घेतला होता. त्यामुळे विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था गटातून ११ संचालक तर ग्रामपंचायत सदस्य गटातून चार संचालक तर व्यापारी गटातून २ संचालक व हमाल तोलार गटातून एक असे १८ संचालक निवडून द्यावे लागणार आहेत.

### विरोधकांचा आत्मविश्वास वाढला

नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत मात्र सोपल गटाने बार्शी तालुक्यात ठाकरे गटाला ५५ हजारांची मतांची आघाडी खासदारकीचे उमेदवार ओमराजे निंबाळकर यांना मिळवून दिली आहे. त्यामुळे बार्शीतील सोपल व माजी नगराध्यक्ष विश्वास बारबोले यांच्या गटात उत्साहाचे वातावरण आहे. त्यामुळे बाजार समिती निवडणुकीत सोपल बारबोले गट हे आमदार राऊत यांच्या विरोधात आत्मविश्वासाने लढतील असे चित्र आहे.

### सर्व सत्तास्थाने राऊतांकडे

बाजार समितीनंतर झालेल्या निवडणुकीनंतर सोपल विधानसभेच्या निवडणुकीतही पराभूत झाले. त्यांच्या अधिपत्याखाली असणारी नगरपालिका, पंचायत समिती, बाजार समिती, आमदारकी अशी सर्व सत्तापदे गेली आहेत. बार्शी तालुक्यातील सर्व महत्त्वाची सत्ता केंद्र ही आमदार राऊत यांच्या गटाकडे होती. गेली अडीच वर्ष या सत्ता केंद्रांवर प्रशासकीय सत्ता आहे.

### राऊत गटाचे लक्ष मुदतवाढीकडे

नुकत्याच झालेल्या सोसायटीच्या निवडणुकांमध्ये राऊत गटाने सोपल गटाकडून बऱ्याच सोसायटी साम, दाम, दंड, भेद वापरून ताब्यात घेतल्या. त्यामुळे सोपल गटाला मोठा शह बसला आहे. मात्र जरी सोसायटी ग्रामपंचायत सदस्य यातून संचालक निवडण्याची वेळ आली तरी या लढती एकतर्फी होण्याची शक्यता नाही. याला सध्या राज्यात महायुती सरकारच्या विरोधात असलेल्या वातावरणाची पार्श्वभूमी आहे. त्यामुळे आमदार राऊत गटाला ही निवडणूक सोपी नाही. त्यामुळे राऊत गटाचे लक्ष बाजार समितीच्या संचालक मंडळाला मुदतवाढ मिळते का याकडे आहे.

---

# दीपकआबांचे निवडणूक लढवण्याचे संकेत; शहाजीबापूंचे टेन्शन वाढले

## सांगोला मतदारसंघात उमेदवारीबाबत चुरस

सोलापूर/प्रतिनिधी

**लोकसभेला राज्यात महायुतीला कमी जागा मिळाल्या असल्या तरी आगामी विधानसभा निवडणुकीत पुन्हा सत्ता मिळवायची असा इरादा नेत्यांनी केला आहे. यासाठी महायुतीतील सर्व पक्षाची तयारी सुरू आहे. मात्र आगामी काळात महायुतीमधील कोणती जागा कोणाला सोडायची यावरून गोंधळ होण्याची शक्यता आहे. सोलापूर जिल्ह्यातही तशीच परिस्थिती असून त्याची सुरूवात आता माजी आमदार दिपकआबा साळुंखे -पाटील यांनी केली आहे. त्यांनी सांगोला मतदारसंघावर दावा केला आहे. त्यामुळे आता आमदार शहाजीबापू पाटील यांचे टेन्शन वाढण्याची चिन्हे दिसत आहेत.**



लोकसभा निवडणुकीतल्या जिव्हारी लागलेल्या पराभवानंतर हेवे-दावे, आरोप-प्रत्यारोपांनी महायुतीत फार काही आलबेल सुरू आहे असे नाही. पण याही परिस्थितीत भाजप, शिवसेना शिंदे गट,राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट या तीनही पक्षांचे प्रमुख नेतेमंडळी विधानसभा निवडणुकीला महायुती म्हणूनच सामोरे जाणार असल्याचा दावा करत आहे. पण महायुतीतील घटक पक्षांचे विद्यमान-माजी आमदारांध्ये मात्र कमालीची अस्वस्थता दिसत आहे. आता नाही तर कधीच नाही असे नेत्यांनीच ठरवल्याचे दिसत आहे. त्यामुळे एका मतदारसंघात महायुतीतील प्रत्येक पक्षाचे नेते इच्छुक दिसत आहेत.

आता सोलापूर जिल्ह्यातील बहुचर्चित सांगोला मतदारसंघातही मोठा ट्विस्ट समोर आला आहे. अजित दादा राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते दिपकआबांनी सांगोला विधानसभेसाठी इच्छुक आहेत. पक्षाची कार्यकर्ता संवाद बैठक नुकतीच पार पडली. या बैठकीत माजी आमदार दीपक साळुंखे-पाटील यांनी विधानसभा निवडणूक लढवण्याविषयी संकेत दिले आहे. जे कार्यकर्त्यांच्या मनात तेच माझ्याही मनात असं म्हणत त्यांनी कार्यकर्त्यांना कामाला लागा असे आदेश दिले आहेत. या बैठकीस राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष तानाजी पाटील, माजी उपनगराध्यक्ष शिवाजी बनकर, चारुशीला काटकर, मधुमती साळुंखे, पंढरपूर तालुक्यातील समाधान काळे यांसह मोठ्या प्रमाणात पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

सांगोल्यात सध्या शिवसेना शिंदे गटाचा आमदार आहे. शहाजीबापू पाटलांनी २०१९ ला विधानसभा निवडणूक जिंकली आहे. त्यामुळे पुन्हा एकदा आमदार शहाजीबापू येथून इच्छुक आहेत. लोकसभा निवडणुकीत या मतदारसंघातून भाजपाचे उमेदवार रणजितसिंह निंबाळकर यांना आघाडीही मिळाली आहे. त्यामुळे शहाजीबापूंचा आत्मविश्वास वाढला आहे. त्यांनी आता विधानसभेची तयारीही सुरू केली आहे.

### आबांनी निवडणूक लढवावी; कार्यकर्त्यांचा आग्रह

पक्षाच्या बैठकीत कार्यकर्त्यांनी यंदा विधानसभेची निवडणूक तुम्हीच लढवायची असा आग्रह दिपकआबांकडे धरला.आता आबा आपण कुणाला पाठिंबा द्यायचा नाही, ज्यांना द्यायचा आहे त्यांनी आपल्याला पाठिंबा द्यावा.यावेळी आर या पारची लढाई लढाईची आहे असे कार्यकर्त्यांनी निक्षून सांगितले.

-----------

### कार्यकर्त्यांच्या शब्दाच्या पुढे जाणार नाही:आबा

आजपर्यंत मी सांगेल ते तुम्ही ऐकत आलात. यापुढील काळात माझ्या शब्दावर डोळे झाकून विश्वास ठेवणाऱ्या कार्यकर्त्यांच्या शब्दाच्या पुढे जाणार नाही.तुम्ही जी भूमिका ठरवाल, तसा मी निर्णय घेणार आहे. जे कार्यकर्त्यांच्या मनात आहे तेच माझ्याही मनात आहे.आगामी विधानसभेचा रणसंग्राम डोळ्यासमोर ठेवून कामाला लागावे असे आदेशही माजी आमदार दीपक साळुंखे यांनी दिले आहेत.

----------------------------------

### शहाजीबापूंना जोर लावावा लागणार

.गेल्या विधानसभा निवडणुकीत दिपकआबा साळुंखे यांनी शहाजी पाटील यांना मदत केली होती. त्यावेळीपासून या दोन्ही नेत्यांचे चांगले सूत जुळले आहे. या दोघांनी संपूर्ण पाच वर्ष आमदार जनतेच्या दारी या कार्यक्रमांतर्गत संपूर्ण मतदारसंघ पिंजून काढला आहे. आता मात्र दिपकआबांनी अचानक निवडणूक लढवण्याचे संकेत दिल्याने शहाजीबापू यांना आता मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे ही जागा सेनेकडेच कायम रहावी म्हणून मोठा जोर लावावा लागणार आहे.

---

## प्रशांत परिचारकांना विधान परिषदेला डावलले

# कार्यकर्त्यांमध्ये प्रचंड नाराजी, विधानसभा लढवण्याचा आग्रह वाढला

## सोशल मिडीयावर पोस्ट होताहेत व्हायरल







सोलापूर/प्रतिनिधी

**माजी आमदार प्रशांत परिचारक यांना विधान परिषदेवर संधी देऊन त्यांचे पुनर्वसन केले जाईल, असे त्यांच्या समर्थकांना आणि कार्यकर्त्यांना वाटत होते. मात्र, विधान परिषदेच्या उमेदवारीपासून त्यांना डावलण्यात आले आहे. त्यामुळे कार्यकर्त्यांमध्ये नाराजी पसरली आहे.**

विधान परिषदेच्या ११ जागांसाठी येत्या १२ जुलै रोजी मतदान होणार आहे. त्यासाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा २ जुलै हा शेवटचा दिवस आहे. त्यापूर्वीच भाजपने माजी मंत्री पंकजा मुंडे, माजी आमदार योगेश टिळेकर, माजी मंत्री सदाभाऊ खोत, माजी आमदार परिणय फुके आणि अमित गोरखे यांना उमेदवारी जाहीर केली. यात परिचारकांचे नाव नसल्याने त्यांच्या कार्यकर्त्यांचा पुरता हिरमोड झाला आहे.

पंढरपूर मंगळवेढा पोट निवडणुकीत आमदार समाधान आवताडे यांच्यासाठी परिचारक यांनी जोरदार प्रचार करत त्यांना विजयी केले होते.

परिचारक यांना सोलापुरातील स्थानिक स्वराज्य संस्थेच्या माध्यमातून (विधान परिषद) संधी देण्याचे आश्वासन दिले होते.

मात्र महापालिकेसह जि.प.च्या निवडणुका न झाल्याने ही विधान परिषद निवडणूकही लांबणीवर पडली. तरीही परिचारक यांनी पक्षाशी एकनिष्ठ राहत काम केले आहे. त्यामुळे आता विधान परिषदेसाठी परिचारक यांना संधी दिली जाईल, अशी शक्यता वर्तवली जात होती.

मात्र त्यांना ती मिळाली नाही. त्यामुळे कार्यकर्त्यांना आता उघडपणे नाराजी व्यक्त करण्या सुरूवात केली आहे. सोशल मिडीयावर परिचारक यांना मंगळवेढा-पंढरपूर विधानसभा लढवावीच अशी पोस्ट व्हायरल केली जात आहे. त्यामुळे आता भाजपसमोर अवताडे की परिचारक असा पेच निर्माण होणार आहे.

### प्रशांत परिचारकांपुढे असा आहे पेच

प्रशांत परिचारक यांनी येणारी विधानसभा लढवली नाही तर त्यांच्यापुढे पेच निर्माण होण्याची शक्यता आहे. महापालिका आणि जि.प. निवडणुका झाल्यानंतर सोलापूरमधील स्थानिक स्वराज्य संस्थेची म्हणजे विधान परिषद निवडणूक होणार आहे. गतवेळच्या निवडणुकीत परिचारक यांना मोहिते-पाटील, नारायण पाटील यांनी मदत केली होती. आता हे दोघे पवार गटात आहेत. त्यामुळे त्यांची मदत परिचारक यांना होण्याची शक्यता कमी आहे. त्यामुळे परिचारक यांच्यासमोर विधानसभा लढवण्याशिवाय पर्याय नाही असे चित्र सध्या आहे.

### फडणवीस यांची भूमिका महत्वाची

पंढरपूरमध्ये हे अवताडे आणि परिचारक आजी-माजी आमदार असताना लोकसभा निवडणुकीत विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष अभिजीत पाटील हेही भाजपसोबत आले आहेत. त्यामुळे आता विधानसभेसाठी देवेंद्र फडणवीस नेमके कोणाला संधी देणार, कोणाची समजूत काढणार याकडे सर्वांचे लक्ष असणार आहे.

### परिचारक धाडस दाखवणार का

विधान परिषदेवर संधी न मिळाल्याने आता परिचारक यांच्या पुढे आता विधानसभेचा पर्याय असणार आहे. परिचारक विधानसभेची निवडणूक भाजप विरोधात लढवण्याचे मोहिते पाटील यांच्या प्रमाणे धाडस दाखवतील का, अशी चर्चा तालुक्यात सुरू झाली आहे. परिचारक यांच्यावर निवडणूक लढवण्याचा दबाव कार्यकर्त्यांकडून जोरात सुरू आहे.

---

# आता आषाढीवारीला मोदी येणार असल्याची चर्चा

**सोलापूर : अवघ्या काही दिवसावर आलेल्या आषाढी वारीत केंद्रातील राजकीय नेते येणार असल्याच्या अफवांना ऊत आला आहे. काँग्रेसचे लोकसभेतील विरोधी पक्ष नेते राहुल गांधी सहभागी होणार असल्याचे समजले असतानाच आता पंतप्रधान नरेंद्र मोदीही वारीला येणार असल्याची चर्चा सुरू झाली आहे. नुकतेच शरद पवारही वारीत सहभागी होणार असल्याची चर्चा होती. मात्र आपण सहभागी होणार नाही, असे सांगत ती चर्चा खोडून काढली.**



दक्षिणेची काशी समजल्या जाणाऱ्या पंढरपूरच्या पांडुरंगाची आषाढी एकादशीला मोठी यात्रा गेल्या अनेक वर्षापासून भरत आहे. संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम महाराज, संत एकनाथ, संत नामदेव, संत गजानन महाराज, संत जनाबाई अशा सर्व संताच्या पालख्या आषाढी एकादशीला पंढरपूरच्या पांडुरंगाच्या दर्शनासाठी लाखो भाविकांसह येतात. या यात्रेत काँग्रेसचे नेते खासदार आणि लोकसभेचे विरोधी पक्ष नेते राहुल गांधी हे देखील वारीत सहभागी होणार असल्याचे काँग्रेस पक्षाकडून यापूर्वीच सांगण्यात आले होते. मात्र अजून तसा त्यांचा कोणताच कार्यक्रम आला नाही. राहूल गांधी येणार असल्याची चर्चा असतानाच आता देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी हे सहभागी होणार असल्याची चर्चा आता सुरू झाली आहे. सोशल मिडीयावर याबाबत अनेक पोस्ट फिरत आहेत. मात्र प्रशासन अथवा भाजपच्या कोणत्याही नेत्याकडून याला दुजोरा दिलेला नाही. मोदी आणि गांधी येणार असल्याच्या चर्चा सुरू झाल्यानंतर सोलापूर जिल्हा प्रशासन जिल्हा ग्रामीण पोलीस यंत्रणा तयारीला लागली आहे. यंदा होत असलेला पाऊस आणि वारकऱ्यांची गर्दी तसेच नेत्यांच्या दौऱ्यामुळे जिल्हा प्रशासन आणि पोलीस यंत्रणा यांच्यावर मोठा ताण येणार असल्याचे दिसून येते. नेते येवो अथवा न ये वो जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षकांनी व नियोजना ची तयारी सुरू केली आहे.

### दरवर्षी मोदी मराठीतून देतात शुभेच्छा

पंतप्रधान मोदी दरवर्षी आषाढी एकादशीदिवशी भाविकांसह जनतेला मराठीतून शुभेच्छा देतात. वारकरी चळवळ ही आपल्या उत्कृष्ट परंपरेचं उदाहरण असून समानता आणि एकता यावर भर देणारी आहे, असे ते दरवेळी सांगतात.